# कत्तल करायची मेंढी

## व इतर कथा

रोआल्ड डाल

वृषाली जोशी



# कत्तल करायची मेंढी व इतर कथा

मूळ लेखक – रोआल्ड डाल

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# कत्तल करायची मेंढी व इतर कथा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कत्तल करायची मेंढी व इतर कथा


लेखक : रोआल्ड डाल

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २० ऑगस्ट २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.


# कत्तल करायची मेंढी व इतर कथा

लेखक रोआल्ड डाल यांची माहिती

कथानुक्रम



1. कत्तल करायची मेंढी
2. अभिरुची
3. मालकीणबाई
4. करायला सहजसोपे
5. डुक्कर
6. एडवर्ड, जेता
7. विलियम आणि मेरी

# Roald Dahl
## रोआल्ड डाल



रोआल्ड डाल हा नॉर्वेजियन वंशाचा ब्रिटीश कादंबरीकार, लघुकथाकार व पटकथाकार होता. जगभर त्याच्या पुस्तकांच्या दोनशे पन्नास लाखांहून अधिक प्रती खपल्या. तो वेल्समध्ये नॉर्वेजियन पालकांच्या पोटी १३ सप्टेंबर १९१६ मध्ये जन्मला. त्याचे बरेचसे जीवन त्याने इंग्लंडमध्ये व्यतीत केले. २३ नोव्हेंबर १९९० मध्ये तो मरण पावला.

# Lamb to the Slaughter
# कत्तल करायची मेंढी



खोली स्वच्छ व उबदार होती. पडदे ओढलेले होते. दोन टेबलावरील दिवे, जळत होते. त्यातील एक टेबल तिचे होते व तिच्या विरुद्ध बाजूला असलेल्या टेबलाजवळ, रिकामी खुर्ची होती. तिचा नवरा कामावरून घरी येण्यासाठी, मेरी मेलनी थांबली होती.

तिच्या भोवतालची हवा, मंदपणे हसत होती. शिवणकामात तिने घातलेले डोके, शांत होते. तिला सहावा महिना चालू होता. त्यामुळे तिची कांती आश्चर्यकारक रित्या, आरस्पानी दिसत होती. चेहरा निरागस, डोळे पूर्वीपेक्षा अधिक काळेभोर व मोठे दिसत होते. जेव्हा घड्याळ पाचला दहा मिनिटे अशी वेळ दाखवू लागले, तेव्हा तिला गाडीच्या दाराचा व किल्ली फिरवल्याचा आवाज ऐकू आला. ती तिचे शिवणकाम बाजूला ठेऊन, तो आल्याबरोबर त्याचे स्वागत करण्यासाठी, उभी राहिली.

तिच्यासाठी दिवसातली ही वेळ, नेहमीच फार छान असायची. घरात खूप वेळ एकटीने घालवल्यावर, शांतपणे व सावकाशीने त्याच्या सहवासाचा आनंद लुटणे, यात ती खूप समाधानी होती. तो ज्या पद्धतीने दारात येई, डौलदारपणे पाऊले टाकत, खोली ओलांडे व खुर्चीवर आरामात बसे; या सर्वांमुळे ती खूष होऊन त्याच्यावर प्रेम करे. तिच्यावर खिळलेल्या त्याच्या डोळयात खोलवर पहात, त्याच्या तोंडाचा मजेशीर आकार बघत, व तो ज्या पद्धतीने गप्प राहून, त्याची दमणूक सांगे; त्यासाठी ती त्याच्यावर अगदी मनापासून प्रेम करे.

ती म्हणाली, “मला वाटते, तुझ्यासारख्या जेष्ठ पोलिसाला दिवसभर पायपीट करायला लावणे, हे लाजीरवाणे आहे.” तो काही बोलला नाही.

मग तिने परत शिवणकामात डोके खुपसले. ती बोलली, “प्रिय, मी तुझ्यासाठी चीज आणू का? आपण जेवायला बाहेर जाऊ असे वाटल्याने, मी काही स्वयंपाक केला नाही.”

“नको.” तो म्हणाला.

ती पुढे म्हणाली, “बाहेर जायला तू फार दमला असशील, तर फ्रीजमध्ये बराच माल पडलेला आहे. तर खुर्चीतून न उठता तुला तो खाता येईल.”

एखादे हास्य किंवा मान हलवणे, यासाठी तिचे डोळे त्याच्याकडे लागले होते,

पण त्याच्याकडून काहीच उत्तर मिळाले नाही.

“ठीक आहे. पहिल्यांदा मी तुला चीज आणि खारी बिस्किटे आणते.” ती बोलत राहिली.

तिने तिच्या खुर्चीत, अस्वस्थपणे हालचाल केली. तिचे मोठे डोळे अजूनही त्याच्या चेहऱ्यावर, खिळलेले होते.

“पण तुला जेवण घ्यावेच लागेल. आपण मेंढीचे काप खाऊ शकतो. की तुला डुकराचे मास आवडेल? तुला हवे असेल, ते सगळे फ्रीजमध्ये आहे.”

तो बोलला, “ते विसर.”

“पण प्रिय, तुला जेवलेच पाहिजे. मी काय ते बघते. मग तू तुला हवे तसे खा, किंवा खाऊ नकोस.”

तिने उठून टेबलावर दिव्याशेजारी, शिवणाचे सामान ठेवले.

तो म्हणाला, “खाली बस. एका मिनिटाकरता, खाली बस.”

सर्व वेळ त्याच्याकडे मोठ्या घाबरलेल्या डोळयांनी बघत, ती पुन्हा हळूहळू खाली बसली.

तो म्हणाला, “मला तुला काही सांगायचे आहे.”

“काय झाले, प्रिय? तुला काय सांगायचे आहे?”

आता तो एकदम स्थिर बसला. त्याच्या शेजारील टेबलावरील दिव्याचा उजेड त्याच्या हनुवटी व ओठांवर न पडता, चेहऱ्याच्या वरच्या भागावर पडेल, अशा तऱ्हेने त्याने त्याचे डोके खाली केले. त्याच्या डाव्या डोळ्याजवळील कोपऱ्यातील छोटा स्नायू, हलताना तिने पाहिला. तो म्हणाला, “मला भीती वाटते, की तुला थोडासा धक्का बसेल. पण तुला आता एकदाचे सगळे सांगायचे, असे मी ठरवून टाकले आहे.”

त्याने फार वेळ घेतला नाही. फक्त चार ते पाच मिनिटे! जसेजसे तो सांगत गेला, तसेतसे प्रत्येक शब्दाबरोबर, तो तिच्यापासून दूरदूर गेला. सबंध वेळ ती भीतीदायक बधीरपणे त्याच्याकडे बघत, अगदी स्तब्ध बसून होती.

तो पुढे बोलला, “एकंदरीत असे आहे. आणि हे तुला सांगणे वाईट आहे, पण माझ्याकडे, दुसरा काही इलाजच नव्हता. अर्थात मी तुला पैसे देईन व तुझी ख्यालीखुशालीही पाहीन. मी अशी आशा करतो, की यामुळे तू चक्रावून जाणार नाहीस. माझ्या कामासाठी, ते चांगले ठरणार नाही.”

“मी जेवण आणते.” ती कसेबसे बोलू शकली. आणि यावेळेस त्याने तिला थांबवले नाही.

यापैकी कशावरही विश्वास न ठेवण्याची, तिची पहिली प्रतिक्रिया होती. कदाचित ती तिच्या कामाला लागली व काही ऐकलेच नाही असे भासवले. आणि नंतर ती जेव्हा एक प्रकारे जागी झाली, तेव्हा असे काही झालेच नाही, असे जणू समजू लागली.

ती जेव्हा खोलीत चालू लागली, तेव्हा तिच्या पायांना जमिनीचा स्पर्श जाणवेना. तिला काहीच जाणवेना. सर्व गोष्टी आपोआप होत होत्या.— खालच्या खोलीत पायऱ्या उतरून जाणे, दिवा लावणे, फ्रीज उघडून, आतमध्ये हाताला प्रथम लागलेली वस्तू धरणे.

मेंढीचा पाय. गोठलेला मेंढीचा पाय.

ठीक आहे. त्याना जेवणासाठी मेंढी असणार आहे. ती तो मेंढीचा पाय घेऊन वरती येते. हॉलमध्ये चालत येते. तो तिच्याकडे पाठ करून खिडकीजवळ उभा आहे, हे बघून ती थांबते.

तिचा आवाज आल्यावर न वळता, तो म्हणतो, “कृपया माझे जेवण बनवू नकोस. मी बाहेर चाललो आहे.”

या क्षणी मेरी मेलनी सरळ चालत, त्याच्या मागे जाते. आणि न थांबता, तिच्या हातातील गोठलेला मोठा मेंढीचा पाय हवेत उंच करून, जोराने त्याच्या डोक्याचा मागच्या बाजूला मारते.

जसे काही लोखंडी कांबीने, तिने त्याला मारले आहे, अशा तऱ्हेने तो खाली गालीच्यावर पडतो. छोटे टेबल कोलमडून, मोठा आवाज होतो. या क्रूर धडपडाटाने, ती भानावर येते. हळूहळू धक्क्यातून सावरते. आश्चर्यचकीत होऊन गार पडते. अजूनही तिने तिच्या दोन्ही हातात वेड्यासारखा, तो मेंढीचा पाय घट्ट धरून ठेवलेला आहे.

“मी त्याला ठार केले.” ती स्वतःलाच सांगते.

अचानक कसे काय कुणास ठाऊक, पण तिचे मन थाऱ्यावर येते. ती पोलीस गुप्तहेराची बायको असल्याने, तिला याची शिक्षा काय आहे, हे माहिती आहे. ते ठीक आहे. तिला काही फरक पडत नाही. खरे तर ती सुटकेचा सुस्कारा सोडते. पण दुसऱ्या बाजूने ती विचार करते, की मुलाचे काय? गरोदर, खुनी बाईसंबंधी काय कायदा आहे?

मेरी मेलनीला माहिती नाही. आणि ती कुठलाही धोका घ्यायला, तयार नाही.

ती मेंढीचा पाय घेऊन स्वयंपाकघरात जाते. एका पातेल्यात तो जोराने ठेऊन शेगडी पेटवते. मग तिचे हात स्वच्छ धुऊन, आरशात बघते. हसायचा प्रयत्न करते. “अरे सॅम, मला काही बटाटे हवे आहेत.” ती ओरडून बोलते. तिचा आवाज, विशेष भासतो.

ती खूप वेळा, सराव करते. मग कोट घालून, बाहेर पडते.

अजून सहाच वाजलेले असतात. अजून वाण्याच्या दुकानात उजेड असतो. ती लख्ख आवाजात हसत, तेथील विक्रेत्याला म्हणते, “कसे काय सॅम?”

“अरेच्या, शुभ संध्याकाळ, श्रीमती मेलनी. तुम्ही कशा आहात?”

“सॅम, मला अर्धा किलो बटाटे दे व मटाराची एक पिशवी.”

तो मनुष्य मटार घेण्यासाठी, मागील सामानाच्या भांडाराकडे वळतो.

ती त्याला म्हणते, ”आज पॅट्रीक दमला आहे, त्यामुळे आज आम्ही खायला बाहेर जात नाही आहोत. नाहीतर सहसा, गुरुवारी आम्ही बाहेर जातो.

आणि त्यामुळे आज त्याने मला, घरात काहीही भाज्या नसलेले, पकडले आहे.''

“श्रीमती मेलनी, मग मासाचे काय, ते नको?''

“नको. ते घरी आहे. माझ्या फ्रिजमध्ये छान मेंढीचा पाय आहे.''

“ठीक आहे.''

“सॅम, खरे तर मला फ्रीजमधून काढलेल्या गोष्टी शिजवायला आवडत नाहीत. तुला काय वाटते. ते नीट शिजेल का?''

“मला विचाराल तर काही फरक पडतो, असे मला वाटत नाही. तुम्हाला हे इडाहो ( एक प्रांत ) चे बटाटे देऊ का?''

“हो. हो. नक्कीच. अर्धा किलो दे.''

तो दुकानदार एका बाजूला मान वळवून, तिच्याकडे प्रसन्नपणे बघून म्हणतो, “अजून काही? जेवणानंतरचे काय? काही गोड पदार्थ?'

“तू काय सुचवशील, सॅम?''

तो माणूस दुकानात एक नजर टाकतो. “चीजकेक? मला माहिती आहे, की त्याला तो आवडतो.'

ती म्हणाली, “बरोबर. त्याला तो आवडतो.''

त्याने सर्व काही बांधून दिले. तिने पैसे दिले व हसून म्हणाली, “आभारी आहे, सॅम. शुभ रात्र.''

“शुभ रात्र, श्रीमती मेलनी. आभारी आहे.''

आणि आता घाईने परतताना, ती स्वतःशी म्हणते आता सर्व झाले. आता आपण घरी परतत आहोत. घरी नवरा, जेवणाची वाट बघतो आहे. आणि तो

मनुष्य बिचारा, दमलेला असल्याने तिला ते छान चविष्ट बनवायला हवे. ती घरात शिरेल, तेव्हा तिला काही वेगळेच आढळेल, वाईट, तिला दुःखी करणारे, ते तिला धक्का बसणारे आहे. अगदी सहजपणे बसलेला धक्का! ती दुःखाने व भीतीने वेडी होणार आहे. लक्षात घ्या, तिला असे काही दिसणे अपेक्षित नाही. गुरुवारी रात्री, नवऱ्याच्या जेवणासाठी भाज्या वगैरे सामान घेऊन परतणारी, ती श्रीमती मेरी  मेलनी आहे.

त्यामुळे जेव्हा ती मागील दाराने स्वयंपाकघरात जाते, तेव्हा ती स्वतःशीच हसत, एक धून गुणगुणत असते. जेव्हा ती त्याला, जमिनीवर पडलेले पहाते, तेव्हा तिला खरंच धक्का बसतो. तिचे जुने प्रेम व त्याच्यासाठी तरसणे, तिच्या डोळ्यासमोर तरळून जाते. ती त्याच्या शेजारी गुडघ्यांवर बसून, धाय मोकलून रडायला लागते. अभिनय करायची काही जरुरी नसते.

थोड्या वेळाने ती उठते व एका माणसाला फोन करते. ती ओरडते, “लवकर ये. पॅट्रीक मेला आहे. अगदी धावत ये.”

‘कोण बोलते आहे?”

“श्रीमती मेलनी. श्रीमती पॅट्रीक मेलनी.”

“म्हणजे मेलनीचा नवरा, पॅट्रीक मेला आहे?”

“असे मला वाटते.” ती हुंदके देत बोलते.

तो मनुष्य म्हणतो, “मी आलोच.”

लगेचच एक गाडी येते व ती पुढचे दार उघडते, तेव्हा दोन पोलीस आत येतात. तिला ते दोघेही माहिती आहेत. — तिला पोलीस चौकीतील

जवळजवळ सर्व लोक, माहिती आहेत. ती जोरजोराने रडायचा कांगावा करते, जॅक नूननच्या गळयात पडते. थोडक्यात, ती तिची गोष्ट सांगते, कशी ती वाण्याच्या दुकानात गेली व परत आल्यावर कसे त्याला फरशीवर पडलेले पाहिले. परत अगदी पहिल्यापासून ती, तिची गोष्ट सांगते, ती शिवणकाम करत असताना कसा पॅट्रीक येतो, दमलेला असल्याने कसे जेवायला बाहेर न जाण्याचे सुचवतो व ती कशी मास शिजत ठेवत असल्याचे, त्याला सांगते. “आता ते आत शिजत पडले आहे.” — आणि कशी ती भाज्या आणायला बाहेर पडते व आल्यावर त्याला फरशीवर मरून पडलेले पहाते.

“कुठले दुकान?” एक गुप्तहेर विचारतो.

ती त्याला सांगते. तो लगेच दुसऱ्या गुप्तहेराच्या कानात काही सांगतो व दुसरा लगेच रस्त्यावर बाहेर पडतो. १५ मिनिटात तो कागदावर, लिखित स्वरूपात माहिती घेऊन परततो. तिच्या हुंदक्यांच्या आवाजात, ती उडत उडत काही बोलणे ऐकते. ‘नेहमीसारखीच वाटत होती. — आनंदी — त्याला चांगले जेवण देण्याची इच्छा असलेली — मटार — चीजकेक — हे अशक्य आहे की ती — ‘

काही वेळाने डॉक्टर निघून गेल्यावर, दोन माणसे येऊन, प्रेत घेऊन जातात. दोन गुप्तहेर व पोलीस मात्र तिथेच रहातात.

जॅक नूनन तिच्याशी शांतपणे बोलतो. पाठीमागून डोक्यावर जोराने मारलेल्या प्रहारामुळे, तिचा नवरा मेल्याचे, तो तिला सांगतो. नक्कीच एखाद्या मोठ्या लोखंडी कांबीने, हे केले गेले असल्याचा संशय, तो व्यक्त करतो. खुनी

ते हत्यार, बहुतेक बरोबर घेऊन गेला असावा, असे तो म्हणतो, पण कदाचित त्याने ते इथेच जवळपास कुठेतरी टाकले किंवा लपवले असल्याची, शक्यताही तो बोलून दाखवतो.

तो म्हणतो, 'ही नेहमीचीच गोष्ट आहे. हत्यार सापडले की खुनी मिळालाच असे समजा. घरात हत्यारासारखे वापरता येईल, असे काही तिला माहिती आहे का? उदाहरणार्थ, एखादी मोठी फुलदाणी किंवा तत्सम काही शस्त्र?''

असे घरात काही नसल्याचे, ती सांगते.

''एखादे मोठे हत्यार?''

ती नाही म्हणते. पण कदाचित गॅरेजमध्ये असे काही असू शकेल, असे बोलते. तिला खुर्चीवर बसलेले तसेच सोडून, ते घरभर व गॅरेजमध्ये शोध घेतात. तिला घरभर त्यांचा पायरव ऐकू येतो. पडद्याआडून टाकलेला विजेरीचा प्रकाशही तिला दिसतो. उशीर व्हायला लागतो. शेकोटीच्या वरील बाजूस ठेवलेल्या घड्याळात नऊ वाजलेले, तिला दिसतात. शोध घेणारी माणसे पण दमलेली वाटतात.

तरी शोध जारी रहातो. सार्जंट जॅक नूनन स्वयंपाकघरातून बाहेर येत म्हणतो, 'हे बघा श्रीमती मेलनी, आत अजून विस्तव चालू आहे व मास शिजते आहे.

ती ओरडते, '' अरे हो, असे आहे नाही का!''

''मी तो विस्तव, तुमच्यासाठी बंद करतो. ते बरे, नाही का?''

“जॅक, तू ते करशील का? आभारी आहे.”

जेव्हा सार्जंट ते काम करून बाहेर येतो, तेव्हा ती त्याच्याकडे, तिच्या मोठ्या पाणावलेल्या डोळ्यांनी बघत बोलते, “जॅक नूनन.”

“काय?” तो विचारतो.

“तू माझ्यासाठी अजून एक गोष्ट करशील का? तू आणि तुझे हे बाकीचे लोक.”

“आम्ही प्रयत्न करू, श्रीमती मेलनी.”

ती म्हणते, “हे बघा, तुम्ही सगळे इथे आहात. तुम्ही माझ्या प्रिय पॅट्रीकचे मित्रही आहात. तुम्ही खुनी शोधायचा प्रयत्न करत आहात. आतापर्यंत तुम्हाला, सडकून भूक लागली असणार. आणि मी जर तुम्हाला अगत्य दाखवले नाही तर, पॅट्रीक मला कधीच क्षमा करणार नाही. मी शिजवलेला मेंढीचा पाय तुम्ही का खात नाही? आतापर्यंत तो चांगला शिजला असेल.”

सार्जंट जॅक नूनन म्हणाला, “काय म्हणालात? मी याची कल्पनाही करू शकत नाही.”

तिने विनंती केली, “कृपया, मी त्याला शिवू शकत नाही. जर तुम्ही तुमच्या हाताने घेऊन, तो खाल्लात तर माझ्यावर उपकार होतील. त्यानंतर मग परत, तुम्ही तुमच्या कामाला लागू शकता.”

त्या चार पोलिसांमध्ये बराच वेळ, नको नको चालले होते. पण त्याना खरेच, भूक लागली होती. शेवटी त्यांनी स्वयंपाकघरात जाऊन, तो खायचा

ठरवले. स्वतःच्या जागेवर बसून, उघड्या दारातून ती त्यांचे आवाज ऐकत राहिली. तोबरा भरल्याने, ते निसरडे व घोगरे येत होते.

“थोडे अजून घे, चार्ली.”

“नको ते संपवायला नको.”

“तिने आपल्याला ते संपवायला, सांगितले आहे. ती तसे म्हणाली.”

त्यांच्यापैकी एकजण म्हणत होता, “गरीब बिचाऱ्या पॅट्रीकला मारायला, एखादी मोठी काठी त्या खुन्याने वापरली असणार.”

“म्हणूनच ती खरे तर, शोधायला सोपी असली पाहिजे.”

“मी सुद्धा तेच म्हणतो आहे.”

“ज्यांनी कोणी हे केले, त्यांनी ती काठी काही, स्वतःबरोबर नेली नसणार. आता त्याना, तिची काय जरुरी असणार?”


त्यांच्यापैकी एकाने, ढेकर दिली.

“व्यक्तिशः मला असे वाटते, की ते हत्यार इथेच कुठेतरी जवळपास असले पाहिजे. कदाचित आपल्या अगदी जवळ.”

दुसऱ्या खोलीत मेरी मेलनीला गालातल्या गालात हसू येऊ लागले.

# A Question Of Taste

# अभिरुचीचा प्रश्न



त्या रात्री लंडनमधील माईकच्या घरी आम्ही सहाजण जेवणासाठी जमलो होतो. माईक, त्याची बायको व मुलगी, मी, माझी बायको व अजून एकजण म्हणजे रिचर्ड.

रिचर्ड हा प्रसिद्ध वाइनपारखी होता. वाइनमधील त्याची अभिरुची वाखाणण्यासारखी होती. 'चैनी' नावाच्या मंडळाचा तो अध्यक्ष होता. चमचमीत पदार्थ किंवा दुर्मिळ वाइन्सची जेवणे तो आयोजित करत असे. त्याची चव घेण्याची क्षमता कमी होईल, म्हणून तो सिगरेट ओढत नसे. वाइनबद्दल

बोलतांना तिचा जिवंत प्राण्यासारखा उल्लेख करायची त्याची विचित्र सवय होती. ‘चांगली विनोदबुद्धी असलेली वाइन’ किंवा ‘दयाळू व आनंदी वाइन’ असे तो म्हणे.

रिचर्ड तिथे असतांना दोनदा माईककडे रात्रीच्या जेवणासाठी मी गेलो होतो. प्रत्येक वेळेस माईकने रेड वाइनची जात कुठली आहे व ती कुठल्या द्राक्षांपासून बनवली आहे, याबद्दल पैज लावायचा खेळ खेळला  होता. त्याने रिचर्डला असे आव्हान दिले होते, की त्याला ते नक्कीच सांगता येणार नाही. पण दोन्ही वेळेस रिचर्डने पैज जिंकली होती. आज पण तो पैजेचा खेळ परत होणार, याबद्दल मला खात्रीच होती. माईकच्या वाइनचा दर्जा उत्तमच आहे, हे सिद्ध होण्यासाठी माईक पैज हरायला तयार होता. व रिचर्डला त्याचे ज्ञान प्रगट करायची खुमखुमी होतीच.

त्या दिवशी मोसेल वाइन व मासे असा बेत होता. माईकने स्वतः वाइन ओतली व तो खाली बसला. तो रिचर्डकडे बघत असलेला मी पाहिला. त्याने बाटली माझ्यासमोर अशा तऱ्हेने ठेवली, की त्यावरील नावाची अक्षरे, ‘गिअर्सले ओहलीस्गबर्ग १९४५’ ही मला वाचता यावी. मोसेल नावाच्या विभागात गिअर्सले नावाचे खेडेगाव आहे, असे माईक कुजबुजला व जर्मनीबाहेर बहुधा ते कुणालाच माहिती नाही, अशी पुस्तीही जोडली.

जेव्हा माशांच्या थाळया उचलण्यासाठी नोकराणी आली, तेव्हा रिचर्डने त्याच्या थाळीला हातही लावला नव्हता. माईकची मुलगी ल्युसी हिच्याबरोबरील संभाषणात तो पूर्णपणे गुंग झाला होता. बोलता बोलता, तो

तिच्या जवळ जवळ जात होता. उत्सुकतेची सीमा गाठून, तिला अगदी भिडायलाच आला होता. बिचारी मुलगी त्याच्यापासून लांब होण्याच्या प्रयत्नात इतकी एका बाजूला झुकली होती व नाखुशीने पण नम्रपणे त्याच्या बोलण्यावर मान डोलवत होती.

नोकराणीला आलेले बघून रिचर्डने काट्यांची जलद हालचाल करून, खायला सुरवात केली. दोन लहान घासांमध्ये वाइन घशाखाली रिचवून, ताबडतोब तो परत ल्युसीबरोबरील संभाषणाकडे वळला.

माईकचा चेहरा हळूहळू कमी आनंदित होत गेलेला दिसत होता, पण त्याने तो सावरून धरला होता. भाजलेले मोठे मांस वाढण्यासाठी नोकराणी आली. माईक उभा राहिला. त्याने ते तुकडे करून, प्रत्येकाला वाढले व आम्हाला सर्वांना उद्देशून, पण रिचर्डकडे बघत म्हणाला, “मला जाऊन रेड वाइन आणायला हवी.”

मी म्हणालो, “काय रे माईक, ती कुठे आहे?”

“माझ्या अभ्यासिकेत कमी थंड होण्यासाठी बूच काढून ठेवलेली आहे.”

“अभ्यासिकेत का?”

“ती घरातील सर्वात चांगली जागा आहे. मागील वेळी रिचर्ड इथे आला होता, तेव्हा त्यानेच ती निवडायला मला मदत केली.”

त्याने केलेल्या कामगिरीचा उल्लेख ऐकून, रिचर्डने आजूबाजूला बघत मान डोलवली.

माईक म्हणाला, “माझ्या अभ्यासिकेत, हिरव्या फाईलींच्या कप्प्यावर काही कागदपत्रे नसलेली, हवेशीर मोकळी जागा आहे. आम्ही ती निवडली आहे. माफ करा, मी आता आत जातो आहे.”

तो परतला, तेव्हा त्याच्या दोन्ही हातात एक गडद रंगाची बाटली असलेली वाइनची टोपली होती. त्याच्यावरची नावाची अक्षरे खाली गेल्याने, दिसत नव्हती. “रिचर्ड, तुला याचे नाव सांगताच येणार नाही. पुढच्या शंभर वर्षात सुद्धा नाही.”

रिचर्डने भुवया उंचावून पाहिले --- किंचित आढ्यताखोर भुवयांची कमान --- खालचा ओलसर ओठ त्याने बाहेर ढकलला होता. अचानक तो हुकुमत गाजवणारा व कुरूप दिसू लागला.

त्याने सौम्य आवाजात विचारले, “रेड वाइन?”

“अर्थात.”

“वर्षातील चांगल्यापैकी एक?”

“हो --- अगदी खात्रीने.”

फारच उद्विग्न झाल्याप्रमाणे दिसणाऱ्या रिचर्डने म्हटले, “ते फारसे कठीण नाही.” मला त्याच्या उद्विग्नतेत आणखी काही विचित्र वाटले. त्याच्या डोळ्यांमध्ये काही दुष्ट छाया तरळत होती.

“हिचे नाव सांगणे खरेच अवघड आहे. मी तुला पैज लावायची सक्ती करणार नाही.”

“हे बघ, असे करणे माझ्यासाठी फारसे भूषणावह नाही.”

माईक म्हणाला, “माझ्या प्रिय मित्रा, तू म्हणत असशील, तर मी तुला आवडेल, त्याची पैज लावायला तयार आहे.”

ओठांच्या कोपऱ्यात हसू खेळवत, रिचर्ड खुर्चीत मागे रेलून बसला. त्याच्या काळया डोळयांच्या मध्यभागी आढ्यताखोरपणाची एक लहानशी हळूवार चमक लपलेली होती. व चेहरा ठळकपणे अस्वस्थ झालेला मला दिसत होता. त्या तीन महिला व मी त्या दोन माणसांचे निरीक्षण करत होतो. आमच्यासमोरील थाळयांमधून भाजलेले, वाफा येणारे मांस होते.

रिचर्ड म्हणाला, “तू म्हणतो आहेस, तर कसली पैज ते मी सांगू का?”

माईक बोलला, “हो, सांग ना.”

थोडा वेळ शांतता पसरली. रिचर्डने हळूच टेबलाभोवती पाहिले. आमच्यापैकी प्रत्येकजण या पैजेचा साक्षीदार आहे, याची खात्री करण्यासाठी, तो प्रत्येकाला जणू दटावत होता. भाज्यांची थाळी हातात घेतलेली नोकराणी आत यावे की नाही, अशा संभ्रमात पडलेली मी पाहिली.

रिचर्डने जाहीर केले, “ठीक तर मग, मी माझ्या दोन्ही घरांची पैज लावतो आणि तू कसली पैज लावावीस, तेही सांगतो.

माईक घाईघाईने म्हणाला, “सांग, सांग --- चालू कर.”

पुन्हा रिचर्डच्या ओठांच्या कोपऱ्यात हसू उमटले. माईककडे सर्व वेळ रोखून बघत, तो म्हणाला, “तू हरलास, तर तुझ्या मुलीशी लग्न लावण्यासाठी, तिचा हात तू माझ्या हातात द्यावास.”

ल्युसी टुणकन उडी मारून ओरडली, "नाही. नाही. हे बघा डॅडी, ही काही गंमत नाही."

माईकने त्याच्या मुलीकडे पाहिले व वडीलकीचे जपणूकीचे हसू हसला. "हे बघ ल्युसी, आपल्याला याबाबत थोडा विचार केला पाहिजे."

"डॅडी, आता हे थांबवा."

"मुली, एक मिनिट थांब. असे पहा, शक्यतोवर तो जिंकणारच नाही. तू चांगले पैसे कमावशील. जर ही पैज तू स्विकारलीस, तर तुला दोन मोठी घरे मिळतील.

"अहो डॅडी, मला हे पसंत नाही. हे मूर्खपणाचे आहे."

बोलतांना तिचा हात तावातावाने वरखाली करत, तिची आई म्हणाली, "मलाही तसेच वाटते. मायकेल, अशी एखादी गोष्ट सुचवण्याचा विचार तरी तू कसा करू शकतोस? तुला स्वतःची लाज वाटली पाहिजे. ती तुझी स्वतःची मुलगी असून, तू असा वागतोस?" माईकने तिच्याकडे पाहिलेही नाही. मुलीकडे उत्सुकतेने पहात तो म्हणाला, "तू ही पैज घे, तू हरणार नाहीस, याची खात्री मी देतो."

माईक त्याच्या चमकत्या, विस्फारलेल्या डोळ्यांनी ल्युसीकडे टक लाऊन पहात होता. त्यामुळे मुलीला त्याला विरोध करणे अवघड जात होते.

"पण मी हरले, तर काय?"

"मी तुला सांगतो आहे, तू हरणारच नाहीस."

शेवटचा प्रयत्न म्हणून तिने एकदा कां कू करून पाहिले व मग

अगतिकतेने खांदे उडवले. ती म्हणाली, “बर तर, ठीक आहे. पण फक्त तुम्ही त्यात धोका नाही, असे म्हणत आहात म्हणून!”

माईक ओरडला, “छान, मग लागली तर पैज.”

मुलीकडे बघत रिचर्ड म्हणाला, “पैज लागली.”

लगेच माईकने छोटे माप भरून वाइन स्वतःच्या पेल्यात ओतली. मग अधीरतेने टेबलाभोवती फिरून दुसऱ्यांचे पेलेही भरले. रिचर्डने त्याचा पेला उचलून नाकाशी नेला, हे सर्वजण बघत होते. तो मनुष्य साधारण पन्नास वर्षांचा होता. त्याचा चेहरा सुखकारक नव्हता. खरे तर ते सर्व तोंडच होते, आ वासलेले! ओठाचा खालचा भाग लोंबकाळत होता. जणू तो चव बघण्यासाठी, पेल्याची कड पकडण्यासाठी किंवा घोट गिळण्यासाठी, कायम उघडाच होता. मला तो भाग एखाद्या विवरासारखा वाटला.

हळूहळू त्याने पेला नाकापर्यंत आणला. नाकाचे टोक पेल्यात बुडाले. वाइनच्या पातळीपर्यंत फिरून, ते नाजूकपणे वास घेऊ लागले. त्याने वाइन हळूवारपणे ढवळली व तिच्या वासाचे गुणधर्म जाणून घ्यायचा प्रयत्न करू लागला. अगदी एकाग्रतेने त्याची समाधी लागली होती. त्याने डोळे मिटून घेतले होते. आता कंबरेपासून वरचे अर्धे शरीर --- डोके, मान व छाती, जणू वास हुंगणारे व गाळणारे यंत्रच बनले होते. त्या वासाचे विश्लेषण करणे चालू होते.

निदान एक मिनिटभर वास घेणे चालू होते. मग डोळे न उघडता रिचर्डने पेला खाली आणला. तोंडाला लाऊन, अर्धा रिकामा केला. तोंडात वाइन ठेऊन

तो तसाच थांबला. मग पहिल्या घुटक्याची चव घेतली. काही वाइन त्याने घशाखाली जाऊ दिली. पण बरीचशी तोंडातच धरून ठेवली. आता त्याने तोंडावाटे ओठातून थोडीशी हवा आत ओढून घेतली. ती तोंडातील वाइनच्या दर्पाबरोबर मिसळून खाली फुफ्फुसात गेली. त्याने श्वास रोखून धरला. नाकातून बाहेर सोडला. मग जिभेखाली वाइन खुळखुळवायला सुरवात केली. पाव असल्यासारखी ती दातांनी चावायला सुरवात केली.

ही फारच छाप पाडणारी करामत होती.

त्याने पेला खाली ठेवला. गुलाबी जीभ ओठांवरून फिरवत तो म्हणाला, “ओहो, फारच रुचीपूर्ण छोटीशी वाइन! सभ्य आणि डौलदार!”

त्याच्या तोंडात फारच लाळ साठली होती. बोलतांना त्यातील काही भाग टेबलावर सांडत होता.

तो म्हणाला, “आता आपण एकेका शक्यतेचा निकाल लाऊ. सहसा कदाचित मी थोडी संधी घेतली असती. झटपट आस्वाद घेत, मी द्राक्षांच्या मळयातच उभा राहिलो असतो. पण आता मला खूप सावधानतेने पाऊले टाकायला हवीत, नाही का? जाड, ओलसर ओठांनी तो माईककडे बघून हसला. माईक हसला नाही. तर मग पहिल्यांदा बोर्डेक्समधील कुठल्या जिल्ह्यातून ही वाइन आली आहे, ते बघावे लागेल. इमिलीऑस किंवा ग्रेव्ह्जमधून यायला तिचा पोत फारच हलका आहे. ती नक्की मेडॉकची आहे.

आता असे बघू, की ती मेडॉकमधील कुठल्या परगण्यातून आली असावी. मारगॉक्स नाही. नाही. मारगॉकसचा आक्रमक परिमळ त्यात नाही.

पॉलिलॅक? पण पॉलिलॅकचा गुणधर्म म्हणजे तिची हुकमती चव, ती तर हिच्यात नाही. वाइनच्या पहिल्या घोटाची चव शांत व लाजरी आहे. पण सेकंदातच ती लाजरेपणातून डौलदार होते. दुसऱ्या घोटात कदाचित थोडी धूर्त व अवखळ वाटते. टॅनीनच्या कणभर चवीने ती जणू जिभेला चिडवत असते. नंतर तिची चव आनंददायक, स्त्रीगुणधर्मीय व सांत्वन करणारी वाटते. न चुकता सांगायचे, तर ही सेंट ज्युलियन आहे.

त्याने त्याचे हात छातीच्या वर धरले. बोटांची टोके काळजीपूर्वक जुळवली. तो विचित्रपणे दिमाखदार दिसू लागला होता. मला असे वाटले, की माईकला हिणवण्यासाठी, तो मुद्दाम असे करत होता.

"आता आपण अधिक कठीण भागाकडे येत आहोत. त्या द्राक्षमळ्याचे नाव! सेंट ज्युलियनमध्ये खूप द्राक्षबागा आहेत. मला फारच काळजीपूर्वक पुढे गेले पाहिजे."

कमालीची एकाग्रता साधत, त्याने त्याच्या दबलेल्या व मध्येच लोंबकळणाऱ्या खालच्या ओठावर पेल्याची कडा ठेवली. त्याची गुलाबी टोकदार जीभ बाहेर येऊन, वाइनमध्ये बुडत होती. परत बाहेर येत होती. हे अगदी किळसवाणे दृष्य होते. त्याचे डोळे बंद होते. चेहऱ्यावर एकतानता होती. फक्त ओठ हलत होते. दोन ओल्या प्रसरणशील घसरड्या रबराप्रमाणे ती हालचाल वाटत होती. "ही परत तीच ॲनिकची मध्यम व चटकन जिभेवर पसरणारी तुरट चव. हो, आता मला समजले. ही वाइन बेंचव्हीलमधील छोट्या द्राक्षमळ्यातून आलेली आहे. ती खुद्द बेंचव्हीलमधूनच आली असेल का?

नाही. तसे वाटत नाही. पण त्याजवळ असलेले चॅटॅऊ, तालबोट असू शकेल का?

त्याने परत एक वाइनचा घुटका घेतला. रिचर्डवर नजर ठेऊन माईक अधिकाधिक पुढे झुकत असताना मी पाहिला.

रिचर्डने पुढे चालू ठेवले. "जर ती ३४ असेल, मला तशी खात्री आहेच, तर मग तालबोट नाही. बेंचव्हीलही नाही व तालबोटही नाही. तरीही दोन्हीपासून खूप जवळ. इतकी जवळ की तो द्राक्षमळा दोन्हीच्या मध्येच असला पाहिले."

त्याने चुळबुळ केली व मान हलवली. आता सर्वजण त्याच्याकडे बघत होते. माझ्या मागील टेबलावर नोकराणीने हळूच भाज्या ठेवल्या, जेणेकरून शांततेचा भंग होऊ नये.

रिचर्ड ओरडला, "मला वाटते, मला ते सापडले."

वाइनचा शेवटचा घोट त्याने घेतला. माईककडे वळून तो हळूवारपणे हसला व म्हणाला, "हे काय आहे, माहिती आहे का? ती छोटी चॅटॅऊ ब्रॅनेर डुक्रु आहे व वर्ष आहे १९३४."

माईक म्हणाला, "हे तुझे पक्के उत्तर आहे का?"

"हो मला असेच वाटते, ती चॅटॅऊ ब्रॅनेर डुक्रु आहे. ती छान द्राक्षबाग आहे. मला ती चांगली माहिती आहे. ती पाहिल्याबरोबरच मी कशी काय ओळखली नाही कुणास ठाऊक!"

जणू सर्व बळ काढून घेतल्याप्रमाणे, माईक अगदी शांत बसला होता.

रिचर्ड माईकला म्हणाला, “मग आता का थांबला आहेस? मला बाटलीवर काय लिहिले आहे, ते बघायचे आहे. ती माझ्याकडे वळव.”

रिचर्डला माहिती होते, की आता तो जिंकला आहे. मला त्याच्यात जेत्याची गुर्मी दिसत होती. आता कोणी काही हरकत घेतली, तर तो आक्रमक होईल, असे दिसत होते.

काळया पांढऱ्या वेषातील नोकराणीची ताठ बटुमूर्ती रिचर्डच्या शेजारी उभी होती. तिच्या हातात काहीतरी होते.

ती म्हणाली, “सर, मला वाटते, हा तुमचा आहे.”

ती त्याला दाखवत असलेला चष्मा त्याने क्षणभर पाहिला व नाकारत तो म्हणाला, “माझा?”

“हो सर, तो तुमचाच आहे. ”साठ ते सत्तरच्या दरम्यान वय असलेली ती नोकराणी त्या कुटुंबाची बऱ्याच वर्षापासूनची विश्वासू नोकराणी होती. तिने चष्मा त्याच्या शेजारी ठेवला. तिची ताठ उभी रहाणारी बटुमूर्ती काही वेगळीच भासत होती. त्यामुळे मी तिच्याकडे खिळल्यासारखा बघत राहिलो.

तिच्या करड्या वयस्क चेहऱ्यावर थंड पण ठाम भाव होते. हनुवटी बाहेर येऊन, ओठ दाबले गेले होते. तिने दोन्ही हात एकमेकात घट्ट गुंफले होते. डोक्यावरील उत्सुक टोपी आणि गणवेषच्या खाली झळकणाऱ्या घोळामुळे ती एखाद्या पांढऱ्या छातीच्या छोट्या अस्वस्थ पक्षासारखी भासत होती.

ती म्हणाली, “तुम्ही तो श्री माईक यांच्या अभ्यासिकेत विसरला होतात.” तिचा आवाज तिने मुद्दाम होऊन नम्र केला होता. “त्यांच्या अभ्यासिकेत,

हिरव्या फाईल्सच्या कप्प्यात मला तो सापडला. जेवणापूर्वी तुम्ही तिकडे गेला होतात, तेव्हा राहिला असेल.”

तिच्या शब्दांच्या अर्थाचे आकलन होण्यात, काही क्षण गेले. माईक त्याच्या खुर्चीत हळूहळू सावरून बसला. त्याचा चेहरा उजळलेला मी पाहिला. त्याचे डोळे विस्फारले होते. तोंडाचा आ वासलेला होता. नाकपुड्यांच्या भागात पांढुरका रंग पसरू लागला होता.

त्याची बायको म्हणाली, “मायकेल, माझ्या राजा, आता  शांत रहा बघू. गप्प रहा.”

तरीही माईकच्या चेहऱ्यावरील आनंदाचे भाव व पैज न हरल्याची ख़ुशी, अगदी ओसंडून वहात होती. ल्युसीने एक निःश्वास टाकलेला मी पाहिला.

# The Land Lady
# मालकीणबाई



बिली विव्हर लंडनपासून दुपारच्या धीम्या, वाटेत स्विंडनला बदलायच्या गाडीने बाथला साधारण रात्री नऊ वाजता उतरला. चांदण्यांनी भरलेल्या आकाशातून स्टेशनबाहेरील घरांच्या मागून, चंद्र वरती येत होता. हवा खूपच गार होती आणि वारा त्याच्या गालाला बर्फाच्या चपट्या पात्यासारखा चाटून जात होता.

त्याने हमालाला विचारले, “माफ करा, पण येथून फार लांब नाही, असे एखादे स्वस्त हॉटेल आहे का?”

रस्त्याकडे निर्देश करत, हमाल बोलला, ‘बिल आणि ड्रॅगन’ मध्ये जाऊन बघा. तिथे कदाचित जागा असेल. या दुसऱ्या बाजूने ते पाव मैलावर असेल.”

बिलने त्याचे आभार मानले व बॅग उचलून, तो चालायला लागला. तो यापूर्वी कधी बाथला आला नव्हता. त्याला इथे रहाणारे कुणी माहिती नव्हते. पण लंडनच्या मुख्य कार्यालयातील मिस्टर ग्रीनस्लेड यांनी त्याला ते छान शहर असल्याचे सांगितले होते. तो म्हणाला, “तू स्वतः रहायची जागा शोध आणि मग जरा स्थिरस्थावर झाल्यावर लगेच तेथील शाखेच्या व्यवस्थापकाला जाऊन भेट.”

बिली सतरा वर्षांचा होता. त्याने नवीन निळा मोठा कोट, नवीन तपकिरी मऊ फेल्ट टोपी व नवीन तपकिरी सूट घातला होता. त्याला मस्त वाटत होते. तो रस्त्याने भरभर चालत होता. हल्ली तो सगळ्या गोष्टी भरभर करत असे. त्याने ठरवले होते, की चटपटीतपणा हा सगळ्या यशस्वी व्यावसायिकाचा साधारण गुण असतो. मुख्य कार्यालयातील, मोठ्या लोकांना वेळ फार कमी असतो व ते आश्चर्यकारक असतात. तो चालत असलेल्या या रुंद रस्त्यावर दुकाने नव्हती. दोन्ही बाजूंना फक्त उंच घरे होती. त्याना पुढील बाजूला शेड होती व पुढील दाराला चार पाच पायऱ्या होत्या. हे सरळ होते, की एके काळी ती मोठी आरामशीर व चैनीची रहायची घरे असणार पण आता अंधारातही त्यांच्या दाराच्या लाकडावरील रंग निघालेला दिसत होता आणि पांढऱ्या

देखण्या खिडक्यांना तडे गेले होते व त्या दुर्लक्षित दिसत होत्या. अचानक खालील बाजूच्या, रस्त्यावरील  दिव्याचा प्रकाश पडलेल्या, फारशा लांब नसलेल्या खिडकीच्या काचेला एक छापील सूचना लावलेली बिलीला दिसली. त्यात लिहिले होते,  'अंथरूण व न्याहारी' त्याखाली एक उंच सुंदर विलोचे झुडूप उभे होते.

तो चालायचा थांबला. थोडा जवळ गेला. हिरवे पडदे [बहुधा मखमलचे] खिडकीला टांगलेले होते. विलोचे झाड त्याशेजारी शोभून दिसत होते. तो तिथे गेला व काचेतून आत खोलीत पाहिले. पहिली गोष्ट त्याने कुठली पाहिली असेल, तर धगधगलेली शेकोटी. त्यासमोर गालीच्यावर सुंदर छोटा कुत्रा, त्याचे नाक पोटाला लाऊन, अंग मुडपून झोपला होता. अर्धवट अंधारात त्याला खोली चांगल्या फर्निचरने सजवलेली दिसली. तिथे एक लहान पियानो, मोठा सोफा आणि एका कोपऱ्यात गुबगुबीत हाताच्या खूप खुर्च्या होत्या. एका कोपऱ्यात मोठ्या पोपटाचा पिंजरा होता. असल्या जागेतील प्राणी चांगली खूण दर्शवत होते. बिली स्वतःशी बोलला, की रहाण्यासाठी, हे मस्त घर दिसते आहे. 'बिल आणि ड्रॅगन' पेक्षा नक्कीच हे जास्त आरामशीर असेल. हॉटेलपेक्षा दारू व इतर काही पदार्थांच्या विक्रीचे दुकान जास्त रुचीपूर्ण असेल. संध्याकाळी तिथे बिअर व काही खाद्यपदार्थ मिळू शकतील. बोलायला भरपूर लोक असतील. स्वस्तही असेल. तो यापूर्वी काही रात्री अशा ठिकाणी राहिला होता आणि त्याला ते आवडले होते. पण तो कधी बोर्डिंग हाऊसमध्ये राहिला नव्हता. आणि प्रामाणिकपणे सांगायचे तर, तो त्यांना थोडा घाबरलेला होता. नावावरूनच ते पाणचट कोबी, लोभी मालकीणबाई व उग्र वासाचे

दिवाणखान्यातील हेरिंग मासे असलेले असे काही वाटत होते. काही ठरवण्यापूर्वी बिलीने दोन तीन मिनिटे हो नाही करत घालवली व पुढे चालत राहून 'बिल आणि ड्रॅगन' पहायचे ठरवले. तो पुढे जाण्यासाठी वळला आणि आता एक विचित्र गोष्ट झाली. तो मागे पाऊल घ्यायला व खिडकीपासून वळायला बघत होता, तेव्हा विशेष पद्धतीने त्याची नजर एका लहानशा सूचनेवर पडली. 'अंथरूण व न्याहारी', 'अंथरूण व न्याहारी', 'अंथरूण व न्याहारी' प्रत्येक शब्द म्हणजे जसा काही काचेतून एक काळा मोठा डोळा त्याच्याकडे बघत होता. त्याला जखडून ठेवत होता व त्याला भूल पाडत होता. त्याला त्या घरापासून दूर जाऊन देत नव्हता. पुढची गोष्ट त्याने काय केली असेल, तर तो खिडकीपासून हलला आणि आणि पायऱ्या चढून, घराच्या पुढील दाराकडे गेला. त्याने घंटी वाजवली. लांबच्या मागील खोलीत त्याने घंटीचा आवाज ऐकला. त्याने घंटीवरुन बोट काढायच्या आतच दार सताड उघडले आणि एक बाई तिथे उभी राहिली. सहसा घंटी वाजवल्यापासून, ते दार उघडेपर्यंत निदान अर्धा मिनिट तरी थांबावे लागते. पण ही बाई तर इतक्या झटपट आली की त्याने उडीच मारली. तिचे वय पंचेचाळीस ते पन्नासमधले वाटत होते. तिने त्याचे हसून स्वागत केले. ती दार धरत आल्हादकपणे बोलली, "कृपया, आत या." तिच्यापाठोपाठ आत जाण्याची प्रबळ इच्छा त्याला झाली.

तो म्हणाला, "मी काचेवरची सूचना वाचली."

"हो, मला माहिती आहे."

"मला एक खोली पाहिजे होती."

ती म्हणाली, “अरे, तुझ्यासाठी ती तयारच आहे.”

"मी खिडकीवरील सूचना वाचली.

तिचा चेहरा गोल, गुलाबी होता आणि डोळे निळे होते.

बिली तिला म्हणाला, “मी ‘बिल आणि ड्रॅगन’ च्या वाटेवर होतो. पण तुमच्या सूचनेने माझे लक्ष वेधून घेतले.”

ती म्हणाली, “अरे मुला, तू बाहेरच्या गारठ्यातून आत का येत नाहीस?”

“खोलीचे भाडे किती आहे?”

“न्याहारी धरून, पाच शिलिंग आणि सहा पेन्स.”

हे खूपच स्वस्त होते. तो द्यायला तयार होता, त्याच्या अर्धेच हे होते.

ती पुढे बोलली, ‘जे जास्त वाटत असेल, तर मी थोडे कमी करू शकते. तुला न्याहारीला अंडे चालेल का? हल्ली अंडी महाग आहेत.”

“जर अंडे नको असेल तर भाडे पाच शिलिंग पडेल.

तो उत्तरला, “पाच शिलिंग आणि सहा पेन्स ठीक आहे. मला इथे रहायला आवडेल.”

“मला ते माहिती होते. आत ये.”

ती फारच अगत्यशील दिसत होती. ख्रिसमसच्या सुट्टीत घरी बोलावणाऱ्या शाळेतील जिवलग मित्राच्या आईसारखी ती दिसत होती. बिलीने टोपी काढली आणि आत आला. ती म्हणाली, “ती तिथे लावा. आणि मी तुला तुझा कोट काढायला मदत करते.”

त्या हॉलमध्ये अजून टोप्या किंवा कोट नव्हते. काठ्या किंवा छत्र्या नव्हत्या. काहीच नव्हते. त्याला वर घेऊन जातांना ती त्याच्याकडे बघून हसत म्हणाली, “इथे फक्त आपले आपणच आहोत. मला नवीन माणसाला माझ्या घरात घेतांना आनंद होत आहे.”

बिली स्वतःशी बोलला, “ही मोठी मुलगी थोडी वेडी आहे का?” पण पाच शिलिंग आणि सहा पेन्स इतकी स्वस्त जागा त्याला कुठे मिळणार होती? तो नम्रपणे बोलला, “तू भाडेकरू शोधण्यात खूपच चांगली असावीस.”

“अरे मुला, मी खरेच तशी आहे. पण तरी मी थोडीशी निवड करणारी आहे. मी काय म्हणते आहे, ते तुला कळेल.”

“ओहो, हो.”

‘पण मी नेहमी तयार असते. या घरात कुणी अचानक टपकले, तर रात्रंदिवस सर्व काही तयार असते. आणि मी दार उघडून कुणा योग्य व्यक्तीला पहाते, तेव्हा मला खूप आनंद होतो.” तिने अर्धा जिना चढला आणि तिथे कठड्यावर हात ठेऊन, ती उभी राहिली. तिचे तोंड खालच्या दिशेने त्याच्याकडे वळवत, ती फिकट ओठाने बोलली, “तुझ्यासारख्या.” आणि तिचे निळे डोळे बिलच्या शरीरभर फिरले. पहील्या मजल्यावर  गेल्यावर ती म्हणाली, “हा मजला माझा आहे.” मग अजून वर गेल्यावर, तो बोलली, “आणि हा मजला तुझा आहे. “इथे तुझी खोली आहे. मला अशी आशा आहे की ती तुला आवडेल.” तिने त्याला लहान पण छान झोपायच्या खोलीत नेले. दिवा लाऊन ती आत गेली.

“मिस्टर पर्किन्स, सकाळचा सूर्य सरळ खिडकीतून आत येतो, माहिती आहे का?

तो म्हणाला, “मी पर्किन्स नाही. मी विव्हर आहे.”

“मिस्टर विव्हर? किती छान! मी पाण्याची बाटली चादरींच्या मध्ये ठेवली आहे. म्हणजे तिला हवा लागेल.” नवख्या टिकाणी अशी गरम पाण्याची बाटली मिळणे म्हणजे छानच होते. चादरी स्वच्छ होत्या. “तुला गार वाटले, तर तू कधीही शेकोटी सुरु करू शकतोस.”

बिली बोलला, “आभारी आहे. फार आभारी आहे.” त्याने पाहिले की अंथरुणावरील चादर नीट काढली गेली. त्यावरील कपडे एका बाजूला केले गेले. एखाद्याला आत जायला सर्व काही तयार होते.

त्याच्या चेहऱ्याकडे पहात, ती मनापासून म्हणाली, “तू आलास म्हणून मला आनंद झाला. नाहीतर मला काळजी वाटू लागली होती.”

बिली म्हणाला, “ते ठीक आहे. पण तुम्ही माझी काळजी करू नका.”

त्याने त्याची बॅग खुर्चीवर ठेवली व ती उघडू लागला.

“आणि रात्रीच्या जेवणाचे काय? तू इथे येण्यापूर्वी काही खाऊन आला आहेस का?”

तो बोलला, “मला काही भूक नाही आहे. आभारी आहे. मी आता झोपायला जातो. कारण मला उद्या लवकर उठून कार्यालयात हजेरी लावायची आहे.”

“ठीक आहे तर मग. मी आता जाते तू सामान लाव. पण झोपायला जाण्यापूर्वी, तू तळमजल्यावरील दिवाणखान्यात येऊन पुस्तकात सही करशील का? प्रत्येकाला ते करावेच लागते, कारण तसा नियमच आहे. आणि आपल्याला आपल्या करारातील काहीही नियम तोडायचा नाही, नाही का?”

तिने त्याला हाताने थोडासा झटका दिला आणि लगेच खोलीबाहेर पडून दार लाऊन घेतले. त्याची मालकीण जराशी वेगळी वाटत होती, तरी बिलीला काही काळजी वाटली नाही. शेवटी, ती त्रास देणारी नव्हतीच. पण दयाळू आणि उदार होती. त्याने असा तर्क केला की तिने तिचा मुलगा युद्धात गमावला असावा किंवा तसेच काही, आणि ते दुःख ती कधीच विसरली नव्हती.

काही मिनिटांनी त्याची बॅग रिकामी केल्यावर, आणि हात धुतल्यावर, तो खाली आला आणि दिवाणखान्यात शिरला. त्याची मालकीण तिथे नव्हती. पण शेकोटी धगधगत होती. आणि ते कुत्र्याचे पिल्लू अजून तिथे झोपलेले होते. खोली आरामशीर दिसत होती. त्याने विचार केला की ती नशीबवान आहे. हे थोडे खरे होते. त्याला पियानोवर पाहुण्याचे पुस्तक उघडे दिसले. त्यामुळे त्याने त्याचे पेन काढले आणि त्याचे नाव व पत्ता लिहिला. त्या पानावर अजून दोन ओळी भरलेल्या होत्या. पाहुण्यांचे पुस्तक कोणीही वाचेल, त्याप्रमाणे त्याने ते वाचायला सुरवात केली. एक नाव होते कार्डिफचा ख्रिस्तोफर मुल्होलँड. दुसरे होते, ब्रिस्टॉलचा ग्रेगरी टेम्पल त्याला ते मजेशीर वाटले. ख्रिस्तोफर मुल्होलँड. त्याच्या मनात घंटी वाजली. त्याने ते विचित्र नाव कुठे बरे ऐकले होते? तो शाळेतला कुणी होता का? त्याच्या बहिणीचा मित्र होता का? की त्याच्या

वडिलांचा मित्र होता? नाही. नाही यापैकी कुणीच नव्हता. त्याने परत पुस्तकाकडे नजर वळवली.

ख्रिस्तोफर मुल्होलँड, कॅथेड्रल रस्ता, कार्डिफ.

ग्रेगरी टेम्पल, २७, सायकामोर रस्ता, ब्रिस्टॉल

खात्री नसली, तरी खरे तर आता त्याला आठवले की दुसरे नाव पहील्याइतके ओळखीचे वाटत नव्हते.

तो डोके चालवत मोठ्याने म्हणाला, “ग्रेगरी टेम्पल? ख्रिस्तोफर मुल्होलँड?”

त्याच्यामागून एक आवाज आला, “खूप गोड मुले” तो वळला आणि त्याच्यामागे मालकिणीला हातात मोठा चहाचा चांदीचा ट्रे घेऊन खोलीत आलेले पाहीले. जसे काही खेळकर घोड्याचा लगाम असल्यासारखा, तिने तो नीट धरला होता.

तो म्हणाला, “ही नावे ओळखीची वाटत आहेत.”

“हो का? किती रुचीपूर्ण आहे!”

“मी यापूर्वी ही नावे कुठेतरी ऐकली आहेत. हे थोडे विचित्र नाही का? कदाचित ती वर्तमानपत्रात आली असतील. पण ती काही प्रसिद्ध नावे नव्हती, होती का? म्हणजे क्रिकेट, फुटबॉल किंवा तत्सम कसले खेळाडू?”

तिने चहाचा ट्रे खाली सोफ्यासमोरील टेबलावर ठेवत म्हटले, “प्रसिद्ध? नाही. मला नाही वाटत, की ते प्रसिद्ध होते. पण मी खात्रीपूर्वक सांगू शकते, की ते दोघेही उंच, तरुण व फारच देखणे होते, अगदी तुझ्या सारखेच. अजून एकदा

बिलीने खाली पुस्तकात पाहिले. तो तारखांकडे लक्ष देत म्हणाला, “इकडे पहा, ही दोन वर्षांपूर्वीची तारीख आहे.”

“हो का?”

हो, खरेच. ख्रिस्तोफर मुल्होलँड त्यापूर्वी एक वर्ष. म्हणजे तीन वर्षापूर्वीचे आहे.”

तिचे डोके हलवत व सुस्कारा टाकत, ती म्हणाली, “अरे मुला, मी याबद्दल कधी विचार केला नव्हता. मिस्टर विल्किन्स, वेळ कसा भरभर जात असतो, नाही का?”

बिली बोलला, “मिस्टर विव्हर. वि --- व्ह --- र.”

ती सोफ्यावर बसत ओरडली, “हो, अर्थात हो. मी किती मूर्ख आहे! मी क्षमा मागते. मिस्टर विव्हर, मी एका कानाने ऐकून, दुसऱ्या कानाने सोडून देते.”

बिली बोलला, “तुम्हाला काही माहिती आहे का? तुम्हाला त्यांच्याबद्दल काही असामान्य असे माहिती आहे का?”

“नाही रे मुला, नाही.”

“ठीक आहे. पण असे बघा, मुल्होलँड आणि टेम्पल, ही दोन्ही नावे विशेष प्रकारे माझ्या लक्षातच नाहीत, तर काही कारणाने, ती प्रसिद्ध होती. मी काय म्हणतो आहे, तुम्हाला कळते आहे का? उदाहरणार्थ, डेम्पसे आणि ट्यूने किंवा चर्चिल आणि रुझवेल्ट.”

“किती मनोरंजक! पण मुला, आता इकडे ये व माझ्याशेजारी बसून, झोपायला जाण्यापूर्वी आल्याची बिस्किटे व चहा घे.”

“तुम्ही उगीच त्रास घेतलात. तुम्ही काही करायला नको होते.” तो पियानोशेजारी उभा राहून, तिला कप भरतांना बघत राहिला. त्याच्या लक्षात आले, की तिचे हात चपळ, गोरेपान व लहानसे आहेत आणि नखे लाल आहेत.

बिली म्हणाला, “मला खात्रीने असे वाटते आहे, की मी त्यांना वर्तमानपत्रात पाहिले आहे. मी क्षणभर विचार करतो. पण ते तसेच आहे.” आपल्या स्मरणशक्तीच्या बाहेर रेंगाळणारे काही असणे, ही फार त्रासदायक गोष्ट असते. पण त्याला प्रयत्न सोडायचा नव्हता. “एक मिनिट थांबा. एक मिनिट. ख्रिस्तोफर मुल्होलँड ---

ती म्हणाली, “मुल्होलँड --- हे पश्चिमेकडील देशातील चालणाऱ्या मोहिमेवरील इटॉनच्या शाळेतील मुलाचे नाव तर नाही? दूध? साखर?”

“हो, चालेल.”

मग अचानक ती म्हणाली, “इटॉनच्या शाळेतील मुलगा? ओहो, नाही. हे बरोबर नाही. कारण माझ्याकडील मिस्टर मुल्होलँड नक्कीच इटॉनच्या शाळेतील मुलगा नव्हता. तो केंब्रिजमध्ये शिकलेला होता. आता इथे येऊन बस व छान शेकोटीसमोर स्वतःला शेक. ये, तुझा चहा तयार आहे.” तिने तिच्या शेजारील जागेवर हाताने खूण केली.

तो चालत आला व सोफ्याच्या कडेवर बसला. तिने कप त्याच्यापुढे ठेवला. ती म्हणाली, “तर आपण छानपैकी उबदार होऊन आरामशीरपणे बसलो आहोत.”

बिलीने चहाचे घुटके घ्यायला सुरवात केली. तिने पण तेच केले. अर्धा एक मिनिट कोणीच काही बोलले नाही. बिलीला माहिती होते, की ती त्याच्याकडे बघते आहे. तिचे शरीर अर्धवट त्याच्याकडे वळले होते. त्याला तिचे डोळे त्याच्या चेहऱ्यावर खिळलेले दिसत होते. आता परत त्याला तिच्या शरीरातून कसला तरी विशिष्ट वास आला. तो काही नकोसा नव्हता. त्याला काही आठवले. काय आठवले हेच त्याला कळेना. खारवलेले आक्रोड? नवीन चामडे? की दवाखान्यातील पॅसेज?

बऱ्याच वेळाने, ती म्हणाली, “मिस्टर मुल्होलँड चहाप्रेमी होता. त्या गोड, आवडत्या मुल्होलँडइतके चहा पिणारे मी कुणीच पाहिलेले नाही.”

बिली बोलला, “तो अलीकडेच सोडून गेला का?” तो अजून त्या दोन नावांबद्दल विचार करत होता. आता त्याला नक्की आठवले, की त्याने त्यांचे नाव वर्तमानपत्राच्या मथळ्यात वाचले होते.

ती भुवया ताणत म्हणाली, “सोडून गेला? नाही रे माझ्या मुला, तो सोडून गेला नाही. तो अजूनही इथे आहे. मिस्टर टेम्पलही इथेच आहे. ते दोघेही एकत्र तिसऱ्या मजल्यावर आहेत.”

बिलीने त्याचा कप हळूच टेबलावर ठेवला. त्याने त्याच्या मालकिणीकडे निरखून पाहिले. ती त्याच्याकडे बघून हसली. मग तिने एका हाताने त्याला गुडघ्यांवर आरामात थोपटले. तिने विचारले, काय रे मुला, तू किती वर्षांचा आहेस?”

“सतरा.”

“ओहो, हे चांगले वय आहे. मुल्होलँडचे पण हेच वय होते. पण मला वाटते, तो तुझ्यापेक्षा थोडा बुटका होता. खरे तर माझी खात्री आहे, की तो इतका गोरा नव्हता व त्याचे दात इतके पांढरे शुभ्र नव्हते. मिस्टर विव्हर, तुझे दात खूप सुंदर आहेत. तुला हे माहिती आहे का?”

बिली म्हणाला, “ते दिसतात, तितके चांगले नाहीत. मागील बाजूला भरलेले आहेत.”

“मिस्टर टेम्पल अर्थात थोडा मोठा होता. त्याचे वय अठ्ठावीस होते. पण हे त्यांनी मला सांगितले नसते, ते माझ्या आयुष्यात मला कधीही कळले नसते. त्याच्या शरीरावर एकही डाग नव्हता, किंवा खोट नव्हती.”

बिली बोलला, “काय नव्हती?”

त्याच्याकडे लक्ष न देता, ती म्हणाली, “त्याचे वय अठ्ठावीस होते. पण त्याच्या शरीरावर एकही डाग नव्हता, किंवा खोट नव्हती.”

“काय नव्हती?”

“त्याची कांती एखाद्या बाळासारखी होती.” तिथे शांतता पसरली. बिलीने कप उचलून चहाचा अजून एक घोट घेतला व मग परत तो बशीत ठेऊन दिला. बिलीला वाटले ती काही बोलेल, पण ती शांततेत बुडाली होती. तो त्याचा खालचा ओठ चावत, खोलीच्या कोपऱ्यात सरळ बघत उभा राहिला. शेवटी तो बोलला, “तो पोपट, तुम्हाला माहिती आहे का, मी रस्त्यातून जेव्हा त्याच्याकडे प्रथम पाहिले, तेव्हा त्याने मला फसवले. मी शपथेवर सांगितले असते, की तो जिवंत आहे.”

“अरेरे, पण आता तसे नाही.”

तो म्हणाला, “हे भयंकर हुशारीने केले गेले असणार. तो मेलेला मुळीच वाटत नाही. कोणी हे केले?”

“मी केले.”

“तुम्ही केले?”

ती म्हणाली, “अर्थात, आणि तू छोट्या बेसिलला भेटलास का?” तिने शेकोटीसमोर मुटकुळे करून झोपलेल्या, बुटक्या पायांच्या लांब कुत्र्याकडे बघत विचारले. बिलीने त्याकडे पाहिले. आणि अचानक त्याला जाणवले की हादेखील पोपटासारखाच निःश्चल आणि शांत आहे. त्याने हात लांब करून हळूवारपणे त्याच्या पाठीला स्पर्श केला. पाठ कडक आणि गार होती. त्याने बोटांनी त्या कुत्र्याचे केस एका बाजूला केले, तेव्हा त्याला खालील काळसर, करडी, जतन केलेली कातडी दिसली. तो लांब जात बोलला, “अरे बापरे, हे फारच काहीच्या काही आहे.” तो मोठ्या कौतुकाने सोफ्यावर त्याच्या शेजारी बसलेल्या लहानशा बाईकडे बघत बोलला, “हे असे करणे फार कठीण असणार.”

ती म्हणाली, “अजिबात नाही. माझे पाळीव प्राणी मरतात, तेव्हा मीच त्यांच्यात भुस्सा भरते. तुला अजून एक कप चहा हवा आहे का?”

बिली म्हणाला, “नाही, नको. चहाला कडू बदामांचा वास येत होता. पण त्याचे त्याला फारसे काही वाटले नाही.

“तू पुस्तकात सही केलीस ना?”

“हो.”

“ठीक आहे. कारण नंतर समजा मी तुझे नाव विसरले, तर मला यात बघून ते कळेल. मी मिस्टर मुल्होलँड आणि मिस्टर --- यांच्या बाबतीत, ते अजूनही रोज करते.

बिली म्हणाला, “मिस्टर टेम्पल. ग्रेगरी टेम्पल. मला विचारल्याबद्दल क्षमा करा, पण गेल्या दोन तीन वर्षात इथे हे दोघे सोडून कुणीच पाहुणे आले नाहीत का?”

चहाचा कप एका हातात उंच धरून व तिचे डोके किंचित डावीकडे झुकवून, ती डोळ्याच्या कोपऱ्यातून त्याच्याकडे बघून मंदपणे हसली.

“नाही, रे मुला. फक्त तू.”

# A Piece of Cake

# करायला सहजसोपे



ते घडेपर्यंत नाही व आधीचेही काही नाही, मला त्यातले फारसे काही आठवत नाही. आम्ही फौकाला थांबलो. परत विमानाची टाकी भरत असतांना, ब्लेन्हेइम  मुलांनी आम्हाला मदत केली व चहा दिला. मला त्या ब्लेन्हेइम मुलांचा शांतपणा आठवतो. ते कसे चहा देण्यासाठी, काही न बोलता, वैमानिकांच्या तंबूत आले, चहा संपल्यावर कसे मुकाट्याने उठून बाहेर गेले आणि तरीही काही बोलले नाहीत. मला माहिती होते, की त्यांच्यापैकी

प्रत्येकजण शांतपणे बसून विचार करू इच्छित होता. कारण तेव्हा बाहेर पडणे फारसे योग्य नव्हते. त्यांना सतत बाहेर जावे लागे. आणि त्यांची जागा भरून काढायला दुसरे कोणीच येत नसे. आम्ही चहाबद्दल त्यांचे आभार मानले व आमच्या ग्लॅडीएटर विमानांमध्ये त्यांचे पेट्रोल भरणे संपले की नाही, हे बघायला बाहेर गेलो. मला आठवत होते, की वारा वहात होता. तो वारा दिशा दर्शकाला जमिनीशी समांतर सरळ ठेवत होता. आमच्या पायांमधून वाळू वहात होती. वाऱ्यामुळे तंबू हलत होता. कॅनव्हासची माणसे टाळया वाजवत असल्यासारखा तो दिसत होता.

पीटर म्हणाला, “बॉम्बर विमानाची पायलट मुले दुःखी आहेत.”

मी म्हणालो, “नाही. दुःखी नाहीत.”

“ठीक आहे. ती तपकिरीसर झाली आहेत.”

“नाही, ते उन्हाने तसे झाले आहेत, एवढेच. पण त्यांची कामे चालू रहातील. तुम्ही बघाल, की तसेच असण्याचे त्यांचे प्रयत्न चालू रहातील.”

आमची दोन ग्लॅडीएटर विमाने एकमेकांशेजारी उभी होती आणि एअरमन [ विमानांना सेवा पुरवणारे कर्मचारी ] खाकी शर्टात व अर्ध्या चड्डीत अजूनही पेट्रोल भरत होते. मी पातळसर पांढरा, सुती उडता सूट घातला होता आणि पीटरने निळा. ग्लॅडीएटर उडवण्यासाठी काही गरम कपडे घालायची जरुरी नव्हती.

पीटरने विचारले, “ते किती लांब आहे?”

मी उत्तरलो, "चेरिंग क्रॉसनंतर एकवीस मैल. रस्त्याच्या उजव्या बाजूला. चेरिंग क्रॉसपासून फुटणारा वाळवंट रस्ता उत्तरेला मर्साह मॅट्रहाकडे जात होता. इटालियन सैन्य मर्साहबाहेर होते आणि त्यांचे चांगले चालले होते. मला माहिती होते त्याप्रमाणे, इटालियन सैन्याचे चांगले चालले असल्याची, तेवढीच वेळ होती. एखाद्या अचूक बॅरोमीटर [ उंची व हवेचा दाब मोजणारे उपकरण ] प्रमाणे त्यांचे मनोधैर्य वरखाली होत होते. तेव्हा ते चाळीस हजार उंचीवर होते आणि जगाच्या सर्वात वर होते. आम्ही पेट्रोल भरले जाण्यासाठी थांबलो होतो.

पीटर म्हणाला, "ही कामगिरी  करायला अगदी सोपी आहे."

"हो, ती सोपी असणार."

आम्ही वेगळे झालो. मी माझ्या विमानातील माझ्या कॉकपीट [पायलट बसतो, त्या जागी शिरण्याचा मार्ग] मध्ये शिरलो. मला तिथे शिरण्यास मदत करणाऱ्याचा चेहरा माझ्या नेहमी लक्षात असे. तो चाळीशीचा, वयस्क व टक्कल पडलेला व मागील बाजूचे उरलेले केस सोनेरी असणारा मनुष्य होता. त्याच्या चेहराभर सुरकुत्या होत्या. त्याचे डोळे माझ्या आजीसारखे होते. असे वाटत होते, की कधीही बाहेर न पडणाऱ्या त्या अरुंद मार्गात पायलटना आत घालवण्यात त्याचे आयुष्य गेले होते. तो पंखावर उभा राहून माझ्या दोऱ्या ओढत म्हणत होता, "काळजी घे. काळजी न घेण्यात काही अर्थ नाही."

मी म्हणालो, "ते अगदी सोपे आहे."

"सोपे कसले!"

"खरोखर. दुसरे काही नाही. करायला सहजसोपे."

नंतरचा क्षण मला आठवत नाही. त्यापुढील सर्व आठवते. मला वाटते आम्ही फौकापासून निघालो आणि पश्चिमेकडे मर्साहकडे उडत चाललो होतो. मला वाटते आम्ही आठशे फुट उंचीवरून चाललो होतो. मला वाटते आम्ही स्टारबोर्ड समुद्र पाहिला. मी कल्पना केली --- नाही. मी ठाम होतो --- तो निळा व सुंदर होता. विशेषतः तो जिथे वाळूवर पसरत चालला होता, तिथे तुमची दृष्टी जाते तिथपर्यंत, त्याने पूर्व पश्चिम एक जाडसर पांढरी रेघ काढली होती. मला वाटते, आम्ही चेरिंग क्रॉसवरून चाललो होतो. ते म्हणाल्याप्रमाणे आम्ही तसे एकवीस मैल गेलो. पण मला एवढेच माहिती आहे, की आम्हाला त्रास झाला. खूपच त्रास झाला. मला माहिती आहे, आम्ही वळलो व परतत असताना त्रास अती वाढला. सर्वात जास्त त्रास काय असेल तर, मी बाहेर पडायला फार खाली होतो. त्या ठिकाणापासून माझी स्मृती परत आली. विमानाच्या इंजिनचे नाक खाली जमिनीकडे वळलेले मला आठवत होते. तिथे मला काटेरी झुडुपांचा ढीग दिसला. त्याशेजारील वाळूवर काही खडक असलेले मला दिसले. काटेरी झुडुपे, वाळू व खडक जमिनीतून बाहेर पडून सरकत माझ्या दिशेने येत असल्याचे, मला अगदी स्पष्टपणे आठवते आहे. मग तिथे काही न आठवण्याचा थोडा काळ होता. तो एक सेकंदाचा किंवा तीस सेकदांचा असेल, मला माहिती नाही. तो अगदी कमी होता, एवढे मला आठवते. मग मला उजवीकडून काही मोडल्याचा आवाज आला. इंजिनाच्या उजवीकडील भागातील टाकी पेटली होती. मग डावी बाजूही पेटली. माझ्यासाठी हे काही विशेष सुचवणारे होते. मी क्षणभर आरामशीरपणे स्तब्ध झालो. मला थोडी झोप येऊ लागली. मला काही दिसेनासे झाले. पण तेदेखील काही विशेष नव्हते. माझ्या पायाला काही गरम

लागेपर्यंत, त्यात काळजी करण्यासारखे काही नव्हते. प्रत्येक पायाच्या वर खाली व बाजूला प्रथम नुसते उबदार वाटले. ते ठीक होते. पण एकदम गरम लागू लागले. फार टोचणारे व ओरबाडणारे भाजू लागले. एवढेच मला समजले. मला ते आवडले नाही. म्हणून मी माझे पाय खुर्चीवर वरती घेतले व थांबलो. मला वाटते शरीर व मेंदू यांच्या संदेशवहनात काही बिघाड झाला होता. तो संपर्क नीट होत नव्हता. जे झाले, ते मेंदूपर्यंत पोचायला वेळ लागला. काय करावे, ते कळेना. पण खालून आगीसारखे काही भाजत आहे असा संदेश डाव्या व उजव्या पायाकडून आल्यासारखे वाटले. काय करावे? खूप वेळ मेंदूकडून काही सूचना मिळाली नाही. मेंदू विचार करत असावा.

मग हळूहळू संदेश आला. विमानाला आग लागली आहे. बाहेर पडा. बाहेर पडा. हा संदेश सर्व शरीरभर पसरला. पायाचे सर्व स्नायू, हात आणि इतर शरीराच्या स्नायुंनी काम सुरु केले. त्यांनी जास्तीत जास्त प्रयत्न केला. थोडे ओढले, थोडे ढकलले. खूप जोर लावला. पण काही उपयोग नव्हता. दुसरा संदेश गेला. 'बाहेर पडता येत नाही. काहीतरी आत अडकवून ठेवते आहे.' पुढील संदेशाची वाट बघत मी बसून राहिलो. आग वाढत होती. मला काहीतरी खाली खेचत होते. मेंदू ते काय आहे, ते शोधत होता. राक्षसाचे हात माझे खांदे दाबत होते का? की जड दगड किंवा घरे किंवा वाफेचे सरकते पट्टे, फायलींचे ढिगारे की दोऱ्या की गुरुत्वाकर्षण? एक मिनिट थांबा. दोऱ्या. निरोप आला. तो हळू हळू आला. तुमचे पट्टे सोडवा. पट्टे सोडवा. माझे हात निरोप ऐकून, कामाला लागले. ते पट्टे सोडवू लागले. पण ते निघेनात. ते तसेच कडकपणे बांधलेले राहिले. थोडे हळू, थोडे जोराने --- पण कसलाच काही उपयोग होत नव्हता.

निरोप गेला. ‘आम्ही पट्टे कसे सोडवावेत?” यावेळेस मी मला वाटते, उत्तराची वाट बघत, तीन चार मिनिटे थांबलो. अधीर होऊन वा घाई करून, काही उपयोग नव्हता, याबद्दल मला खात्री होती. पण किती वेळ लागत होता! मी मोठ्याने म्हणालो, “भिकार पट्टे! मी भाजणार आहे. मी --- “ पण उत्तर येत होते --- “नाही, असे होणार नाही.” “हो, असेच होणार.” ते उत्तर हळूहळू येत होते. “जोराने ओढ. झटपट. पिन मोकळी सोड --- तू मूर्ख --- घाई कर.” “पिन बाहेर आली आणि पट्टे सैल झाले.” “आता त्यातून बाहेर पड. बाहेर पड.” पण मला ते जमेना. मला त्या पायलटच्च्या खबदाडातून, कॉकपीटमधून बाहेर पडता येईना. हातापायांनी खूप प्रयत्न केले. पण काही उपयोग झाला नाही. एक शेवटचा निरोप लखलखला. तो तातडीचा असल्याचे दिसत होते. तो असा होता, “काहीतरी दुसरे आपल्याला खालून धरून ठेवते आहे. दुसरे काहीतरी. दुसरे काहीतरी. दुसरे काही जड.” हात पाय झगडा करेनात. त्याना जणू क्षणार्धात कळले होते, की जोर लावून काही उपयोग नव्हता. ते शांतपणे वाट बघत राहिले. आणि किती उशीर होत होता! वीस, तीस, चाळीस गरम सेकंद. त्यापैकी काहीच अजून भयंकर गरम झाले नव्हते. किंचित आवाज येत होता. पण अजून मांस भाजले जात नव्हते, पण आता कधीही ते होणार होते. कारण ते जुने ग्लॅडीएटर चक्रीवादळासारखे कितीही ताण सहन करणाऱ्या स्टीलचे बनवलेले नव्हते. त्यांना प्रचंड न जळणाऱ्या ड्रगचे आच्छादन घातलेले कॅनव्हासचे घट्ट पंख होते आणि आतील बाजूस, तिथे लहान शेकडो काठ्या ओंडक्याखाली जळण्यासाठी ठेवलेल्या होत्या. फक्त त्या बारीक आणि वाळक्या होत्या. त्यामुळे त्या भरभर आणि चांगल्या रीतीने जळल्या असत्या.

जर एखादा हुशार मनुष्य म्हणाला असता, “मी जगातील कुठल्याही गोष्टीपेक्षा चांगल्या रीतीने व भरभर जळणारी एक मोठी गोष्ट बांधणार आहे. आणि त्याने खरोखरच काळजीपूर्वक ती गोष्ट केली, तर त्याचा शेवट तो नक्की ग्लॅडीएटरसारखे काहीतरी बांधेल.” मी अजून वाट बघत होतो. मग अचानक सुंदर, थोडक्यात पण सर्व काही स्पष्ट करणारे उत्तर आले. “तुमचे --- पॅरॅशूट --- बक्कल --- वळवा.” मी बक्कल वळवले, पॅरॅशूटचे बक्कल थोडा जोर लावून सैल केले. मी वर खेचला गेलो आणि मी बसलो होतो, त्या पायलटच्या अरुंद मार्गातून बाहेर पडलो. काहीतरी जळत असल्यासारखे वाटत होते. मी क्षणभर वाळूत लोळलो. आणि खाली पडलो.

मी मशीनगनमधून काही गरम दारुगोळा उडतांना ऐकला. जवळील वाळूत काही गोळ्या मारलेल्या ऐकल्या. मी त्याची काही काळजी केली नाही. मी फक्त ते आवाज ऐकले.

गोष्टींचे नुकसान होऊ लागले. माझा चेहरा सर्वात जास्त जखमी झाला होता. माझ्या चेहऱ्याचे काही चुकीचे झाले होते. त्याला काहीतरी झाले होते. मी हातांनी चाचपून बघायचा प्रयत्न केला. तो चिकट लागला. माझे नाक तिथे नव्हते. मी दात आहेत का, ते बघितले. पण मला काही समजले नाही. मला वाटते, मला डुलकी लागली.

अचानक तिथे पीटर आला. मी त्याचा आवाज ऐकला व त्याला भोवताली नाचतांना पाहीले. वेड्या माणसासारखे ओरडतांना ऐकले. तो माझ्याशी हातमिळवणी करत होता व म्हणत होता, अरे देवा, मला वाटले, तू

अजून आत अडकून पडला आहेस. मी जोराने धावत, अर्धा मैल खाली आलो. तू ठीक आहेस का?”

मी म्हणालो, “पीटर, माझ्या नाकाला काय झाले आहे?”

मी त्याला अंधारात काडी ओढतांना पाहिले. वाळवंटात रात्र लवकर होते. तिथे शांतता होती.

तो म्हणाला, “खरे तर त्या जागी काही आहे, असे वाटत नाही. तुला लागले का?”

“मूर्खासारखा बरळू नकोस. अर्थातच मला लागले आहे.”

त्याच्या प्रथमोपचार पेटीतून, मॉर्फिया काढण्यासाठी तो गेला. पण लवकरच असे सांगत परत आला, की त्याला अंधारात त्याची पेटी सापडत नाही आहे.

मी म्हणालो, “पीटर, मला काही दिसत नाही.”

तो उत्तरला, “ही रात्र आहे. मलाही काही दिसत नाही.”

आता गार झाले. फारच गार झाले. पीटर माझ्याशेजारी झोपल्यामुळे, आम्ही थोडे उबदार झालो. तो दर थोड्या वेळाने म्हणत होता, “मी आतापर्यंत नाक नसलेला माणूस पाहिलेला नाही.”

माझ्या नाकाच्या इथून खूप रक्त वहात होते. प्रत्येक वेळी मी ते पुसल्यावर, पीटर काडी ओढत होता. एकदा त्याने मला सिगरेट दिली. पण ती ओली झाली. मला ती नकोच होती. तिथे आम्ही किती वेळ राहिलो, कुणास

ठाऊक! मला अजून फक्त थोडेसे आठवत होते. मला आठवत होते, की मी पीटरला सांगत राहिलो, की सुजलेल्या घशावर घ्यायच्या गोळ्यांचा एक डबा माझ्या खिशात होता. त्यातील एक गोळी त्याने घ्यावी, नाहीतर माझ्यासारखा त्याचाही घसा सुजेल. मी त्याला आपण कुठे आहोत, असे विचारल्याचे व त्याने दोन सैन्याच्या मध्ये असलेले सांगितल्याचे आठवत होते. गस्त घालणाऱ्या इंग्लिश पथकाने आम्हाला आम्ही इटालियन आहोत का, असे विचारल्याचे आठवत होते. पीटर त्यांना काहीतरी बोलला पण काय म्हणाला, ते मला आठवत नाही. नंतर दाट गरम सूपाचा एक चमचा पिऊन मी आजारी पडल्याचे मला आठवते. सर्व वेळ पीटर माझ्या आजूबाजूला आहे व तो नवलपूर्ण गोष्टी करतो आहे व कधीही लांब निघून जात नाही, एवढेच मला आठवते आहे. ही आनंदी भावना माझ्यात होती.

काही माणसे विमानाशेजारी उभी राहून, रंग देता देता गरमीबद्दल बोलत होती.

मी म्हणालो, “विमानावर चित्रे रंगवावीत.”

पीटर म्हणाला, “हो, ही चांगली, हुशारीची कल्पना आहे.”

मी म्हणालो, “का, ते मला सांग.”

तो म्हणाला, “ती विनोदी चित्रे आहेत. ती बघितल्यावर, सर्व जर्मन पायलट्स हसतील. हसून हसून त्यांची इतकी मुरकुंडी वळेल की त्यांना सरळ नेम धरून मारता येणार नाही.”

“ओहो, मूर्खपणा, मूर्खपणा, मूर्खपणा.”

“नाही. ही मस्त कल्पना आहे. छान आहे. इकडे ये आणि बघ.”

आम्ही विमानाकडे धावलो. “उडी मार. अडथळा चुकव. वेळेवर ये.”

“उडी मार. अडथळा चुकव. वेळेवर ये.” असे म्हणत आम्ही नाचलो. पहिल्या विमानाच्या रंगाऱ्याची टोपी गवत काड्यांची होती आणि चेहरा उदास होता. तो एका मासिकातील चित्राची नक्कल काढत होता. ते बघून, पीटर म्हणाला, “अरे मुला, त्या चित्राकडे बघ.” आणि तो हसायला लागला. प्रथम ते सतत खोल आवाज करणारे हसू होते. झटपट ते बेंबीच्या देठापासूनचे हसणे झाले. तो त्याचे दोन्ही हात मांड्यांवर आपटत होता आणि त्याच वेळेस, तो त्याचे पूर्ण शरीर गद्गदवणारे हसू हसत होता. त्याचे तोंड आ वासलेले होते आणि डोळे बंद होते. त्याची रेशमी टोपी खाली वाळूत पडली.

मी म्हणालो, “हे काही इतके विनोदी नाही.”

तो ओरडला, “विनोदी नाही! विनोदी नाही म्हणजे तुला काय म्हणायचे आहे? माझ्याकडे बघ. असे हसतांना, त्यांना नेम साधता येणार नाही. मला तरी गवताचा ट्रक किंवा घर किंवा पंखरहित कीटक यांच्यावर नेम साधता येत नाही.” आणि तो वाळूत उत्साहाने नाचू लागला. मग त्याने माझ्या दंडाला धरले व आम्ही दुसऱ्या विमानापर्यंत नाचत गेलो. तो म्हणाला, “उडी मार. उडी मार.”

सुरकुत्या पडलेल्या व चेपटलेल्या चेहऱ्याचा एक लहानसा माणूस विमानाच्या मुख्य भागावर, लाल तेलकट खडूने एक मोठी गोष्ट लिहीत होता. त्याची गवताच्या काड्यांची टोपी सरळ त्याच्या पाठीवर पडली होती. त्याचा चेहरा गोड आणि झगमगता होता.

तो बोलला, “शुभ सकाळ, शुभ सकाळ, शुभ सकाळ.” आणि मोठ्या रुबाबात, त्याने त्याची टोपी डोक्यावरून सरकवली.

पीटर म्हणाला, “गप्प बस.” तो वाकून लहानसा माणूस काय लिहित होता, ते बघू लागला. सर्व वेळ पीटर थुकत व हसण्याने शरीर थरथरवत होता. आणि ते वाचल्यावर, तो पुन्हा नव्याने हसू लागला. तो एका टोकाकडून दुसरीकडे जात, त्याचे शरीर वाकवत, वाळूवर नाचत होता.

“अरे बापरे, काय गोष्ट आहे! काय गोष्ट आहे! माझ्याकडे बघ. माझ्याकडे हसून बघ.” आणि तो डोके हलवत व वेड्यासारखे हावभाव करत, चवड्यावर नाचू लागला. मी तो विनोद पाहून, त्याच्याबरोबर हसू लागलो. मी इतका हसलो, की माझे पोट दुखू लागले व मी पडलो. वाळूत लोळू लागलो. ते इतके विनोदी दिसत होते, की मी दुसरे काही करणे शक्य नसल्याने, मोठ्याने हसत सुटलो.

मी ओरडलो, “पीटर, तू अफलातून आहेस. पण त्या जर्मन पायलटना इंग्लिश वाचता येते का?”

तो म्हणाला, “ते गेले खड्ड्यात. ते जाऊ दे. थांब. तुमचे काम थांबवा.” सर्व चित्रकार थांबले व वळून पीटरकडे पाहू लागले. त्यांनी मोठ्या आनंदाने चवड्यावर नाच केला. त्याच वेळी ते समूहगान म्हणू लागले. पीटर बोलला, “गप्प बसा. आपण संकटात आहोत व गर्दीत सापडलो आहोत. आपण शांत रहायला हवे. माझी टोपी कुठे गेली?”

मी म्हणालो, “काय?”

तो म्हणाला, "तू जर्मन बोलू शकतोस. तू आमच्यासाठी त्याचे भाषांतर केले पाहिजेस." तो रंगाऱ्याकडे बघून बोलला, "तो तुझ्यासाठी ते करेल." मग मी त्याची काळी टोपी वाळूत पडलेली पाहिली. मी लांबवर व आसपास पाहिले. ती नाटकातील रेशमी टोपी होती. ती बाजूच्या वाळूत पडली होती.

मी ओरडलो, "तू वेडा झाला आहेस. फारच वेडा झाला आहेस. तू काय करतो आहेस, ते तुला कळत नाही. तू आम्हाला सगळयांना मरणाच्या दारी नेशील. तुला माहिती आहे का, की तू वेड्याची हद्द ओलांडली आहेस. अरे देवा, किती वेडेपणा करशील!"

एका बाईचा आवाज आला. "अरे बापरे, तू किती गडबड करतो आहेस. हे तुझ्यासाठी चांगले नाही. तू फार राडा करून टाकला आहेस. आणि मला असे वाटते आहे, की कोणीतरी माझे कपाळ रुमालाने पुसते आहे. तू असे करता कामा नयेस."

मग ती गेली. मी फिकट निळे, निरभ्र आकाश पाहिले. आजूबाजूला जर्मन लढवय्ये होते. ते वर, खाली व प्रत्येक बाजूला होते. मला जायला वाटच नव्हती. मी काही करू शकत नव्हतो. ते पाळीपाळीने माझ्यावर हल्ला करायला बघत होते. ते त्यांची विमाने निष्काळजीपणे, नाचवत, गिरक्या घेत, चालवत होते. पण माझ्या विमानाच्या पंखांवरील विनोदी चित्रांमुळे, मी घाबरलो नाही. माझ्याकडे आत्मविश्वास होता. मी विचार केला, 'मी त्या शेकडोजणांशी एकटा लढेन. ते हसत असतांना, मी त्या सगळयांवर बंदुकीच्या गोळया झाडेन."

मग ते जवळ आले. आकाश त्यांनी भरून गेले. ते इतके खूप होते, की कुणाला पहावे आणि कुणावर हल्ला करावा, ते समजत नव्हते. त्यांची संख्या इतकी होती, की त्यांनी आकाशावर काळा पडदा टाकला. अधून मधून फक्त आकाशाचा काही भाग दिसत होता. पण ते एखाद्या डच माणसाची फाटकी पँट शिवण्याइतके होते. जोपर्यंत इतके करणे शक्य होते, तोपर्यंत सर्व काही ठीक होते.

ते अजून जवळ आले. अजून जवळजवळ येऊ लागले. अगदी माझ्या चेहऱ्यासमोर आले. मला फक्त त्या वायुसैनिकांच्या गणवेषावरील काळ्या फुल्या दिसत होत्या. मी माझे डोके झटपट दुसऱ्या दिशेला वळवले. मला अजून विमाने व त्यांच्या गणवेषाच्या हातावरील अजून काळ्या फुल्या व मधूनच निळे आकाश दिसू लागले. ते गोल करून माझ्या ग्लॅडीएटरभोवती नाचत होते. ते जर्मन वायुसैनिक आनंदाने खोल आवाजात बालगीत गात होते. येता जाता दोघे सर्वांपासून अलग होऊन, जमिनीच्या मध्यभागी येत हल्ला करत होते. मला माहिती होते, की ते बालगीत म्हणत होते. ते दिशा बदलत, कडेकडेने त्यांच्या चवड्यावर नाचत होते. प्रथम एका बाजूला व नंतर दुसऱ्या बाजूला हवेच्या झोतावर नाचत होते. इंजिने गात होती, ‘सेंट क्लेमेंट्सच्या घंटा वाजत आहेत.’

मला अजून आत्मविश्वास होता. मी त्यांच्यापेक्षा चांगला नाचू शकतो. माझा जोडीदार देखील त्यांच्यापेक्षा चांगला आहे. ती जगातील सर्वात सुंदर स्त्री होती. मी खाली वाकून तिच्या मानेचा वक्राकार, मंद खांद्यांचा सभ्य उतार व निमुळते, उत्सुक व ताणलेले हात पाहिले.

अचानक मी विमानाच्या एका बाजूवर बंदुकीच्या गोळ्यांची भोके पाहिली. मी एकाच वेळी चिडलो आणि घाबरलो. पण जास्त करून चिडलो. मग मी आत्मविश्वासाने म्हणालो, “हे करणाऱ्या जर्मनांना काही विनोदबुद्धी नाही. पक्षामध्ये नेहमी एक माणूस असा असतो, ज्याला विनोदबुद्धी नसते. पण काळजीचे काही कारण नाही. अजिबात काही कारण नाही.”

मग मी अजून गोळ्यांची भोके पाहिली आणि मी घाबरलो. मी कॉकपीटमध्ये उभा राहून ओरडलो, ”मूर्खांनो, विमानाच्या शेपटीवरील विनोदी चित्रांकडे पहा. विमानाच्या मुख्य भागावर लिहिलेली गोष्ट बघा.”

ते अजून जवळ आले. अजून जवळजवळ येऊ लागले. अगदी माझ्याजवळ ते येतच राहिले. दोनच्या गटाने जमिनीच्या मध्यावरून चालत, माझ्यावर गोळीबार करू लागले. जर्मनांची इंजिने जोरात गात होती. गातांना काळ्या फुल्या त्या तालावर नाचत होत्या. माझ्या विमानाच्या पंखांमध्ये, आच्छादनात व कॉकपीटमध्ये अजून भोके दिसत होती. मग अचानक काही गोळ्या माझ्या शरीरात घुसल्या.

पण मला वेदना होत नव्हत्या. माझ्या विमानाचे पंख फडफडू लागले, तेव्हा मी गिरकी घेतली. ते जोरात फडफडू लागले. अजून जोरात. जेव्हा निळे आकाश आणि काळा समुद्र दिसेनासे होईपर्यंत, गोल गोल जात एकमेकांचा पाठलाग करत राहिले, तेव्हा फक्त चमकदार सूर्य दिसत राहिला. पण काळ्या फुल्या माझा पाठलाग करत होत्या. त्यांनी अजून हात धरून नाच सुरु ठेवला

होता. मला अजूनही इंजिनांचे गाणे ऐकू येत होते. ‘तुझे अंथरूण उजळवायला मेणबत्ती येते आहे. तुझे डोके उडवायला सुरी येत आहे.’

अजूनही पंख वरखाली होत होते. आता माझ्याभोवती आकाश नव्हते, समुद्र नव्हता. फक्त सूर्य होता. मग फक्त समुद्र होता. माझ्याखाली मला तो दिसत होता. मला शुभ्र घोडे दिसत होते. मी स्वतःशी बोललो, “ते शुभ्र घोडे खवळलेल्या समुद्रावर स्वार झाले आहेत. त्या घोड्यांमुळे व समुद्रामुळे, माझा मेंदू ठीक चालला होता. मला समजले की आता माझ्याकडे फार वेळ नव्हता, कारण समुद्र आणि शुभ्र घोडे जवळ येत होते. समुद्र समुद्रासारखा होता, पाण्यासारखा होता. गुळगुळीत ताटलीसारखा नव्हता. जवळ आल्यावर, शुभ्र घोडे मोठे होत होते. एक शुभ्र घोडा तोंडात कसला तरी तुकडा घेऊन वेड्यासारखा पुढे धावत होता. त्यावर कुणी स्वार झालेले नव्हते. त्याच्या तोंडातून फेस येत होता. त्याचा वेग कह्यात ठेवण्यासारखा नव्हता. त्याच्या खुरांनी तो पाण्याची कारंजी उसळवत होता. दौडताना तो मान वाकवत होता. मी सांगू शकत होतो, की आम्ही आपटून आमचे तुकडे तुकडे होणार होते.

पण फक्त उबदार होते, कारण गरम नव्हते व गारही नव्हते. मी मखमलच्या मोठ्या लाल खुर्चीत बसलो होतो. संध्याकाळ होती. मागून वारा वहात होता.

मी म्हणालो, “मी कुठे आहे?”

“तू हरवला आहेस. तू हरवला आहेस. असा विश्वास वाटतो की तुला ठार केले गेले आहे.”

“मग मला माझ्या आईला सांगायला पाहिजे.”

“तू असे करू शकणार नाहीस. तुला तो फोन वापरता येणार नाही.”

“का नाही?”

“तो फक्त देवांनाच करता येतो.”

“माझे काय झाले तू म्हणालास?”

“तू हरवला आहेस. असा विश्वास वाटतो, की तुला ठार केले गेले आहे.”

“हे खरे नाही. हे खोटे आहे. फार वाईट खोटे आहे. कारण मी इथे आहे आणि मी हरवलेलो नाही. तुम्ही मला घाबरवायला बघत आहात. यात तुम्हाला यश येणार नाही. मी सांगतो, यात तुम्हाला यश येणार नाही, कारण तुम्हालाही माहिती आहे, की ते खोटे आहे. मी माझ्या तुकडीत परत जाणार आहे. तुम्ही मला थांबवू शकणार नाही कारण मी जाणारच आहे. मी जाणार म्हणजे जाणार, तुम्ही पहाच.”

मी लाल खुर्चीतून उठून धाऊ लागलो.

“परिचारिके, मला तो क्ष किरण तपासणीचा अहवाल परत बघू दे.”

तो बाईचा आवाज होता आणि तो जवळून आला, “डॉक्टर, तो इथे आहे.” ती मला उद्देशून म्हणाली, “तुम्ही आज रात्री आवाज करत होतात. मला तुमची उशी सरळ करू दे. तुम्ही ती जमिनीवर ढकलत आहात.” हा आवाज जवळून येत होता. तो फार मऊ आणि छान होता.

“मी हरवलो आहे का?”

“नाही अर्थात नाही. तुम्ही सुखरूप आहात.”

“ते म्हणाले, मी हरवलो आहे.”

“वेडेपणा करू नका. तुम्ही ठीक आहात.”

“ओहो, सगळे मूर्ख आहेत. मूर्ख. मूर्ख. पण तो दिवस छान होता. मला पळून जायचे नाही. पण माझे पाय मला पळवत आहेत, त्यामुळे मी थांबू शकत नाही. जणू काही ते माझे नाहीच आहेत. तरीही मी खाली बघतो, तेव्हा ते माझेच असलेले दिसतात. त्यावर घातलेले बूट माझेच असतात. ते पाय माझ्याच शरीराला चिकटलेले असतात. पण ते मला पाहिजे, ते करत नाहीत. ते शेतावर धावत सुटतात. आणि त्यांच्यामागे माझी फरफट निघते. मी धावतो, धावतो आणि धावतो. जरी काही ठिकाणी शेत ओबडधोबड व उंचवटे असलेले असले, तरी मी कधीच पडत नाही. मी झाडे, कुंपणे ओलांडत धावतो. एका शेतातील मेंढ्या गवत खातांना थांबल्या आणि मी तेथून धावतांना, त्या घाबरून पळू लागल्या. एकदा मी माझ्या आईला फिकट पिवळ्या कपड्यात बघितले. ती वाकून अळंब्या गोळा करत होती. मी तेथून धावताना तिने वर पाहिले व म्हणाली, “माझी टोपली भरत आली आहे. लवकरच आपण घरी जायचे का?” पण माझे पाय थांबेनात. आणि मला धावतच रहावे लागले. मग मला समोर डोंगरकडा दिसला. मी धावत होतो, त्या शेतात सूर्य चमकत होता, तरी त्याच्या पल्याड फार अंधारी होते. मी विचार केला, ‘त्या डोंगरकड्या पलीकडे रात्र सुरु होत असावी.’ मी थांबायचा प्रयत्न केला, पण काही उपयोग झाला नाही. माझे पाय अधिक वेगाने लांब ढांगा टाकत, डोंगरकड्याकडे धाऊ लागले. मी खाली वाकून माझ्या पँटचे कापड घट्ट धरले व थांबण्याचा प्रयत्न केला. पण मी थांबू

शकलो नाही. मग मी पडण्याचा प्रयत्न केला. पण माझे पाय काही ऐकेनात. माझे चवडे धावतच राहिले.

आता डोंगरकडा व अंधार खूप जवळ आले. मी बघू शकत होतो, की आता मी थांबलो नाही, तर कड्याच्या टोकावर जाऊन पोचेन. परत एकदा मी मला जमिनीवर पाडायचा प्रयत्न केला. आणि परत मी चवड्यावर उभा राहून जोरात धाऊ लागलो. मी जोराने धावत, कड्याच्या टोकावर जाऊन पोचलो आणि सरळ अंधारात जाऊन पडू लागलो. सुरवातीला एवढा काळोख नव्हता. मला कड्यावर उगवलेली झाडे दिसत होती. खूप वेळा मी झाडाची फांदी पकडण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्येक वेळेस ती तुटली कारण मी इतका जड होतो आणि मी इतक्या वेगाने पडत होतो. मग मी दोन्ही हातांनी जाड फांदी पकडली. झाड पुढे वाकले. मला एकेक मुळे उखडली गेल्याचा आवाज आला. मग सबंध झाड तुटून मी खाली पडू लागलो. डोंगरकड्यावर व शेतात सूर्यप्रकाश होता, पण इथे अंधार होऊ लागला. मी पडतांना माझे डोळे उघडे ठेवले होते. त्यामुळे मला तो करड्या काळयाकडून पूर्ण काळया रंगाकडे जाताना आणि नंतर मिट्ट काळोख होतांना दिसला. खरे तर मला तो दिसत नव्हता, पण मी त्याला हाताने स्पर्श करू शकत होतो. मी पडतच होतो. इतका मिट्ट काळोख होता, की कुठेच काही नव्हते आणि काही करण्याचाही उपयोग नव्हता. कसलाच काही उपयोग नव्हता.

बहुधा परिचारिकेचा आवाज आला, “आज सकाळी तुम्ही बरे आहात. खूपच बरे आहात.”

“हॅलो.”

“आम्हाला वाटले, की तुम्हाला कधीच शुद्ध येणार नाही.”

“मी कुठे आहे?”

“अलेक्झांड्रीयामधील दवाखान्यात.”

“किती काळ मी इथे आहे?”

“चार दिवस.”

“किती वाजले आहेत?

“सकाळचे सात वाजले आहेत.”

“मला दिसत का नाही?”

मी तिला थोडे जवळ येतांना ऐकले. “ओहो, आम्ही नुकतीच तुमच्या डोळयांभोवती पट्टी गुंडाळली आहे.”

“किती वेळापूर्वी?”

“आताच. काळजी करू नका. तुम्ही ठीक आहात. तुम्हाला माहिती आहे का, तुम्ही खूप सुदैवी आहात.”

मी बोटांनी माझा चेहरा चाचपून पाहिला. पण मला काही जाणीव होईना.

मला काही वेगळेच वाटत होते.

“माझ्या चेहऱ्याला काय झाले आहे?”

मी तिला माझ्या अंथरुणाकडे येतांना ऐकले. तिने तिच्या हाताने माझ्या खांद्याला स्पर्श केला. “तुम्ही काही बोलता कामा नये. तशी परवानगी नाही. ते

तुमच्यासाठी वाईट आहे. फक्त पडून रहा आणि काळजी करू नका. तुम्ही ठीक आहात.'' मी तिच्या पाऊलांचा, जमिनीवरून चालत जाण्याचा, दार उघडल्याचा व परत लावल्याचा आवाज ऐकला.

मी म्हणालो, ''परिचारिका, परिचारिका.''

पण ती गेली होती,

# The Pig

# डुक्कर




कोणे एके काळी न्यूयॉर्क शहरात एक सुंदर मुलगा बाळ जन्माला आले. आनंदी पालकांनी त्याचे नाव लेक्सिन्गटन ठेवले. दवाखान्यातून त्या बाळाची आई बाळाला घेऊन घरी आली नाही तोच, ती तिच्या नवऱ्याला म्हणाली, “प्रिया, आता तू मला हा आनंद साजरा करायला जेवायला मोठ्या छान हॉटेलात नेले पाहिजेस. तिच्या नवऱ्याने तिला नाजूकपणे मिठी मारली आणि म्हणाला की अशा सुंदर मुलाला जन्म देणाऱ्या बाईला, ती म्हणते तिथे नेणे

योग्य ठरेल. पण अजून ती रात्री शहरात धावत सुटण्याइतकी बळकट आहे का, असे त्याने विचारले.

ती म्हणाली, “नाही. पण म्हणून काय झाले?”

म्हणून मग त्या संध्याकाळी ते छान कपडे करून, लहानग्या लेक्सिन्गटनला दररोज वीस डॉलर घेणाऱ्या प्रशिक्षित स्कॉटीश दाईवर सोपवून, गावातील सर्वात महाग व चांगल्या ठिकाणी जेवायला बाहेर पडले. तिथे त्यांनी प्रत्येकाने मोठा खेकडा खाल्ला आणि बाटलीभर शँपेन प्यायली. त्यानंतर ते रात्रक्लबमध्ये गेले आणि खूप तास हातात हात घेऊन, त्यांच्या नवीन बाळाच्या शारीरिक सौदर्याचे वर्णन करत बसले.

ते मॅनहॅटनच्या पूर्व बाजूने रात्री दोन वाजता घरी आले. नवऱ्याने टॅक्सी चालकाला पैसे दिले व खिशात घराच्या पुढील दरवाज्याची किल्ली शोधू लागला. थोड्या वेळाने त्याने जाहीर केले, की ती बहुधा त्याच्या सूटाच्या खिशात राहिली असावी. त्याने सुचवले, की आता आपण घंटी वाजवू व दाई खाली येऊन, त्यांना घरात घेईल. नवरा म्हणाला, “रोज वीस डॉलर घेणाऱ्या प्रशिक्षित स्कॉटीश दाईला प्रसंगवशात रात्री अंथरुणातून बाहेर पडायची सवय असेल.” त्यामुळे त्यांनी घंटी वाजवली व थांबले. परत जोराने, बराच वेळ वाजवली. अजून मिनिटभर थांबले. मग ते रस्त्यावर आले आणि दाईच्या नावाने [मॅकपोटल] तिसऱ्या मजल्यावरील बाळाच्या खोलीच्या खिडकीत बघून, ओरडू लागले. पण तरी काही उत्तर मिळाले नाही. घर अंधारात, शांत होते. बायकोला वाटू लागले आता काही नको ते होणार. तिने स्वतःशी म्हटले,

तिचे बाळ घरात मॅकपोटलबरोबर जखडले गेले होते आणि मॅकपोटल कोण होती? ते तिला फक्त दोन दिवस ओळखत होते, एवढेच. तिचे तोंड बारकेसे होते. फार चांगला नसलेला एक डोळा होता. हे अगदी स्पष्ट दिसत होते, की तिला सुरक्षितपणे गाढ झोपायची सवय होती. जर तिला पुढच्या दरवाज्याची घंटी ऐकू येत नसेल, तर तिला बाळ रडलेले तरी काय ऐकू येणार होते? आता या क्षणी बिचारे बाळ घसा सुकून रडत असेल आणि उशीवर त्याचा श्वास कोंडला असेल.

नवरा म्हणाला, "बाळ उशी वापरत नाही."

त्याला शँपेनने उत्तेजित वाटत असल्याने, तो बोलला, "तू काळजी करू नकोस. जर तुला हवे असेल, तर मी तुला घराच्या आत नेऊ शकतो."

त्याने खाली वाकून, एका बुटाचे बंद सोडले व तो काढला. मग तो चवड्याशी धरत, तो जेवायच्या खोलीच्या खिडकीतून सरळ जमिनीवर उतरला. तोंडभर हसत तो बोलला, "कसा आत आलो! आपण मॅकपोटलचा पगार कापू." तो पुढे झाला आणि काचेच्या भोकातून हात घातला. मग कडी काढून, खिडकी वर केली. तो म्हणाला, "छोट्या आई, मी तुला उचलतो. बायकोच्या कंबरेला धरून, त्याने तिला आत घेतले. त्यामुळे तिचे मोठे लाल तोंड, त्याच्या तोंडाजवळ आले. तो तिचे चुंबन घेऊ लागला. त्याला अनुभवाने माहिती होते की बायकांना शरीरे चिकटली आहेत आणि पाय लोंबत आहेत, अशा परिस्थितीत चुंबन घेतलेले खूप आवडते. त्यामुळे तो खूप वेळ ते घेत राहिला. तिच्या घशातून आवाज येऊ लागला. शेवटी त्याने तिला वळवून

उघड्या खिडकीतून जेवायच्या खोलीत सोडायचा विचार केला. त्याच वेळी गस्त घालणारी पोलिसांची गाडी तिथे आली. साधारण तीस फुटांवर ती रस्त्यावर थांबली. त्यातून तीन आयरिश पोलीस उतरले व त्या नवरा बायकोच्या दिशेने पिस्तुल काढून धाऊ लागले. "त्याना पकडा" ते ओरडले. पण नवऱ्यासाठी काही करणे, हे अशक्य होते. कारण बायको अर्धी आत व अर्धी बाहेर होती. ती तिच्यासाठी फारच विचित्र अवस्था होती. तसेच सोडल्यास ती जमिनीवर आपटली असती. किंवा अधांतरी लोंबकळत राहिली असती. त्यामुळे तो एखाद्या नायकाप्रमाणे तिला आत ढकलत राहिला. या पोलीसांना यापूर्वी चोरांना पकडून मारल्याबद्दल पदके मिळाली होती. त्यांनी पिस्तुले काढली व प्रत्येकाला बऱ्याच गोळ्या मारल्या. दोघेही मेले. अशा तऱ्हेने बारा दिवसांचा लेक्सिन्गटन अनाथ झाला. त्या तीन पोलिसाना प्रशस्तीपत्रक मिळवून देणारी ही बातमी सगळ्या वर्तमानपत्रात बातमी छापून आली. मृत व्यक्तींच्या नातेवाईकांनाही कळली. दुसऱ्या दिवशी जवळचे नातेवाईक, काही जवळचे लोक, तीन वकील व एक पाद्री त्या तुटक्या खिडकीच्या घरात जमले. ते सर्वजण सोफ्यावर व खुर्च्यांवर, सिगरेट ओढत, शेरी पित व आता बाळाचे, अनाथ लेक्सिन्गटनचे, काय करावे, याबद्दल चर्चा करत, गोल करून बसले. लवकरच, हे लक्षात आले, की कोणीच त्या बाळाची जबाबदारी घ्यायला तयार नव्हते. चर्चा व वादविवाद दिवसभर चालू राहिले. प्रत्येकाने विरोध करता येणार नाही, अशी मोठी इच्छा प्रगट केली की त्यांचे घर फार लहान आहे किंवा त्यांना आधीच एक मूल आहे. आणि दुसरे त्यांना परवडू शकत नाही. त्यांनाही काय करावे, ते समजत नव्हते. ते उन्हाळ्यात परदेशी

जात, किंवा काही वर्षांनी बाहेरगावी जात, तेव्हा त्या बाळाचे काय करायचे, ते त्याना समजत नव्हते --- आणि असेच काही बाही! सगळ्यांना माहिती होते, की तो बाप कर्जात बुडालेला होता आणि घरही गहाण पडले होते. त्यामुळे बाळाला वाढवण्यासाठी, काहीच पैसे नव्हते. संध्याकाळी सहापर्यंत ही चर्चा चालली होती.

तेव्हा मध्येच त्या बापाची, ग्लोस्पन नावाची एक म्हातारी मावशी व्हर्जिनियाहून तिची टोपी व कोट न काढता, अचानक अवतीर्ण झाली. ती बसायलाही तयार नव्हती. मार्टीनी, व्हिस्की, शेरी काही घ्यायला तयार नव्हती. तिने जमलेल्या नातेवाईकांना जाहीर केले, की ती बाळाची जबाबदारी घ्यायला तयार आहे. अजून तिने काय सांगितले, तर ती त्याचा शिक्षणासकट सर्व खर्च करेल. तेव्हा आता सगळ्यांनी आपापल्या घरी जायला व त्यांच्या सद्सदविवेकबुद्धीला विश्रांती द्यायला हरकत नाही, असे बोलून ती वरती गेली व पाळण्यातून बाळाला काढले. त्याला छातीशी धरून, तिने घर सोडले. दाईसकट सर्वजण अवाक होऊन बघत राहिले. अशा तऱ्हेने तेरा दिवसांच्या लेक्सिन्गटनने न्यूयॉर्क सोडले व दक्षिणेकडे त्याच्या आजीबरोबर व्हर्जिनियाला जाऊ लागला. लेक्सिन्गटनची पालक झालेली ग्लोस्पनमावशी सत्तर वर्षांची होती. पण तिच्याकडे पाहिले, तर असे कधीच वाटायचे नाही. ती तिच्या वयाच्या अर्ध्या वयाची व उत्साही दिसायची. तिचा चेहरा छोटासा, सुरकुत्या पडलेला पण तरीही सुंदर होता व डोळे तपकिरी व चमकदार होते. ती प्रौढ कुमारिका होती. पण तुम्हाला तिच्याकडे बघून, असे वाटले नसते. ती कधी चिडचिड करत नसे किंवा कटू, गुळमुळीत बोलत नसे. कुणाचा हेवा करत नसे.

तिला मिशा नव्हत्या. पण ती थोडी विचित्र होती, यात काही संशय नव्हता. गेली तीस वर्षे ती निळ्या डोंगरउतारावर गावापासून दूर, एका लहानशा घरात एकाकी आयुष्य जगत होती. तिच्याकडे पाच एकराचे कुरण होते. ती भाज्या उगवायची जागा होती. फुलांची बाग, तीन गाई, डझनभर कोंबड्या व एक तरूण कोंबडा होता. आणि आता छोटा लेक्सिन्गटनही होता. ती मांसाहार अजिबात करत नसे. प्राणी खाणे म्हणजे तिला सुदृढता घालवणारे, दुष्टपणाचे आणि गचाळ वाटे. ती अंडी, लोणी, दूध, चीज, सुका मेवा, औषधी वनस्पती व फळांवर रहात असे. तिची अशी धारणा होती, की तिच्यासाठी कुठल्याही प्राण्याची हत्या केली जाऊ नये. कोळंबीदेखील नाही. जेव्हा तिच्या एका कोंबडीने अंडी घालणे बंद केले, तेव्हा ग्लोस्पनमावशी इतकी नाराज झाली, की तिने अंडी खाणे पूर्णपणे सोडून दिले. तिला बाळांना कसे वाढवतात, हे काहीच माहिती नव्हते. पण ती डगमगली नाही. न्यूयॉर्क रेल्वे स्टेशनवर तिला व्हर्जिनियाला नेण्यासाठी लेक्सिन्गटनसकट ती उभी होती, तेव्हा तिने बाळाला दूध पाजायच्या सहा बाटल्या, डायपर्स, सेफ्टी पिन्स, प्रवासातील दुधाची गरज भागवणारा एक डबा व बाळांची निगा राखण्यासंबधीचे एक पुस्तक घेतले. अजून काय लागते? जेव्हा गाडी चालू पडली, तेव्हा तिने बाळाला बाटलीतून दूध पाजले. त्याचे ओले कपडे बदलले आणि त्याला झोपवून खाली ठेवले. मग ती तिने विकत घेतलेले पुस्तक वाचू लागली.

ती बोलली, “मला काही समस्या दिसत नाही.” आणि खरेच तशी नव्हती. घरी परतल्यावर, सर्व काही व्यवस्थित चालू झाले. छोटा लेक्सिन्गटन दूध प्यायचा, ढेकर द्यायचा आणि जांभया देऊन शहाण्या मुलासारखा झोपून

जायचा. ग्लोस्पनमावशी आनंदाने उजळायची. हळूहळू लेक्सिन्गटन सोनेरी केसांचा व निळ्या डोळ्यांचा सुंदर मुलगा दिसू लागला. तो आनंदी व तेजस्वी होता आणि आधीच वयस्क आजीला सर्व बाबतीत मदत करायला शिकला होता. अंडी गोळा करणे, ताक घुसळणे, जमिनीतून उकरून बटाटे काढणे व डोंगराच्या कडेच्या औषधी वनस्पती गोळा करणे. लवकरच ग्लोस्पनमावशीने स्वतःशी त्याच्या शिक्षणासंबंधी विचार सुरू केला. पण त्याला लांब शाळेत पाठवण्याचा विचार तिला करवेना. ती त्याच्यावर इतके प्रेम करू लागली होती, की थोडा वेळसुद्धा तो नजरेआड झाल्यास ती अस्वस्थ होई. अर्थात गावात खोलगट दरीत शाळा होती. पण ती जागा भयाण वाटत असे. आणि त्याला तिथे पाठवले, तर नक्कीच ते त्याला पहिल्याच दिवशी सामिष आहार करायला लावतील, अशी भीती तिला होती. तो स्वयंपाकघरात स्टुलावर बसून तिच्याकडे ती चीज बनवतांना पहात होता, तेव्हा ती म्हणाली, “माझ्या प्रिय मुला, तुला माहिती आहे का, मला असे वाटते, की मीच तुला का शिकवू नये?”

मुलाने त्याच्या मोठ्या निळ्या डोळ्यांनी तिच्याकडे पाहिले व विश्वासपूर्वक हसला व म्हणाला, “ते छानच होईल.”

“मी तुला पहिली गोष्ट कुठली शिकवेन, तर स्वयंपाक कसा करायचा.”

“ग्लोस्पनमावशी, मला ते आवडेल.”

“तुला आवडो की नावडो, पण कधीतरी तुला हे शिकावेच लागेल. आपल्यासारख्या सामिष आहार न करणाऱ्यांसाठी, सामान्य लोकांसारखे

खाण्याचे खूप पदार्थ नसतात. पण आहे त्यात, आपण काय काय करू शकतो, ते आपण शिकले पाहिजे.

मुलगा बोलला, “ग्लोस्पनमावशी, आपण खात नाही असे, सामान्य लोक काय खातात?

ती तिचे डोके उबग आल्यासारखे हलवत, उत्तरली, “प्राणी.”

“म्हणजे जिवंत प्राणी?”

“नाही. मारलेले.”

मुलाने क्षणभर विचार केला. “म्हणजे ते मेल्यावर, त्याना पुरण्याऐवजी ते खातात?”

“ते ते प्राणी मरायची वाट बघत नाहीत. ते त्यांना मारतात.”

“ग्लोस्पनमावशी, ते त्यांना कसे मारतात?”

“ते सहसा त्यांचा गळा सुरीने चिरतात.”

“पण कुठल्या प्रकारचे प्राणी?”

“जास्त करून गाई, डुकरे व मेंढ्या.”

मुलगा ओरडला, “गाई? म्हणजे डेझी, स्नोड्रॉप व लिलीसारख्या?”

“बरोबर, माझ्या मुला.”

“ग्लोस्पनमावशी, पण ते त्यांना कसे खातात?”

"ते त्यांचे तुकडे करून शिजवतात. ते जेव्हा लाल, रक्ताळलेले व हाडाना चिकटलेले असते, तेव्हा ते त्याना सर्वात आवडते. त्यांना रक्त निघणारे, गाईच्या मासाचे लपके खायला आवडतात.

"डुकरे पण?"

"त्यांना डुकरे आवडतात."

मुलगा म्हणाला, "डुकराच्या मासाचे रक्ताळलेले लपके! मी कल्पना करू शकतो. अजून काय खातात?"

"कोंबडी"

"कोंबडी?"

"हजारो कोंबड्या."

"पिसे पण?"

"नाही रे मुला, पिसे नाही. आता बाहेर पळ आणि ग्लोस्पन मावशीला चिव्हेसची [ कांद्यासारखे एक झाड ] झुडुपे आणून दे. देशील का?"

तो पाच विषय शिकला. वाचन, लेखन, स्वयंपाक, अंकगणित आणि भूगोल. पण स्वयंपाक त्याला सर्वात आवडला. लवकरच हे लक्षात आले, की त्याला त्यात चांगली गती आहे. तो जन्मजात स्वयंपाकी होता. त्याच्या हातात कसब होते व तो चटपटीतपणे सगळे करे. तो एखाद्या जादुगारासारखी भांडी हाताळी. त्याच्या आजीपेक्षा कमी वेळात तो बटाटा सोलून त्याचे वीस पातळ काप करे. त्याचा टाळू खूप पटकन चव जाणणारा होता. त्याला कांद्याच्या सूपची चव कळे आणि लहानशा कढीलिंबाचे पान घातलेलेही कळे. इतक्या

लहान मुलाला हे समजते हे बघून, ग्लोस्पनमावशी अवाक होई. आणि खरे तर तिला कळत नसे की या मुलाचे काय करावे. पण तिला त्याचा फारच अभिमान वाटे. आणि याचा भविष्यकाळ उज्वल असल्याचे ती बघे. ती मनाशी विचार करे, "माझ्याकडे म्हातारपणी बघायला असा नवलपूर्ण मुलगा आहे, हे माझे चांगले नशीब आहे." काही वर्षांनी तिने स्वयंपाकातून अंग काढून घेतले.

आता स्वयंपाकाची सगळी जबाबदारी लेक्सिन्गटनने उचलली. आता तो दहा वर्षांचा होता आणि ग्लोस्पनमावशी ऐशीच्या घरात पोचली होती. त्याच्या हातात स्वयंपाकघर आल्यावर, त्याने निरनिराळे प्रयोग करायला, स्वतः शोधून काढलेले पदार्थ बनवायला सुरवात केली. जुने आवडते पदार्थ त्याला रुचीपूर्ण वाटेनात. त्याला नवीनतेचा ध्यास होता. त्याच्या डोक्यात शेकडो कल्पना होत्या. तो म्हणाला, "मी आक्रोडांचे सूप करून सुरवात करतो. त्याने ते केले व जेवतांना दिले. ग्लोस्पनमावशी खुर्चीवरून उडी मारून, त्याच्या दोन्ही गालांचा पापा घेत बोलली, "तू अलौकिक बुद्धिमत्तेचा आहेस. तू इतिहास घडवलास."

त्या दिवसापासून असा एकही दिवस गेला नाही, की जेव्हा त्याने एखादा चविष्ट पदार्थ बनवला नाही. ब्राझीलनट सूप, होमिनी कटलेट्स, चीज घातलेली भाजी, ऑम्लेट, क्रीमचीजचे बारीक तुकडे भरलेली कोबी, असे अनेक पदार्थ त्याने बनवले. ग्लोस्पनमावशी म्हणाली, की तिने जन्मात असे चविष्ट पदार्थ कधी खाल्ले नव्हते. सकाळी जेवणापूर्वी ती घराच्या पुढील छत असलेल्या जागी तिच्या डुलणाऱ्या खुर्चीत जाऊन, स्वयंपाकघराच्या खिडकीतून येणारे वास घेत, आज जेवणात काय असेल, याचा तर्क करत बसे. ती विचारी, मुला,

तू आज काय बनवले आहेस? तो म्हणे, “ग्लोस्पनमावशी, तू तुझा अंदाज सांग.”

ती जोराने हुंगून म्हणे, “मला सॅल्सिफाय [ युरोपियन कंद ] चा वास येतो आहे.”

मग तो दहा वर्षांचा मुलगा बाहेर येऊन तोंडभर हसत विजयाने गोड वासाची मुळांची वाफाळलेली भाजी घेऊन येई. तिची चव घेत, ती म्हणे, “काय करायचे ते तुला छान कळते. तू आताच्या आता कागद व पेन घेऊन स्वयंपाकाचे पुस्तक लिहायला घेतले पाहिजेस.”

त्याने भाजी चावत, टेबलापलीकडून तिच्याकडे पाहिले. ती ओरडली, “का नाही? मी तुला लिहायला शिकवले आहे व स्वयंपाक करायलाही शिकवले आहे. तेव्हा तुला एवढेच करायचे आहे, की दोन्ही गोष्टी एकत्र करून, पुस्तक लिहायचे आहे. प्रिय मुला, तू स्वयंपाकावरचे पुस्तक लिही. ते तुला जगप्रसिद्ध करेल.”

तो म्हणाला, “ठीक आहे. मी लिहितो.”

त्या दिवसापासून, लेक्सिन्गटनने ते मोठे काम सुरु केले, जे पुढे आयुष्यभर त्याला कार्यरत ठेवणार होते. त्याने त्याचे नाव ठेवले, ‘चांगले आणि सकस खा’

सात वर्षांनी, तो सतरा वर्षांचा झाला, तेव्हा त्याने नऊ हजार वेगवेगळया चविष्ट नावीन्यपूर्ण पाककृती बनवण्याचा पराक्रम केला होता. पण अचानक त्याच्या या मेहनतीत ग्लोस्पनमावशीच्या निधनाने, खंड पडला.

रात्री तिला जोरदार चक्कर आली. कसला आवाज येतो आहे, हे बघायला लेक्सिन्गटन तिच्या झोपायच्या खोलीत घुसला. त्याने तिला अंथरुणावर झोपून ओरडताना पाहिले. ती ओरडून शिव्याशाप देत होती व अंग कसेही वेडेवाकडे हलवत होती. खरोखर, ते बघायला भयंकर दृष्य होते. नाराज झालेला, पायजमा घातलेला तो तिच्याभोवती हातवारे करत, काय करावे ते न कळून नाचत होता. शेवटी तिला शांत करायला म्हणून, त्याने गोठ्यातील तळ्यातून बादलीभर पाणी आणले आणि तिच्या डोक्यावर ओतले. पण यामुळे फक्त तिची चक्कर वाढली व तासाभरात म्हातारी वारली. ती नक्की मेली आहे याची खात्री करण्यासाठी तिला चिमटे काढत, बिचारा मुलगा म्हणाला, “हे फार वाईट झाले. किती अचानक आणि किती झटपट हे झाले! काही तासांपूर्वीच तर ती चांगली उत्साही होती. तिने मी केलेला नवीन पदार्थ, अळंबीचे बर्गर तीनदा वाढून घेऊन खाल्ले. तो छान झाल्याचेही सांगितले.”

खूप वेळ शोक केल्यावर, त्याला आजीच्या प्रेमाचे भरते आले. पण त्याने स्वतःला सावरले आणि तिला गोठ्याच्या मागे पुरले.

दुसऱ्या दिवशी तिच्या वस्तू आवरतांना, त्याला एक पाकीट मिळाले. ते तिच्या हस्ताक्षरात, त्याला उद्देशून लिहिले होते. त्याने ते उघडले. त्यात दोनशे पन्नास डॉलर्सच्या नोटा आणि चिठ्ठी निघाली. त्यात लिहिले होते, “प्रिय मुला, तू तेरा दिवसांचा असल्यापासून कधी डोंगरापलीकडे गेलेला नाहीस. पण मी मेल्याबरोबर तू बूट चढवून, व स्वच्छ शर्ट घालून, गावात गेले पाहिजेस व डॉक्टरला भेटले पाहिजेस. त्याला माझ्या मरणाचा पुरावा म्हणून, प्रमाणपत्र

द्यायला सांग. मग ते प्रमाणपत्र घेऊन माझ्या वकिलाकडे, मिस्टर झुकेरमनकडे जा. तो न्यूयॉर्कला रहातो. या पाकिटातील पैसे डॉक्टरला देण्यासाठी व तुझ्या न्यूयॉर्कच्या प्रवासासाठी आहेत. तू तिथे जाशील, तेव्हा मिस्टर झुकेरमन तुला अजून पैसे देतील. माझी तुला अशी कळकळीची विनंती आहे, की ते पैसे तू तुझ्या स्वयंपाकाच्या व भाज्यांच्या संशोधनासाठी वापर. ते नीटपणे पूर्ण होईपर्यंत, तुझ्या पुस्तकाचे काम तू सुरु ठेव.

तुझी प्रेमळ आजी, ग्लोस्पन

नेहमी त्याच्या आजीचे ऐकणाऱ्या लेक्सिन्गटनने पैसे खिशात ठेवले, बूट घातले, स्वच्छ शर्ट घातला व डोंगर ओलांडून डॉक्टर रहात होता, तिथे गावात गेला.

डॉक्टर म्हणाला, “म्हातारी ग्लोस्पन? अरे देवा, ती मेली?”

मुलगा उत्तरला, “खात्रीने ती मेली. तुम्ही माझ्याबरोबर घरी या. मी जमीन उकरून तुम्हाला दाखवतो, आणि तुम्ही बघून खात्री करा.”

डॉक्टरने विचारले, “तू किती खोल खणले आहेस?

“मला वाटते, सहा/ सात फूट असेल.”

“आणि किती वेळापूर्वी?”

“ओहो, साधारण आठ तासांपूर्वी असेल.”

“मग ती मेली आहे. मी प्रमाणपत्र देतो.”

आता आपला नायक मिस्टर झुकेरमनला भेटायला न्यूयॉर्कच्या प्रवासासाठी निघाला. त्याने पायी प्रवास केला. तो झुडुपांखाली झोपला. तो बेरी आणि रानटी वनस्पती खात राहिला. त्याला तिथे पोचायला सोळा दिवस लागले. सत्तावन्नाव्या रस्त्यावर उभे राहून आजूबाजूला बघत, तो म्हणाला, "काय शहर आहे! इथे गाई नाहीत, कोंबड्या नाहीत. इथे ग्लोस्पनमावशीसारखे कोणीच दिसत नाही."

लेक्सिन्गटनला मिस्टर सॅम्युएल झुकेरमन, त्याने पूर्वी पाहिलेल्या कोणासारखाच दिसला नाही. तो छोटासा, फोपशा, करड्या रंगाच्या ओघळलेल्या गालांचा, कोनफळी रंगाच्या नाकाचा माणूस होता. तो जेव्हा हसे, तेव्हा त्याच्या तोंडातून छान सोन्यासारखे तुकडे चकाकत. त्याच्या आरामशीर, मोठ्या कार्यालयात त्याने लेक्सिन्गटनशी हातमिळवणी केली. त्याने त्याच्या आजीच्या मरणाबद्दल, त्याचे अभिनंदन केले. तो म्हणाला, "तुला माहिती असेल की तुझी आवडती आजी/पालक चांगल्यापैकी पैसे राखून होती.

"म्हणजे तुम्हाला गाई आणि कोंबड्या असे म्हणायचे आहे का?"

मिस्टर झुकेरमन म्हणाले, "अर्धा मिलियन डॉलर्स."

"किती?"

"अरे मुला, अर्धा मिलियन डॉलर्स. आणि ते तिने तुला दिले आहेत." मिस्टर झुकेरमन खुर्चीत मागे रेलले आणि त्यांच्या मोठ्या पोटावरून हात फिरवला. त्याच वेळेस त्यांनी त्यांच्या कोटाच्या आत शर्टामध्ये गुप्तपणे उजवे बोट फिरवून खाजवायला सुरवात केली. हे ते नेहमी करत व त्यापासून त्यांना

आनंद मिळे. ते म्हणाले, "अर्थात त्यातील पन्नास टक्के मला माझी फी म्हणून कापून घ्यावे लागतील. पण तरीही तुला पंचवीस हजार डॉलर्स मिळतील."

लेक्सिन्गटन ओरडला, "मी श्रीमंत झालो. हे मस्त झाले. आता लवकरच मला पैसे मिळतील का?"

मिस्टर झुकेरमन म्हणाले. "असे बघ, येथील कर कापणाऱ्या अधिकाऱ्यांशी माझी ओळख आहे. मला आत्मविश्वास आहे, की मी सर्व मरणकर व काळे कर न घेण्यासाठी त्यांचे मन वळवू शकेन."

लेक्सिन्गटन पुटपुटला, "तुम्ही किती दयाळू आहात!"

"अर्थात मला कुणाला तरी पैसे चारायला लागतील."

"मिस्टर झुकेरमन, तुम्ही म्हणाल तसे."

"मला वाटते, एक लाख पुरेसे होतील."

"अरे बापरे, हे फारच आहेत, नाही का?"

मिस्टर झुकेरमन म्हणाले, "कर इन्स्पेक्टरला वा पोलिसाला कधीच कमी पैसे देऊन चालत नाही."

मुलाने शांतपणे विचारले, "बरोबर आहे. पण मग मला किती पैसे उरतील?"

"दीडशे हजार डॉलर्स. पण त्यातून तुला पुरण्याचा खर्च वजा करावा लागेल."

"पुरण्याचा खर्च?"

“पुरणाऱ्या संस्थेला तुला ते पैसे द्यावे लागतील. तुला ते माहिती असेल.”

“पण मिस्टर झुकेरमन, मी स्वतःच तिला गोठ्यामागे पुरले.”

वकील बोलला, “मला त्याबद्दल संशय नाही. तरी काय झाले?”

“मी कधीच पुरणाऱ्या संस्थेला बोलावले नाही.”

मिस्टर झुकेरमन शांतपणे म्हणाले, “तुला माहिती नसेल, पण या राज्यात असा कायदा आहे, की पुरणाऱ्या संस्थेचे बिल चुकते केल्याशिवाय वारसाला हक्काने मिळणारी रक्कम मिळणार नाही.”

“म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे, की असा कायदा आहे?”

“अगदी खात्रीने, असा कायदा आहे. पुरणाऱी संस्था ही एक राष्ट्रीय संस्था आहे. तिला संरक्षण मिळालेच पाहिजे.”

मिस्टर झुकेरमन स्वतः एका सार्वजनिक डॉक्टरांच्या गटाबरोबर एक संस्था चालवत असत. त्यात नऊ चैनबाज पुरणाऱ्या संस्था होत्या. ब्रुकलीनमध्ये त्यांचा किमती वस्तू ठेवायच्या पेट्या बनवणारा कारखाना होता. वॉशिंगट्नमध्ये प्रेत सडू नये म्हणून करायचे उपाय शिकवणारे एक पदवीधरांसाठीचे महाविद्यालय होते. मिस्टर झुकेरमन यांच्या दृष्टीकोनातून, मरण हे पूर्णपणे धार्मिक कर्मकांड होते. खरे तर हा सर्व व्यवसाय व्यापारासाठी येशूच्या जन्माइतकाच चलती असलेला होता. ते म्हणाले, असे एकट्यानेच जाऊन तुझ्या आजीला पुरायचा तुला अधिकार नाही. मुळीच नाही.”

“मिस्टर झुकेरमन, मला माफ करा.”

“हे तर त्रासदायक कृत्य आहे.”

“मिस्टर झुकेरमन, मी तुम्ही म्हणाल, तसे करेन. मला फक्त एवढे हवे आहे, की सर्वांचे सर्व पैसे दिल्यावर मला किती पैसे मिळणार आहेत.”

तिथे शांतता पसरली मिस्टर झुकेरमननी एक सुस्कारा टाकला आणि बेंबीजवळ बोट फिरवत, गुप्त खलबते चालू ठेवली. त्यांनी मोठ्याने हसत, सुचवले, “तुला पंधरा हजार मिळतील, नाही का?

“ही चांगली रक्कम आहे.”

“ती मी आज दुपारी माझ्याबरोबर घेऊन जाऊ शकतो का?”

“घेऊन न जायचे काही कारण मला दिसत नाही.”

मग मिस्टर झुकेरमननी त्याच्या रोखपालाला बोलावले आणि त्याला लेक्सिन्गटनला पंधरा हजार रोख व रिसीट द्यायला सांगितले. तो मुलगा बिचारा काहीतरी मिळाले या आशेने, ते कबूल करून बसला. ते पैसे त्याने त्याच्या पिशवीत ठेवले. मग त्याने मिस्टर झुकेरमनशी हातमिळवणी केली. त्यांचे आभार मानले आणि त्याने कार्यालय सोडले. रस्त्यावर आल्यावर आपल्या नायकाने चित्कार केला, “आता सर्व जग माझ्या मुठीत आहे. आता माझे पुस्तक छापले जाईपर्यंत, माझ्याकडे पंधरा हजार रोख आहेत आणि त्यानंतर अर्थात मला अजून मिळतील.” तो फुटपाथवर कुठल्या दिशेने जावे, असा विचार करत उभा राहीला. तो डावीकडे वळून, आजूबाजूची शोभा बघत सावकाश चालू लागला. तो हवा हुंगत बोलला, “काय छान वास येतो आहे. मी इथे थांबू शकतो. त्याच्या घ्राणेंद्रियाने त्याला स्वयंपाकघरातील खमंग वास दिला. बसच्या मागील बाजूने डिझेलचा धूर निघत होता. “माझे नाक पूर्णपणे

गाळात जायच्या आत मला येथून बाहेर पडले पाहिजे. पण तत्पूर्वी मला माझी भूक शमवली पाहिजे. मी भुकेने मरतो आहे. त्या गरीब बिचाऱ्या मुलाने काही थातुरमातुर खाऊन एवढा वेळ काढला होता. “मला छानसे होमिनी कटलेट आवडेल किंवा काहीतरी रसदार पेय.” तो स्वतःशीच बोलला. त्याने रस्ता ओलांडला आणि एका लहानशा हॉटेलात शिरला. आत गरम, शांत आणि अंधारी होते. कोबी आणि तुपाचा वास येत होता. अजून एकच तपकिरी टोपी घातलेले दुसरे गिऱ्हाईक होते. तो त्याच्या अन्नावर तुटून पडला होता. त्याने लेक्सिन्गटन आत आल्यावर त्याच्याकडे पाहिलेही नाही.

आपला नायक टेबलाच्या एका कोपऱ्यात बसला आणि त्याची बॅग खुर्चीच्या पाठीला लावली. हे फार रुचीपूर्ण चालले आहे, असे तो स्वतःशी म्हणाला. माझ्या सतरा वर्षांच्या आयुष्यात मी माझे दूध तापवून बाटलीत भरणारी दाई मॅकपोटल सोडली तर, मी आणि ग्लोस्पन मावशी, या फक्त दोघांसाठीच्याच, स्वयंपाकाचीच चव घेतली आहे. पण आता मी नवीन स्वयंपाक्याच्या हाताची चव घेणार आहे. आणि जर मी नशीबवान असेन, तर मला माझ्या पुस्तकासाठी, काही नवीन कल्पना मिळतील. मागील सावलीतून एक वेटर आला आणि त्याच्या टेबलाशेजारी उभा राहिला. लेक्सिन्गटन बोलला, ‘मला एक मोठे होमिनी कटलेट हवे आहे. ते तव्यावर प्रत्येक बाजूने आंबट क्रीमसकट पंचवीस सेकंद भाजायला हवे. ते देण्यापूर्वी त्यावर चिमूटभर लव्हेजचा शिडकावा करून द्यावे. अर्थात तुमच्या स्वयंपाक्याला याहून जास्त चांगली पद्धत माहिती असेल तर त्याची चव बघायला मला आनंदच होईल. वेटरने एका बाजूला डोके कलते ठेऊन गिऱ्हाईकाकडे पाहिले. त्याने विचारले,

“तुम्हाला भाजलेले डुकराचे मांस व कोबी हवे आहे का? एवढेच आमच्याकडे उरले आहे.”

“भाजलेले काय आणि कोबी?”

वेटरने खिशातून एक मातकट रुमाल काढला आणि तो चाबूक मारल्यासारखा जोराने हलवून, ओले नाक सूं सूं करत जोराने त्यात शिंकरले. नाकपुड्यांमधून हवा सोडत, तो म्हणाला, “तुम्हाला ते हवे आहे की नको?”

लेक्सिन्गटन बोलला, “ते काय आहे, याची मला मुळीच काहीही कल्पना नाही. पण ते चाखून बघायला मला आवडेल. असे बघ, मी स्वयंपाकावर पुस्तक लिहितो आहे आणि --- “ वेटर ओरडला, “एक डुकराचे मांस व कोबी” हॉटेलच्या मागील बाजूच्या अंधारातून, त्याला उत्तर मिळाले. वेटर नाहीसा झाला. लेक्सिन्गटन त्याच्या चांदीच्या खासगी सुरा आणि काटा यासाठी बॅगेकडे वळला. ते त्याला ग्लोस्पनमावशीने तो सहा वर्षांचा असतांना, भेट म्हणून दिले होते. तो नेहमी खायला तेच वापरे. खाणे येईपर्यंत तो ते प्रेमाने, फडक्याने पुसू लागला. लवकरच वेटर खाणे घेऊन आला. एका ताटलीत जाड करडा पांढरा तुकडा होता. वास घेण्यासाठी, लेक्सिन्गटन अधीरतेने पुढे वाकला. तो वाफाळता पदार्थ त्याच्यासमोर ठेवल्यावर, त्याचा वास घेण्यासाठी त्याच्या नाकपुड्या, थरथरत, हुंगत फुलल्या. तो बोलला, ”हे तर स्वर्गासारखे आहे. काय घमघमाट येतो आहे! त्याच्या गिऱ्हाईकाकडे काळजीपूर्वक बघत, वेटर एक पाऊल मागे झाला.

त्याची सुरी व काटा सरसावून, आपला नायक ओरडला, “माझ्या आयुष्यात मी कधीच इतका छान आणि नवलपूर्ण वास घेतलेला नाही. हे बनवले आहे तरी कसे?” तपकिरी कपड्यातील माणसाने आजूबाजूला पाहिले व खाण्याकडे वळला. वेटर स्वयंपाकघराकडे निघाला होता. एक लहानसा मासाचा तुकडा लेक्सिन्गटनने कापला. तो काट्याला लावला. तो वास घेण्यासाठी नाकापर्यंत नेला. नंतर तो तोंडात टाकला. तो हळूहळू चावू लागला. त्याचे डोळे अर्धवट मिटलेले होते. शरीर आतुरले होते. तो ओरडला, “हे अप्रतिम आहे. हा काही नवाच स्वाद आहे! ओहो, माझ्या आवडत्या ग्लोस्पनमावशी, हा चविष्ट पदार्थ खायला, तू इथे असायला हवी होतीस. वेटर, ताबडतोब इकडे ये.”

आश्चर्यचकित झालेला वेटर दुसरीकडून त्याच्याकडे बघत होता. पण तो जवळ येत नव्हता. लेक्सिन्गटन शंभर डॉलरची नोट फडकावत म्हणाला, “जर तू जवळ येऊन माझ्याशी बोललास, तर मी तुला एक भेट देईन. कृपया जवळ येऊन माझ्याशी बोल.”

वेटर घाबरत टेबलाशी आला आणि नोट घेऊन गेला. तो सर्व बाजूंनी त्या नोटेकडे बघू लागला. मग त्याने ती पटकन स्वतःच्या खिशात टाकली.

त्याने विचारले, “अरे मित्रा, मी तुझ्यासाठी काय करू शकतो?

लेक्सिन्गटन म्हणाला, “हा चविष्ट पदार्थ कसला व कसा बनवला आहे, हे तू मला सांगितलेस, तर तुला मी अजून शंभर डॉलरची नोट देईन.”

“मी तुला आधीच सांगितले आहे. हे डुकराचे मांस आहे.”

“आणि पोर्क म्हणजे नक्की काय?”

वेटर त्याच्याकडे निरखून बघत म्हणाला, “तू यापूर्वी कधी डुकराचे भाजलेले मांस खाल्ले नाहीस?”

“कृपा करून, मला काय ते सांग. मला असे संशयात ठेऊ नकोस.”

वेटर म्हणाला, “हे डुक्कर असते. ते बंद भांड्यात ओव्हनमध्ये ठेवायचे.”

“डुक्कर?”

“पोर्क म्हणजे डुक्कर असते. तुला हे माहिती नाही का?”

“म्हणजे हे डुकराचे मांस आहे?

“खात्रीने हो.”

मुलगा चाचरत म्हणाला, “पण --- पण हे अशक्य आहे. ग्लोस्पनमावशीला पदार्थांबद्दल जगातील कुणाहीपेक्षा जास्त माहिती आहे. ती म्हणाली होती की कुठल्याही प्रकारचे मांस हे उबग आणणारे, उलटी करणारे व भयंकर असते. आणि तरीही माझ्या ताटलीतील हा तुकडा मी आतापर्यंत चव घेतलेल्या जगातील कुठल्याही वस्तूपेक्षा जास्त चविष्ट आहे. आता तू याचे स्पष्टीकरण कसे देशील? ते तसे असते, तर मला ग्लोस्पन मावशीने ते सांगितले असते.”

वेटर म्हणाला, तुझ्या आजीला ते कसे शिजवायचे, ते माहिती नसेल.”

“हे शक्य असेल का?”

“हो, नक्कीच तसे असेल. विशेषतः पोर्क जर नीट शिजवले नाही तर ते खाता येत नाही.

लेक्सिन्गटन ओरडला, “युरेका! तसेच झाले असणार. तिने ते चुकीचे केले असणार.”

त्याने वेटरला अजून एक शंभर डॉलरची नोट दिली. “मला स्वयंपाक घरात घेऊन चल. हे कोणी बनवले, त्याच्याशी माझी गाठ घालून दे.”

लगेच लेक्सिन्गटनला तिथे नेले गेले. तिथे त्याची ते बनवणाऱ्या स्वयंपाक्याशी गाठ घालून देण्यात आली. तो वयाने मोठा माणूस होता. त्याच्या मानेवर एका बाजूला पुरळ होते. वेटर बोलला, “आता तुला मला अजून शंभर डॉलर द्यावे लागतील. लेक्सिन्गटन फारच उपकृत झाला. पण यावेळेस त्याने पैसे स्वयंपाक्याला दिले. तो म्हणाला, “हे बघ, मला या वेटरने जे सांगितले, त्यामुळे मी गोंधळलो आहे. तुम्हाला खात्री आहे का, की मी आता खाल्लेला पदार्थ हा डुकराच्या मांसापासून बनवलेला होता?”

त्याने वेटरकडे बघून डोळे मिचकावले व बोलला, “मला वाटते, ते डुकराचे मांसच होते.”

“म्हणजे तुमची खात्री नाही आहे?”

“एखाद्याला खात्री कशी असेल?”

“मग ते दुसरे काय असू शकेल?”

स्वयंपाकी वेटरकडे बघत, हळू म्हणाला, “असेही असू शकेल की ते माणसाचे मांस आहे.”

“म्हणजे तुम्हाला माणूस म्हणायचे आहे?”

“हो.”

“अरे बापरे!”

“किंवा बाईही असू शकेल. बाई किंवा पुरुष, दोघे चवीला सारखेच लागतात.”

मुलाने जाहीर केले, “तुम्ही मला खरोखर थक्क करून सोडले आहे.”

“प्रत्येकजण जगतांना शिकतो.”

“हे खरे आहे.”

स्वयंपाक्याने जाहीर केले, “पण खरे तर, हल्ली आम्हाला डुकराच्या मासाऐवजी कसाई माणसाचे मासच पाठवू लागला आहे.”

“खरे की काय?”

“खरे तर हे सांगणे अशक्य आहे, की कुठले मांस कुणाचे आहे. दोन्ही चांगली असतात.”

“मी आता खाल्लेला पदार्थ फारच रुचकर होता.

स्वयंपाकी म्हणाला, “तुम्हाला तो आवडला, म्हणून मला आनंद झाला. पण प्रामाणिकपणे सांगायचे झाले, तर तो डुकराचा तुकडाच होता. मला त्याबद्दल खात्री वाटते.”

“असे म्हणता?”

“हो.”

लेक्सिन्गटन म्हणाला, “मग तसेच असणार. आता मी तुम्हाला अजून एक शंभर डॉलरची नोट देतो. तुम्ही मला हे सांगा, की तुम्ही हा पदार्थ कसा बनवला?”

नोट खिशात ठेऊन, स्वयंपाकी डुकराच्या मासाचा तुकडा कसा शिजवायचा, याचे रंगीत वर्णन करू लागला. मुलाला त्या इतक्या छान पदार्थाच्या कृतीतील एकही शब्द चुकवायचा नसल्याने, स्वयंपाकघरातील टेबलावर बसून, सगळे तो त्याच्या वहीत लिहून घेऊ लागला.

स्वयंपाक्याचे सांगून झाले, तेव्हा त्याने विचारले, “एवढेच?”

“हो, एवढेच.”

“पण अजून काहीतरी असले पाहिजे.”

स्वयंपाकी म्हणाला, “तुम्हाला सुरवातीला डुकराच्या मांसाचा चांगला तुकडा मिळायला हवा. तर तुम्ही अर्धी लढाई जिंकता. डुक्कर चांगले असले पाहिजे आणि कसायाने त्याला चांगले कापले पाहिजे. नाहीतर, तुम्ही ते कसेही शिजवले, तरी वाईटच लागणार.”

लेक्सिन्गटन म्हणाला, “मला एक कापून दाखवा. म्हणजे मला शिकता येईल.”

स्वयंपाकी म्हणाला, “आम्ही स्वयंपाकघरात डुकरे कापत नाही. ब्रोनक्स मधील एका दुकानातून, तू आता खाल्लेला तुकडा आणला होता.”

“मग मला तो पत्ता द्या.”

स्वयंपाक्याने त्याला पत्ता दिला. आपला नायक दोघांचे त्यांच्या दयाळूपणाबद्दल, खूप वेळा आभार मानत, बाहेर पडला व एक टॅक्सी करुन ब्रोनक्सकडे निघाला. ते मोठे चार मजली दुकान होते. त्याच्या आजूबाजूला कस्तुरीमृगासारखा गोड वास येत होता. आत शिरायच्या जागी मोठी सूचना

लावलेली होती, की इथे येणाऱ्यांचे कुठल्याही वेळी स्वागत आहे. त्यामुळे लेक्सिन्गटनला धीर आला. तो इमारतीभोवती असलेल्या फरसबंद अंगणातून चालत गेला. मग त्याला खुणांचे फलक लागले. त्याप्रमाणे तो चालत राहिला. नंतर तो मुख्य इमारतीपासून वेगळ्या असलेल्या एका लोखंडी छताखाली आला. दरवाज्यावर नम्रपणे थाप देऊन, तो आत शिरला. तिथे त्याच्याआधी सहा लोक होते. तिथे दोन नऊ व अकरा वर्षांच्या मुलांसकट एक जाड बाई होती. जणू मधुचंद्राला आल्यासारखे, चमकदार डोळ्यांचे एक दाम्पत्य होते आणि तिथे एक लांब पांढरे हातमोजे घातलेली अशक्त बाई, समोर बघत ताठ बसलेली होती. तिने हात दुमडून मांडीवर ठेवले होते. लेक्सिन्गटनला आश्चर्य वाटले, की सगळे त्याच्यासारखे स्वयंपाकावर पुस्तके लिहित होते का. कोणी बोलत नव्हते. पण त्याने जेव्हा त्यांना मोठ्याने प्रश्न विचारला, तेव्हा त्याला उत्तर मिळाले नाही. ती मोठी माणसे फक्त गुप्तपणे एकमेकांकडे बघून हसली व डोकी हलवली. ती दोन मुले त्याच्याकडे तो वेडा असल्यासारखी रोखून बघत राहिली. लवकरच दार उघडून, गुलाबीसर आनंदी चेहऱ्याचा एक माणूस खोलीत डोकावला. तो म्हणाला, “पुढचा नंबर” मग दोन मुले व त्यांची आई उठून बाहेर गेले. दहा मिनिटांनी तोच मनुष्य परत येऊन म्हणाला, “पुढचा नंबर” मग मधुचंद्राला आल्यासारखे दिसणारे दाम्पत्य उडी मारून उभे राहिले व त्याच्यामागोमाग बाहेर गेले. दोन नवीन माणसे आली. ते मध्यमवयीन नवरा बायको होते बायकोच्या हातात वाणसामानाची पिशवी होती. “पुढचा नंबर” म्हटल्यावर, लांब पांढरे मोजे घातलेली बाई उठली व गेली. खूप लोक आले व कडक पाठीच्या खुर्च्यांवर बसले. परत चौथ्यांदा तो माणूस आला व आता

बाहेर जाण्याची पाळी लेक्सिन्गटनची होती. ‘‘माझ्या पाठोपाठ या’’ असे ऐकून तो मुलाला मुख्य इमारतीकडे नेऊ लागला. भरभर चालत मुलगा स्वतःशी बोलला, ‘‘हे किती उद्दीपित करणारे आहे! माझी एवढीच इच्छा आहे, की आता माझी ग्लोस्पनमावशी माझ्याबरोबर असायला हवी होती.’’

तो माणूस म्हणाला, ‘‘मी फक्त प्राथमिक काम करतो. मग मी तुला अजून दुसऱ्या कुणाच्या तरी हवाली करतो.’’

मुलगा विचित्रपणे ओरडला, ‘‘तुम्ही म्हणाल तसे.’’

प्रथम ते इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या ठिकाणी गेले. तिथे अनेक डुकरे वावरत होती. तो माणूस बोलला, ‘‘इथे याची सुरवात होते आणि इथून ती आत जातात.

‘‘कुठे?’’

‘‘तिथे.’’ त्या माणसाने कारखान्याच्या भिंतीबाहेर असलेल्या, एका लांब लाकडी निवाऱ्याकडे बोट केले. ‘‘आम्ही याला अडकवण्याची जागा म्हणतो. इकडून या.’’

रबरी बूट घातलेली तीन माणसे डझनभर डुकरांना त्या जागेत ढकलत होती. लेक्सिन्गटनही आत गेला. ‘‘आता ते त्यांना कसे अडकवतात, ते पहा. आत एक छत नसलेली लाकडी खोली होती. तिथे एक हुक असलेली स्टीलची वायर होती. ती भिंतीच्या कडेने तीन फुटांवर हलत होती. जेव्हा ती निवाऱ्याच्या शेवटाकडे गेली, तेव्हा तिथे तिची दिशा अचानक बदलली. तिथून ती उघड्या छतातून सरळ वर मुख्य इमारतीकडे गेली. गेली. बारा डुकरे शांतपणे लाकडी

खोलीतून त्याना भीती वाटत, हाकलत नेली गेली. रबरी बूट घातलेल्या एका माणसाने धातूची वायर खाली ओढली आणि जवळच्या डुकराला मागील बाजूने लावली. मग तो वाकला आणि वायरच्या एका बाजूचे वेटोळे करून, त्या डुकराच्या मागील पायात अडकवले. दुसरे टोक त्याने हलणाऱ्या वायरच्या हुकाला बांधले. वायर फिरत होती. तिचा फास बसून डुकराचे पाय वर मागे ओढले गेले आणि डुक्कर मागे मागे जाऊ लागले. पण पडले नाही. ती डुकराची झटपट हालचाल होती. ते कसेबसे तीन पायांवर तोल सांभाळून होते व हिसक्याला तोड देत फूटाफूटावर उड्या मारत होते. जिथे वायरची दिशा बदलून ती  सरळ वर गेली, तिथे डुकराला अचानक धक्का दिला गेला आणि ते वर उचलले गेले. बचावाच्या किंकाळयांनी परिसर भरून गेला.

लेक्सिन्गटन म्हणाला, “ही लक्षवेधक आणि रुचीपूर्ण कृती आहे.”

“पण वर जातांना मजेशीर तुटणारा आवाज कसला येत होता?

तो माणूस उत्तरला, “बहुधा पायाचे हाड किंवा दोन पाय जिथून सुरु होतात, तेथील हाड मोडल्याचा.”

“पण असा आवाज आलेले चालते का?”

“न चालायला काय झाले?”

“तुम्ही हाडे खात नाही का?”

रबरी बूट घातलेले लोक एकामागून एक डुकरांना बांधल्यावर, त्यांना फिरत्या वायरच्या हुकाला अडकवण्यात गुंग होते. नंतर त्याना उघड्या छतामधून, दोरीच्या सहाय्याने त्यांच्या ओरडण्यासहीत बाहेर फेकले जात होते.

लेक्सिन्गटन म्हणाला, “भाज्या तोडण्यापेक्षा ही कृती फारच वेगळी आहे. ग्लोस्पनमावशीने हे कधीच केले नसते.” शेवटचे डुक्कर वर उचलले गेले, तोपर्यंत लेक्सिन्गटन, आकाशाकडे निरखून बघत होता. रबरी बूट घातलेला माणूस त्याच्याकडे गुपचूप आला आणि वायरचे एक टोक त्या मुलाच्या घोट्याला बांधले आणि दुसरे टोक हलणाऱ्या वायरला बांधले. पुढच्या क्षणी काय होते आहे, हे कळायच्या आत, आपल्या नायकाच्या पायाला धक्का बसून, तो अडकण्याच्या खोलीत ओढला गेला. तो ओरडला, “थांबवा. माझा पाय अडकला गेला आहे.” पण कुणालाही ते ऐकू गेले नाही. पाच सेकंदानी दुःखी मुलगा धक्का बसून जमिनीवरून उचलला गेला आणि एक कोपर अडकलेल्या अवस्थेत, गळाला लागलेल्या माशासारखा, उघड्या छतातून सरळ वर गेला.

“मदत करा. मदत करा. मोठी चूक झाली आहे. मशीन थांबवा. मला खाली उतरवा.”

त्या माणसाने तोंडातून सिगरेट बाजूला केली आणि शांतपणे वर खेचल्या जाणाऱ्या मुलाकडे पाहिले. पण तो काहीच बोलला नाही. रबरी बुटातील माणसे आधीच डुकरांचा पुढचा ताफा आणायला गेली होती.

आपला नायक ओरडत होता, “मला वाचवा. मला खाली उतरवा.” पण आता तो इमारतीच्या सर्वात वरील मजल्यावर चालला होता. तिथे वेगवान पट्टा सापासारखा वळून, भिंतीतील मोठ्या भोकाकडे, दार नसलेल्या दाराकडे जात होता. तिथे उंबरठ्यावर गडद पिवळे रबरी ॲप्रन घातलेले, स्वर्गाच्या दारातील

सेंट पीटरसारखे दिसणारे पहारेकरी उभे होते. लेक्सिन्गटनने त्यांना वरपासून खालपर्यंत पाहिले. पण तरीही त्याला त्यांच्या चेहऱ्यावर पूर्ण शांततेची व दयाळूपणाची जाणीव झाली. ते चेहरे आनंदी असून, त्यांचे डोळे चमकून, ते खेदपूर्वक हसत होते. गालावर खळ्या पडत होत्या. या सर्वामुळे, त्याला आशा वाटली.

पहारेकरी हसत म्हणाला, “हॅलो.”

आपला नायक ओरडला, “लवकर, मला वाचवा.”

“आनंदाने.” त्याच्या डाव्या हाताने त्याने लेक्सिन्गटनचा कान पकडून, मोठ्या चपळपणे, कसब वापरून, सुरीने मानेची शीर कापली. वायरचा पट्टा फिरत होता. त्याबरोबर लेक्सिन्गटन फरफटत होता. सगळे काही उलटे पालटे होते. त्याच्या घशातून रक्त गळून डोळ्यात येत होते. पण तरी त्याला अजून दिसत होते. त्याला एका लांब खोलीत आणल्यासारखे वाटले आणि खोलीच्या दुसऱ्या टोकाला, विस्तवावर ठेवलेले, धूर येणारे, पाणी असलेले आणि मोठे झाकण व हँडल असलेले भांडे होते. त्यातील वाफेत अर्धवट लपलेल्या अंधारी आकृती उद्दीपित होऊन, नाचत होत्या. त्यावरून वायरचा पट्टा फिरत होता. त्या उकळत्या पाण्यात, डुकरे एक एक करून, बुडत होती. त्यांच्या पुढच्या पायात, पांढरे मोजे होते. एकाएकी आपल्या नायकाला झोप येऊ लागली. पण त्याच्या चांगल्या बळकट हृदयाने शेवटच्या रक्ताचा थेंब बाहेर पंप केला जगातील शक्य असेल, ते सर्व चांगले पुढे केले गेले.

# Edward the Conqueror

# जेता एडवर्ड



तिच्या हातात भांडी कोरडे करायचे फडके धरून, लुईसा घराच्या मागील बाजूला असलेल्या स्वयंपाकघराच्या दारातून ऑक्टोबरच्या गार उन्हात बाहेर पडली. तिने हाक मारली, ‘‘एडवर्ड! जेवण तयार आहे. क्षणभर ती ऐकत थांबली. मग हिरवळीवर चालत गेली. तिने ती ओलांडली. तिला थोडी सावली मिळाली. गुलाबांच्या कडेने, सौरघड्याळाला बोटाने स्पर्श करत, ती डौलदारपणे चालत राहिली. ती छोटीशी व जाड होती. तिच्या चालण्यात झोक होता. चालतांना तिचे खांदे व हात झोका घेतल्यासारखे हलत असत. ती

मलबेरी झाडाखालून गेली. विटांच्या रस्त्यावरून चालत त्या मोठ्या बागेच्या शेवटाकडे गेली.

“एडवर्ड, जेवण.”

आता ऐंशी यार्डावर जंगलामध्ये त्याची उंच, बारीक, खाकी पँटमधील व गडद हिरव्या स्वेटरमधील आकृती तिला दिसत होती. त्याच्या हातातील चिमट्याने तो अग्नीमध्ये काळ्या बेरीच्या डहाळ्या टाकत होता. ती आग शेंदरी ज्वाळांनी जोरात भडकत होती.  पांढऱ्या धुराची वलये त्यातून निघत होती व बागेत पसरत होती. हिवाळ्याचा व जळणाऱ्या पानांचा नवलपूर्ण वास सुटला होता. लुईसा उतारावरून, तिच्या नवऱ्याकडे गेली. तिला हवे असते, तर ती त्याला हाक मारून तिचा आवाज त्याला ऐकायला लाऊ शकली असती. पण तिथे पेटलेल्या मोठ्या आगीच्या जाळाने, तिला तिकडे खेचले. ती इतक्या जवळ पोचली, की तिला धग लागू लागली व जळतानाचा आवाज येऊ लागला. ती त्याच्या जवळ जात म्हणाली, “जेवण”

“ओहो, ठीक आहे. हो. मी येतो.”

“केवढी आग पेटली आहे.”

तिचा नवरा म्हणाला, “मी ही सगळी जागा स्वच्छ करायचे ठरवले आहे. मी या झाडाझुडुपांच्या पसाऱ्याला कंटाळलो आहे.” त्याचा लांब चेहरा घामाने ओला झाला होता. त्याच्या मिशांवर दवबिंदूसारखे घर्मबिंदू चिकटले होते. आणि दोन लहानशा नद्या त्याच्या घशावरून स्वेटरच्या मानेवर वहात होत्या.

“एडवर्ड, तू अती श्रम करू नकोस.”

“लुईसा, तू मला ऐंशी वर्षांच्या माणसासारखे वागवायचे सोडून दे. थोड्या व्यायामाने काही तोटा होत नाही.”

“हो, प्रिय एडवर्ड, मला ते माहिती आहे. ते बघ. ते बघ.”

त्या माणसाने वळून आगीच्या लांबवरच्या टोकाकडे निर्देश करणाऱ्या लुईसाकडे बघितले. “एडवर्ड, तिथे मांजर आहे.”

आगीच्या जवळ जमिनीवर बसून, जवळ जवळ आगीला चिकटून एक वेगळ्याच रंगाचे मोठे मांजर बसले होते. ते एका बाजूला डोके करून, त्या दोघांकडे पिवळ्या डोळ्यांनी बघत स्थिर बसले होते.

लुईसा ओरडली, “ते भाजेल.” तिने तिच्या हातातील फडके हळूवारपणे फेकले व दोन्ही हातांनी त्याला पकडले. त्याला लांब हाकलत जिथे आगीची घग नव्हती, अशा गवतावर ठेवले. तिचे हात झटकत ती बोलली, “अरे मूर्ख मांजरा, तुला काय झाले आहे?”

तिचा नवरा म्हणाला, “ते काय करत आहेत, ते मांजरांना माहिती असते. मांजरे त्याना नको असलेले काही कधीच करत नाहीत. नाहीतर ती मांजरे कसली?”

“हे कोणाचे आहे? तू यापूर्वी ते पाहिले होतेस का?”

“नाही. कधीच नाही. काही वेगळाच रंग आहे, नाही का?” ते मांजर गवतावर बसून तिरप्या नजरेने त्यांच्याकडे बघत होते.  त्या डोळ्यात व सर्व काही जाणत असल्यासारखे काही चौकस गंभीर भाव होते. आणि नाकावर तुच्छतेचा नाजूक फणकारा होता, जसे काही, एक छोटीशी व जाड आणि दुसरा

वाकलेला व घामट, ही दोन माणसे आश्चर्यकारक व फालतू प्राणी होते. मांजरासाठी तो डोळ्यांचा रंग अगदी वेगळा होता --- निळ्याचा लवलेशही नसलेला पूर्ण चंदेरी आणि अंगावरचे केस फार लांब व मऊ होते.

लुईसाने वाकून त्या मांजराच्या डोक्यावरून हात फिरवला. ती म्हणाली,

"तुला घरी जायला पाहिजे. तू चांगले मांजर आहेस ना?"

एडवर्ड व लुईसा टेकडीवरून घराकडे निघाले. त्यांच्यामागून मांजरही येऊ लागले. प्रथम ते लांब होते पण हळूहळू जवळ येऊ लागले. आता ते त्यांच्याबरोबर चालू लागले. मग त्यांच्यापुढे गेले. हिरवळीवरुन घराशी आले. जसा काही तो सगळा परिसर ओळखीचा असल्यासारखे ते शेपटी शिडासारखी ताठ ठेऊन, चालले होते.

एडवर्ड म्हणाला, "तुझ्या घरी जा. आम्हाला तू नको आहेस."

पण ते दोघे घरी पोचले तेव्हा त्यांच्यापाठोपाठ ते ही आले. लुईसाने त्याला थोडे दूध दिले. जेवणाच्या वेळी, ते त्या दोघांच्यामधील एका रिकाम्या खुर्चीत चढून बसले. जेवणभर ते त्याचे डोके टेबलाच्यावर काढून बसले होते. त्यांचे काय चालले आहे, ते त्याच्या पिवळया डोळयांनी एकाकडून दुसऱ्याकडे सावकाश बघत बसले होते.

एडवर्ड म्हणाला, "मला हे मांजर आवडले नाही."

"ओहो, मला तर हे सुंदर वाटते. मला वाटते, त्याला अजून थोडा वेळ राहू दे."

“लुईसा, माझे ऐक. हे मांजर इथे राहू शकणार नाही. ते दुसऱ्या कुणाचे तरी आहे. ते वाट चुकले आहे. ते दुपारभर इथे घुटमळत राहिले, तर तू त्याला पोलिसाकडे नेलेले बरे राहील. ते त्याला त्याच्या घरी पोचवतील.”

जेवणानंतर एडवर्ड पुन्हा बागेतील कामाला लागला. लुईसा नेहमीप्रमाणे पियानोकडे वळली. तिला संगीताचे प्रेम होते व ती पियानो उत्तम वाजवत असे. रोज दुपारी तासभर तिचा रियाज चाले. आता मांजर सोफ्यावर पहुडले होते. त्याला थोपटण्यासाठी, ती त्याच्याजवळ गेली. त्याने डोळे उघडून क्षणभर तिच्याकडे पाहिले, लगेच ते मिटून घेतले व झोपी गेले.

ती बोलली, “तू एक छान मांजर आहेस. तुझा रंग इतका मस्त आहे. मला वाटते, तुला ठेऊन घ्यावे.” मग तिचा हात मांजराच्या डोक्यावरील मऊ केसांवरून फिरू लागला. तिथे तिच्या हाताला एक टेंगूळ लागले. उजव्या डोळ्याखाली थोडी सूज आली होती. ती म्हणाली, “बिचारे मांजर, तुझ्या सुंदर चेहऱ्यावर सूज आली आहे. तू जास्त वयाचे झाले असणार.”

ती लांब जाऊन पियानोच्या स्टुलावर बसली. पण तिने लगेच वाजवायला सुरवात केली नाही. तिचा छोटासा आनंद असा होता, की रोज मस्त मैफिल जमवून आणायची. त्या काळजीपूर्वक बसवलेल्या कार्यक्रमाचा सराव ती वाजवायला सुरवात करण्याआधी करत असे. पुढे काय वाजवायचे हे आठवत, मध्येच थांबून, ती तिच्या आनंदात खंड पाडत नसे. प्रत्येक तुकडा वाजवल्यावर, श्रोते टाळ्या वाजवेपर्यंत व तिने अजून वाजवण्याची मागणी करेपर्यंत, ती अगदी थोडा वेळ थांबे. समोर श्रोते बसले आहेत अशी कल्पना

करणे छान होते. नशीब चांगले असे त्या दिवशी, खोली जणू स्वरांमध्ये भिजून जाई आणि मग हळूहळू तो परिणाम कमी कमी होत संपे. तिला तिच्याकडे बघणाऱ्या चेहऱ्यांच्या ओळीच्या ओळी दिसत. तो श्रोत्यांचा समुद्र तल्लीनतेने व कौतुकाने तिचे वादन ऐकत असे. कधी ती स्मरणशक्तीने वाजवे, तर कधी पुस्तकात बघून वाजवे. आज ती तिच्या मनाला भावेल असे, आठवून वाजवणार होती. कार्यक्रम काय असेल? ती पियानोसमोर तिचे छोटेसे हात एकमेकात गुंफून, मांडीवर ठेऊन बसली. ती सुंदर चेहऱ्याची छोटीशी व जाड आकृती होती. तिने केसांचा आंबाडा बांधला होता. थोडे उजवीकडे बघून, तिला सोफ्यावर मुटकुळे करून झोपलेले मांजर दिसत होते. जांभळ्या उशीवर, त्याचे चंदेरी करडे अंग उठून दिसत होते.

तिने विचार केला, बाकच्या संगीताने सुरवात करावी का? किंवा त्याहून चांगले म्हणजे, विवाल्डी. बाकची ऑर्गनसाठीची सरगम --- डी मायनर कॉन्सेर्टो ग्रोसो --- हो, तीच पहिली वाजवू. मग कदाचित लिटील शूमन. कार्नव्हल? ते मस्त राहील. आणि त्यानंतर --- बदल म्हणून लीस्झ्ट. एखादे पेट्र्चचे सुनीत. सर्वात सुंदर असलेले दुसरे एफ मेजर. मग शूमनच्या काही आनंदी रचनांपैकी एखादी आणि मैफिलीच्या शेवटी, श्रोत्यांच्या आग्रहावरून, वाटले तर ब्राह्म्सच्या व वाल्ट्झच्या एखाददोन रचना.

विवाल्डी, शूमन, लीस्झ्ट, ब्राह्म्स. खूप छान कार्यक्रम होईल. हे ती साथीशिवाय सहजपणे उत्तम वाजवू शकते. तिने स्वतःला पियानोच्या थोडे जवळ नेले. थोडा वेळ थांबली. कारण श्रोत्यांमधून कोणीतरी खोकत होते.

तिला जाणवत होते, की आजचा दिवस चांगल्या नशीबाचा आहे. मग तिने डौलदारपणे दोन्ही हात उचलून, पियांनो वाजवायला सुरवात केली. त्या क्षणी ती मांजराकडे बघत नव्हती --- खरे तर ती त्याचे आस्तित्व विसरली होती. पण जसे विवाल्डीचे सूर हळूवारपणे खोलीभर पसरले, तिला एका डोळयाच्या कोपऱ्यातून तिच्या उजवीकडे सोफ्यावर वाऱ्याची काही खुसखुस ऐकू आली. लगेच ती वाजवायची थांबली. ती मांजराकडे वळून म्हणाली, "काय झाले? काही सेकंदांपूर्वी शांतपणे झोपलेले मांजर आता तणावपूर्ण रीतीने कान उंचावत, डोळे सताड उघडत, थरथरत, पियानोकडे टक लाऊन बघत, सोफ्यावर उठून बसले.

तिने हळूवारपणे विचारले, "मी तुला घाबरवले का? कदाचित तू यापूर्वी संगीत ऐकले नसशील." तिने तिचे तिलाच उत्तर दिले, "नाही." क्षणभर विचार करून तिला असे वाटले, की मांजराला भीती वाटली नव्हती. ते आक्रसून घेणे नव्हते, किंवा माघार घेणेही नव्हते. जर काही असलेच तर काहीशा उत्सुकतेने पुढे झुकणे होते. त्या प्राण्याच्या तोंडावर थोडे विचित्र भाव होते. आश्चर्य आणि धक्का यांचे मिश्रण होते. अर्थात मांजराचा चेहरा लहान असतो आणि त्यावरचे भाव खरे तर दिसत नाहीत. पण तुम्ही काळजीपूर्वक पाहिलेत, तर डोळे व कान यांच्या संयुक्तिक हालचालीने व विशेषतः कानाखालील कातडीच्या विशिष्ट थरथरण्याने, तुम्हाला प्रसंगवशात खोलवर भावनांचे प्रतिबिंब पहाता येते. आता लुईसा मांजराकडे जवळून बघत होती. आता परत काय होते हे बघण्यासाठी तिने पियानोकडे तिचे हात उंचावले. ती विवाल्डी वाजवायला लागली. यावेळेस मांजर त्यासाठी तयार होते. आणि सुरवातीला काय झाले,

तर मांजराचे शरीर थोडे ताणले गेले. पण जसजसे संगीत वाढले आणि पहिल्या द्रुत ठेक्याकडे आले, तसतसे त्या प्राण्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला. उभे राहिलेले कान खाली आले. पापण्या पडल्या आणि चेहरा एका बाजूला वळवला गेला. आता लुईसा शपथेवर सांगू शकत होती, की त्याला संगीत आवडत होते. तिला काय दिसले [ किंवा दिसले असे वाटले ] तर तिला अनेक वेळा जे दिसले होते, तेच की जेव्हा संगीत लोकांना पूर्णपणे गुंगवून टाकून, आपलेसे करते व एका विशिष्ट प्रमाणात सुरात बुडवून टाकते तेव्हा ते सुखावून उद्दीपित होतात. एखाद्याचे हसणे जसे समजते तसेच हेदेखील तिला समजते. लुईसाला अगदी तसेच भाव आता मांजराच्या चेहऱ्यावर दिसले.

लुईसाने एक भाग संपवला. मग सिसिलीआना वाजवले आणि हा सर्व वेळ ती सोफ्यावरील मांजराचे निरीक्षण करत राहिली. जेव्हा संगीत संपले, तेव्हा मांजराचे ऐकणेही संपले, तेव्हा त्याने डोळे उघडमिट केले, थोडे हलून, पाय ताणले व अजून आरामशीरपणे बसले. खोलीभर नजर फिरवली व काही अपेक्षेने तिच्याकडे पाहिले. हे एखाद्या रसिक श्रोत्याने  दाद द्यावी, तसेच झाले. संगीताच्या दोन तुकड्यांमध्ये ते थोडे मोकळे होत होते. हे वागणे अगदी मानवासारखेच होते. तिला छातीत काहीतरी दाटून आले. “तुला ते आवडले का? विवाल्डी तुला आवडले का?” ती हे बोलल्याक्षणी, तिला काही नको ते घडणार असल्यासारखे विचित्र वाटले --- म्हणजे एवढे विचित्र नाही वाटले. ठीक आहे. त्याचे आता एवढे काही नव्हते. कार्यक्रमातील पुढचे कार्निव्हल संगीत वाजवणे, तिने सुरु केले. तिने तसे करताच मांजर कडक होऊन सरळ

झाले. आवाजाबरोबर ते हळूवारपणे व आनंदाने त्या सुरांमध्ये बुडून गेले. ते विनोदी दृष्य होते.

आता कार्यक्रमाचा पुढचा भाग सुरु करायला हवा होता. तो कार्नव्हल होता. तिने वाजवायला सुरवात केल्यावर, मांजर पुन्हा कडक होऊन ताठ बसले. आणि सुरांनी बेभान झाले. लुईसाला नेहमीपेक्षा विचित्र वाटले. तिने विचार केला, मांजरासारखा प्राणी संगीतात इतका बुडून जाऊ शकतो. पण प्रगट करणे तर त्याला अवघड असते. त्याचा रसास्वाद घ्यायला त्याला अवघड असते. जगातील बरेचसे मानव संगीताचे रसग्रहण करण्यापर्यंत पोचत नसतील. कदाचित ती नागाला भूल घालणारी कृती असेल. शेवटी तुम्ही संगीताने नागाला भूल घालू शकलात, तर मांजराला का नाही? फक्त हजारो मांजरे त्यांच्या आयुष्यात रेडिओवर आणि पियानोवर रोज संगीत ऐकत असतील. पण तिला माहिती आहे, त्याप्रमाणे असे संगीत आवडणारे मांजर तिने पाहिले नव्हते. ते तर जणू त्याला प्रत्येक सूर कळत असल्यासारखे वागत होते. हे काहीतरी विशेष होते. पण ही नवलपूर्ण गोष्टदेखील नव्हती का? खरेच ती तशी होती. खरे तर ती चुकत नसेल, तर हा चमत्कार होता. शंभर वर्षातून प्राण्यांच्या बाबतीत एकदा होणारा चमत्कार होता. तिचा तो भाग वाजवून झाल्यावर, ती म्हणाली, "मी बघू शकते, की तुला ते आवडते आहे."

कुठले जास्त आवडले, विवाल्डी की शूमन?"

मांजराने काही उत्तर दिले नाही. श्रोत्यांचे लक्ष उडेल म्हणून लुईसाने सरळ कार्यक्रमाच्या पुढील भाग, म्हणजे लीस्झ्ट, पेट्रचचे दुसरे सुनीत वाजवायला

सुरवात केली.  आणि आता एक असामान्य गोष्ट घडली. तिने तीन चार पेक्षा जास्त धून वाजवल्या नसतील, तेव्हा त्या प्राण्याच्या मिशा हळूहळू थरथरू लागल्या. ते स्वतःला ताणत उंच झाले. त्याने डोके एका बाजूला व नंतर दुसऱ्या बाजूला कललेले ठेवले आणि भुवया उंच करत, अवकाशात असे पाहू लागले, की जणू ते म्हणत होते, "हे काय आहे? मला काही सांगू नकोस. मला चांगले माहिती आहे. फक्त क्षणभर तुला असे करणे शक्य आहे, असे समजू नकोस."

लुईसा अवाक झाली. तिने तिचे हसरे तोंड अर्धवट उघडे टाकून, वाजवणे सुरु ठेवले. ती वाट बघत राहिली, की आता पुढे काय होणार आहे. मांजर उभे राहिले. सोफ्याच्या कडेला गेले. पुन्हा बसले व अजून ऐकू लागले. मग अचानक जमिनीवर उडी मारून पियानोजवळच्या स्टुलावर, तिच्या शेजारी आले. तिथे बसून ते स्वप्नाळूपणे नव्हे, तर कान सरळ ठेऊन, पिवळे डोळे लुईसाच्या बोटांकडे रोखत, ते छान सुनीत लक्ष देऊन ऐकू लागले. शेवटचा सूर छेडून ती बोलली, "तर तू माझ्याशेजारी बसायला आले आहेस, नाही का? ठीक आहे. मी काही तुला हाकलत नाही. पण तू उड्या न मारता स्थिर बसले पाहिजेस. तिने हात लांब करून हळूवारपणे पाठीवर व डोक्यापासून शेपटीपर्यंत मांजराला थोपटले. हे लीस्झ्ट होते. तुला सांगते, हे संगीत कधीकधी फार हिन पातळीला जाते. पण त्यातही त्याचे सौदर्य दिसते. लहान मुलांच्या सिनेमाच्या बाबतीत असलेल्या विचित्र प्रतिसादासारख्या या प्राण्याच्या प्रतिसादाने तिला खूप मजा येत होती. त्यामुळे ती कार्यक्रमाच्या पुढील भागाकडे, शूमन याच्या किंडरसिनेनकडे वळली. तिने एक दोन मिनिटे वाजवल्यावर तिच्या लक्षात आले, की मांजर पुन्हा हलले आहे आणि त्याच्या मूळ जागी, म्हणजे सोफ्यावर

जाऊन बसले आहे. त्यावेळी तिचे लक्ष तिच्या हातांकडे होते त्यामुळे तिला मांजर गेलेले समजले नाही. ते अगदी हळूच शांतपणे गेले असणार. ते अजून तिच्याकडे बघत होते. अजूनही संगीतात गुंग झाले होते. तरीही लुईसाला असे वाटले, की आधीच्या लीस्झ्टच्या वेळी ते जितके आनंदी झालेले दिसत होते, तसे आता वाटत नव्हते. शिवाय त्याचे परत सोफ्यावर जाऊन बसणे, हे थोडे नाराज झाल्याचे निदर्शक होते. ते संपल्यावर तिने विचारले, ‘‘काय झाले? शूमनच्या बाबतीत काय वाईट होते? आणि लीस्झ्टमध्ये इतके वाखाणण्यासारखे काय होते? मांजर पिवळ्या डोळ्यांनी तिच्याकडे बघत होते.

ती स्वतःशी बोलली, हे खरेच रुचीपूर्ण व थोडे अस्वस्थ करणारे होत चालले आहे. पण तिथे सोफ्यावर बसलेल्या सावध आणि चटपटीत मांजराकडे बघतांना, ते अजून संगीत ऐकण्यासाठी थांबले आहे, अशी तिची खात्री झाली.

ती म्हणाली, ‘‘ठीक आहे, आता मी काय करणार आहे, ते तुला सांगते. मी आता खास तुझ्यासाठी माझ्या कार्यक्रमात बदल करणार आहे. तुला लीस्झ्ट जास्त आवडते आहे. त्यामुळे, मी त्यातील वेगळे काही परत वाजवते. ती आठवत राहिली. आणि मग त्यातील एक चांगली सुरावट, डर वायनाचट्सबामच्या लहान बारा सुरावटींपैकी एक वाजवू लागली. ती जवळून मांजराचे निरीक्षण करत होती. तिला पहिली गोष्ट  जाणवली ती म्हणजे, परत मांजराच्या मिशा थरथरू लागल्या. त्याने गालीच्यावर उडी मारली, क्षणभर शांत उभे राहिले व डोके वाकडे करून, उद्दीपित होऊन, शहारा देत उभे राहिले.

मग हळूवार चालीने पियानो जवळ घुटमळले. स्टुलावर चढून, तिच्याशेजारी बसले.

हे सर्व चालू असतांना एडवर्ड बागेतून आला. लुईसा उडी मारत किंचाळली, "एडवर्ड, ओहो, प्रिय एडवर्ड, हे ऐक. काय झाले ऐक."

"आता काय? मला चहा घ्यायला आवडेल." त्याचे नाक धारदार होते. फिकट कोनफळी चेहरा होता. घामामुळे तो चकाकत होता. पियानोवरील मांजराकडे निर्देश करत लुईसा ओरडली, "ते मांजर --- काय झाले, ते ऐकून तर घे."

"मला वाटते, मी तुला त्याला पोलिसांकडे न्यायला सांगितले."

"पण एडवर्ड, ऐकून तर घे. हे फारच उत्तेजित करणारे आहे. हे सांगीतिक मांजर आहे."

"हो?"

"या मांजराला संगीताचा आनंद घेता येतो. आणि हे मला समजते."

"हा मूर्खपणा आता थांबव. लुईसा, कृपा करून आपण आता चहा घेऊ या. मी झाडेझुडुपे कापून व ते जाळण्यासाठी शेकोटी पेटवून, दमलो आहे." तो एका खुर्चीत बसला. त्याच्या शेजारील सिगरेटच्या डबीतून एक सिगरेट काढली व खूप प्रसिद्ध लायटरने ती पेटवली.

लुईसा म्हणाली, "तू बाहेर असतांना, घरात फार काही उद्दीपित करणारे घडत होते --- असे काही जे पूर्णपणे --- अगदी स्मरणीय आहे, याबद्दल मला खात्री आहे."

पियानोशेजारी उभी राहून ती म्हणाली, “एडवर्ड, कृपया!” लुईसाचा गुलाबी चेहरा अधिक गुलाबी झाला होता. प्रत्येक गालावर रंग चढत होता. ती म्हणाली, तुला जाणून घ्यायचे असेल, तर मला काय वाटते, ते मी सांगते.”

“प्रिये, मी ऐकतो आहे.”

“मला वाटते, हे शक्य आहे, की या क्षणी आपण एका थोर संगीतकाराच्या सान्निध्यात आहोत --- “ ती थांबली --- जणू काही तिला स्वतःच्या विचारातील गफलत लक्षात येऊन, ती थांबली.

“काय झाले?’

माझा विचार मूर्खपणाचा असेल. एडवर्ड, पण मला प्रामाणिकपणे असे वाटते आहे.”

“कृपया हे सांग, की कोणाच्या सान्निध्यात?

“स्वतः फ्रान्झ लीस्झटच्या!”

तिच्या नवऱ्याने सिगरेटचा एक लांब झुरका मारला आणि छतावर धूर सोडला. त्याचे कडक कातडीचे, खूप वर्षे कवळी वापरणारे गाल, आत गेलेले होते. प्रत्येक वेळी सिगरेट ओढतांना ते अजून आत जात असत आणि गालफडे वर येत. तो म्हणाला, “मला काही समजले नाही.”

“एडवर्ड, माझे ऐक. या दुपारी मी माझ्या डोळ्यांनी ते बघितले आहे. तो खरेच लीस्झटच्या आत्म्याचा पुनर्जन्म असावा.”

“ह्या फालतू मांजराच्या रूपात?”

“प्रिया, असे बोलू नकोस.”

“लुईसा, तू ठीक आहेस ना?”

“मी चांगली ठीक आहे. आभारी आहे. मी जरा गोंधळले आहे आणि ते कबूल करायला मला काही वाटत नाही. पण आता जे झाले, ते घडल्यावर कोण गोंधळणार नाही ? एडवर्ड, मी तुला शपथेवर सांगते -”

“नेमके काय झाले, ते मी विचारू शकतो का?”

लुईसाने त्याला सांगितले आणि ती सांगत असतांना, तिचा नवरा खुर्चीत पाय पसरून, सिगरेट ओढत, होता. त्याच्या चेहऱ्यावर थोडे खात्री वाटत नसल्याचे हसू होते. तिचे सांगून झाल्यावर तो बोलला, “मला यात असामान्य असे काही वाटत नाही. ते मांजर फसवे आहे. त्याला युक्त्या करायला पढवले आहे.”

“एडवर्ड, असे म्हणू नकोस. प्रत्येक वेळी मी लीस्झ्ट वाजवले, की ते उद्दीपित होते आणि धावत येऊन स्टुलावर माझ्याशेजारी बसते. पण फक्त लीस्झ्ट वाजवले, तरच ते असे करते. त्याला लीस्झ्ट आणि शूमनमधला फरक कसा कळला? त्याला काही कोणी तो शिकवला नाही. तुलाही याचे उत्तर देता येणार नाही. पण त्याने प्रत्येक वेळी असे केले आहे. एडवर्ड, हे फार वेगळ्या प्रकारचे आहे.

तिचा नवरा म्हणाला, “त्याने फक्त दोनदाच असे केले.”

दोनदा केले, हे पुरेसे बोलके आहे.”

“आपण ते परत करून बघू.”

लुईसा म्हणाली, “नको, नक्कीच नको. कारण माझी खात्री आहे की हा त्याच्यात लीस्झटचा आत्मा किंवा असाच काही आहे. त्याची पुन्हापुन्हा परीक्षा घेणे योग्य नाही आणि सौजन्याचे पण नाही.”

“माझ्या प्रिय स्त्रिये, हे मांजर आहे --- हे करडे, मूर्ख मांजर आहे. खरे तर त्याने आज सकाळी त्याचे अंग बागेतील आगीमध्ये शेकून काढले आहे. आत्म्याच्या दुसऱ्या शरीरातील नवप्रवेशाबद्दल तुला काय माहिती आहे?”

लुईसा ठामपणे म्हणाली, ”आत्म्याचे आस्तित्व तू मान्य करतोस ना? तेवढे मला पुरेसे आहे.”

“अग, मग आपण बघूच. तू म्हणतेस ते खरे आहे का, ते बघू. तू परत वाजव.”

“नको, एडवर्ड. मी तुला सांगितले आहे. मला त्याला अजून काही विनोदी परीक्षा द्यायला लावायच्या नाहीत. मी तुला सांगते, एका दिवसासाठी ते त्याच्यासाठी पुरेसे झाले आहे.

मी अजून थोडे त्याचे संगीत त्याच्यासाठी वाजवेन.”

“एक छानशी धून ते सिद्ध करेल.”

“तू बघ. आणि एक गोष्ट नक्की आहे. त्याने ते ओळखल्याबरोबर, ते आता जिथे बसले आहे, तिथेच बसून राहील.”

लुईसाने लीस्झटचे पुस्तक आणले व भरभर त्याची पाने उलटत, एक छानशी धून निवडली --- बी मायनर सोनाटा --- ती त्याचा फक्त पहिला भाग वाजवणार होती. पण एकदा सुरु केल्यावर तिने पाहिले, की मांजर तिथे

आनंदाचे भरते येत कसे बसले आहे आणि तिच्या हातांकडे कसे लक्ष देऊन बघत आहे. त्यामुळे तिला ते संपवायचा धीर झाला नाही. ती ते वाजवत राहिली. जेव्हा ते संपले, तेव्हा तिने तिच्या नवऱ्याकडे कटाक्ष टाकला व ती हसली. "तू आता असे म्हणू शकणार नाहीस, की ते मांजर गाण्यावर खूप प्रेम करत नव्हते."

"त्याला तो गोंधळाचा आवाज आवडत होता, एवढेच."

मांजराला हातात उचलून घेत, ती म्हणाली, "ते त्या सुरांवर प्रेम करत होते. नाही का रे मांजरा? अरे देवा, जर त्याला बोलता येत असते, तर! प्रिया, असा विचार कर. ते त्याच्या तरुणपणी बिथोव्हीनला भेटले असणार. त्याला शूबर्ट व मेंडेलसोन, शूमन व बेर्लीओझ, ग्रीग व डोलाक्रॉ, इनग्रेस व हेईन आणि बाल्झॅक माहिती असणार. आणि तो नक्कीच वॅगनरचा सासरा असणार. मी वॅगनरच्या सासऱ्याला माझ्या हातात धरले आहे."

ताठ बसत, तिचा नवरा कडकपणे बोलला, "लुईसा, नीट भानावर ये."

त्याच्या आवाजाला आता नवीन धार चढली. तो अजून जोराने बोलला.

लुईसाने झटपट वर पाहिले, "एडवर्ड, मला वाटते, तुला हेवा वाटतो आहे."

"त्या अस्वस्थ मांजराचा?"

"मग इतका चिडू नकोस आणि फक्त स्वतःपुरते पाहू नकोस. जर तू असा वागणार असशील, तर आम्हाला दोघांना शांततेत सोडून, तू परत बागेत तुझ्या कामाला गेलेले बरे राहील. हे सर्वात चांगले राहील, नाही का, प्रिय?" ती त्या

मांजराच्या डोक्यावरून हात फिरवत त्याला उद्देशून बोलली. "आणि संध्याकाळी उशीरा आपण, तू आणि मी, परत संगीताकडे वळू. हो." त्याच्या मानेचे अनेक वेळा चुंबन घेत ती म्हणाली. "आपण कदाचित थोडे चॉपिनही वाजवू. तू काही सांगायची गरज नाही. तुला चॉपिन आवडतो, हे मला माहिती आहे. तुझी त्याच्याबरोबर चांगली मैत्री होती, नाही का? खरे तर मला नीट आठवत असेल, तर चॉपिन --- त्याच्या सदनिकेत, तुला तुझ्या आयुष्याचे खरे प्रेम मिळाले.  त्या कोण बाईसाहेब --- तिच्यापासून तुला नियमबाह्य पद्धतीने, तीन पिल्लेही झाली, नाही का? झाली, अरे लबाडा, हे नाकबूल करण्याचा प्रयत्न करू नकोस. तर तुला चॉपिन ऐकायला मिळेल. त्यामुळे तुझ्या सगळ्या गोड आठवणी जाग्या होतील."

"लुईसा, हे ताबडतोब बंद कर."

"एडवर्ड, मनाचा इतका कोतेपणा दाखवू नकोस."

"अग बाई, तू फारच मूर्खासारखी वागते आहेस."

आणि तसेही तू विसरून जा, की आपण आज संध्याकाळी बिल व बेटीकडे कनास्टा [ रमीसारखा एक पत्त्यांचा खेळ ] खेळण्यासाठी जात आहोत."

"मी आता बाहेर जाणे शक्य नाही. त्याचा काही प्रश्नच नाही."

एडवर्ड हळूहळू खुर्चीतून उठला. आणि जोराने त्याची सिगरेट ॲशट्रेमध्ये दाबून विझवली. तो शांतपणे बोलला, "मला एक सांग, तू हे असे खरेच वागते आहेस? ही फालतू बडबड मनापासून केलेली आहे का?"

“अर्थातच, हो. आता त्याबद्दल काहीच प्रश्न नाही आहे. आणि अजून काय तर आपल्या दोघांवर आता खूप जबाबदारी पडलेली आहे, एडवर्ड”

तो म्हणाला, “मला काय वाटते सांगू का, मला वाटते, तुला डॉक्टरकडे जायला पाहिजे आणि तेही अगदी लवकर.”

एवढे बोलून, तो फ्रेंच खिडकीतून, खोलीबाहेर पडला व बागेत गेला. लुईसाने त्याला हिरवळ ओलांडून झाडाझुडुपांकडे व आगीकडे जातांना पाहिले. तो दिसेनासा होईपर्यंत, ती बघत राहिली. मग वळली व मांजराला घेऊन, पुढील दाराकडे धावली. थोड्याच वेळात ती गाडी चालवत, गावात निघाली होती. तिने वाचनालयासमोर गाडी लावली. त्यात मांजराला कुलुपबंद केले आणि घाईने इमारतीच्या पायऱ्या चढून, संदर्भखोलीत गेली. तिथे ती दोन विषयाच्या पुस्तकांची कार्डे शोधू लागली. रिइनकार्नेशन [आत्म्याचा दुसऱ्या शरीरात प्रवेश.] आणि लीस्झ्ट. रिइनकार्नेशनच्या खाली तिला एफ मिल्टन विलीस याचे, १९२१ मध्ये प्रकाशित झालेले, पृथ्वीवरचे आयुष्य --- पुन्हा कसे व का जन्म घेते --- हे पुस्तक सापडले. तर लीस्झ्टखाली, तिला जीवशास्त्रीय विषयाचे दोन खंड सापडले. तिने ती तिन्ही पुस्तके घेतली व गाडी चालवत घरी परतली.

घरी येऊन, तिने मांजराला सोफ्यावर ठेवले. स्वतः पुस्तके शेजारी घेऊन बसली. ती गंभीरपणे वाचू लागली. प्रथम तिने एफ मिल्टन विलीस याचे पुस्तक वाचायचे ठरवले. तो खंड लहान होता आणि थोडा डागाळलेला होता. पण चांगला जड होता. आणि लेखकाचे नाव अधिकाराने घेतले जात असे.

रिइनकार्नेशनची तत्वे असे सांगत होती, की आत्मिक शक्ती अधिकाधिक उन्नत प्राण्यांकडे जात रहाते. उदाहरणार्थ, जसा मोठा माणूस परत लहान होऊ शकत नाही, तसेच, माणूस एक खालच्या योनीतील प्राणी म्हणून जन्म घेत नाही. तिने हे परत वाचले. पण त्याला हे कसे कळले? त्याची खात्री कशी झाली? असे तो म्हणू शकणार नाही. कोणीच असे विधान करू शकणार नाही. पण तरीही त्या वाक्याने तिचा विश्वास ती गमावू लागली. आपल्या प्रत्येकाच्या सजगतेच्या केंद्रबिंदूशी, बाहेरच्या भक्कम शरीराशी संबंधित नसलेल्या व नेहमीच्या डोळयांना न दिसणाऱ्या अजून चार गोष्टी असतात. पण ज्यांची ग्रहणशक्ती जास्त प्रमाणात वृद्धींगत झाली आहे, अशा लोकांना त्या दिसू शकतात. ती वाचत राहिली आणि लवकरच एका रुचीपूर्ण परीच्छेदाशी आली. त्यात असे लिहिले होते, की आत्मा मरणानंतर दुसऱ्या शरीरात शिरण्यापूर्वी पृथ्वीपासून कितीही लांब राहू शकतो. तो वेळ प्रत्येकाच्या बाबतीत वेगवेगळा असू शकेल. विलीसने खालीलप्रमाणे, त्याचे विश्लेषण केले आहे.

दारुडे व ४०/५० वर्षांचे अकुशल, बेकार कामगार ६०/१०० वर्षे

मध्यमवर्गीय कुशल कामगार १००/ २०० वर्षे

उच्च मध्यमवर्गीय ५०० वर्षे

सभ्य शेतकरी ६००/१००० वर्षे

कर्मकांडाने धर्मांतर केलेले १५००/२००० वर्षे

लीस्इट मेल्याला किती वर्षे झाली, हे बघण्यासाठी तिने झटपट दुसऱ्या पुस्तकाचा संदर्भ शोधला. त्यात असे सापडले की तो बैरुतमध्ये १८८६ साली

मेला. म्हणजे सदुसष्ट वर्षांपूर्वी. त्यामुळे विलीसच्या म्हणण्यानुसार, अकुशल कामगार लगेच आले असतील. पण ते बरोबर वाटत नाही. शिवाय तिने लेखकाच्या विश्लेषणाच्या पद्धतीविषयी फार विचार केला नाही. त्याच्या मतानुसार, उच्च मध्यमवर्गीय सभ्य शेतकरी हे पृथ्वीवर सर्वात जास्त उच्च प्रतीचे असणार. लाल जाकिटे, ढवळलेले कप, कोल्ह्यांच्या खुनशी खुनाने रक्ताळलेले --- नाही – तिने विचार केला, हे बरोबर नाही. विलीसबद्दल संशय घेण्याने, तिला आनंद झाला. नंतर ती त्या पुस्तकातील अजून काही प्रसिद्ध रेनकार्नेशनकडे आली. तिला सांगितले गेले, की इपिक्टेटस राल्फ वाल्डो इमर्सन म्हणून, सिसेरो ग्लॅडस्टोन म्हणून, आल्फ्रेड द ग्रेट राणी व्हिक्टोरिया म्हणून व जेता विलियम, लॉर्ड कीटचेनर म्हणून पृथ्वीवर परतला. भारतीय राजा अशोक वर्धमान, २७२ BC कर्नल हेन्री म्हणून, स्टील ऑलकॉट प्रसिद्ध अमेरिकन वकील म्हणून, पायथागोरस मेमे थीऑसॉफीकल सोसायटीची स्थापना करणारा मास्टर कूट हूमी म्हणून पृथ्वीवर परतला.

रूझवेल्टने खूप अवतार घेतले तो माणसांचा नेता होता. त्याच्यापासून --- चाल्डिआ घराणे सुरु झाले, साधारण ३०००० BC, याला इगोने [आपल्याला तेव्हाच्या पर्शियाचा राजा असलेला सीझर म्हणून माहिती असलेला] गव्हर्नर नेमले --- रूझवेल्ट आणि सीझर हे हजारो वर्षांपूर्वी सैन्यप्रमुख व प्रशासकीय नेता होते. हजारो वर्षांपूर्वी, ते नवरा बायको होते.

मिलर हा स्पष्टपणे तर्क करणारा होता, एवढे लुईसासाठी पुरेसे होते.

तत्वे खरी असल्यासारखी खात्रीपूर्वक मांडण्याच्या त्याच्या पद्धतीने ती प्रभावित झाली नाही. तो बहुधा योग्य मार्गावर होता. पण त्याने जाहीरपणे मांडलेली, विशेषतः प्राण्यांच्या बाबतीत मांडलेली तत्वे ,अतिरेकी स्वरूपाची होती. लवकरच तिला आशा वाटू लागली, की ती थीऑसॉफीकल सोसायटीची तत्वे गोंधळाची आहेत आणि माणूस मृत्युनंतर त्याच्यापेक्षा खालच्या जातीत जन्म घेऊ शकतो. आणि शंभर वर्षात पुन्हा जन्म घेण्यासाठी, तो अकुशल कामगार असायलाच हवा, असे नाही.

आता ती लीस्इटच्या जीवशास्त्रीय विषयाकडे वळली. ती ते चाळत असतांना तिचा नवरा बागेतून आत आला. त्याने विचारले, “आता तू काय करते आहेस?”

“ओहो, असेच इकडचे तिकडचे काही वाचते आहे. प्रिया, ऐक. तुला माहिती आहे का, की थिओडोर रूझवेल्ट एकदा सीझरची बायको होता?”

तो म्हणाला, “लुईसा, हे बघ, तू हा मूर्खपणा थांबवत का नाहीस? मला तुला असे स्वतःला मूर्ख बनवणे आवडत नाही आहे. मला ते मांजर दे व मी ते स्वतः पोलीस स्टेशनमध्ये देऊन येतो.”

लुईसाने बहुधा त्याचे बोलणे ऐकले नाही. ती ओरडली, “अरे देवा, एडवर्ड, हे बघ.”

“काय?”

“त्याच्या चेहऱ्यावरचे गळू बघ. मी ते सर्व विसरले होते. त्याच्या चेहऱ्यावरील ही गळवे प्रसिद्ध आहेत. त्याचे शिष्यसुद्धा केसांवर अशी त्याच्यासारखी गळवे उगवू द्यायचे.”

“त्याचा काय संबंध?”

“काही नाही. म्हणजे विद्यार्थ्यांचा नाही. पण गळवांचा आहे.”

तो म्हणाला, “अरे देवा, सर्वशक्तिमान देवा, वाचव रे बाबा.”

“मांजराला पण ती झाली आहेत. मी तुला दाखवते.”

तिने मांजराला मांडीवर घेतले आणि त्याचा चेहरा तपासू लागली.

“सापडले. इथे एक आहे. आणि तिथे दुसरे आहे. एक मिनिट थांब.

माझा विश्वास आहे ती त्याच जागी आहेत. चित्र कुठे गेले?”

ते एका संगीतकाराचे, त्याच्या म्हातारपणातील छान, शक्तिमान चेहरा दाखवणारे प्रसिद्ध चित्र होते. त्यात त्याचे कान करड्या केसांनी झाकले गेले होते व ते त्याच्या मानेपर्यंत रुळत होते. त्या चेहऱ्यावर पाच ठळकपणे दाखवलेली गळवे होती.

ती बोलली, “आता असे बघ, त्यातील एक उजव्या भुवईच्या वर आहे. तिने मांजराच्या उजव्या भुवईच्या वर बघितले. “हो. ते बरोबर त्याच ठिकाणी आहे. आणि दुसरे डाव्या भुवईच्या वर त्याच जागी आहे. तसेच चित्रातही आहे. तिसरे चित्रातल्याप्रमाणे नाकाच्या शेंड्यावर आहे. एडवर्ड ये आणि बघ. ती अगदी बरोबर त्याच जागी आहेत.”

“त्यामुळे काही सिद्ध होत नाही.”

खाकी पँट आणि हिरव्या स्वेटरमध्ये घाम गाळत, खोलीच्या मध्यभागी उभ्या असलेल्या तिच्या नवऱ्याकडे तिने पाहिले. “एडवर्ड, तू घाबरलेला दिसतोस, हो ना? तुझा बहुमूल्य आब घालवून बसायची आणि लोक तुला एकदा तरी मूर्ख म्हणण्याची भीती, तुला वाटते आहे.”

“मी त्याबद्दल आक्रमक व्हायचे टाळतो आहे, एवढेच.”

लुईसा परत पुस्तकवाचनाकडे वळली. ती म्हणाली, “हे रुचीपूर्ण आहे. इथे असे म्हटले आहे, की लीस्झ्टला चॉपिनचे बी फ्लॅट मायनरमधील स्चेरझो हे एक सोडून, सर्व काम आवडत होते --- खरे तर त्या कामाचा त्याला तिरस्कार वाटत होता. तो त्याला ‘गव्हर्नेस स्चेरझो’ म्हणे. आणि ते फक्त त्या व्यवसायातील लोकांसाठीच राखून ठेवले जावे, असे तो म्हणे.”

“त्याचे काय?”

“एडवर्ड, ऐकून घे. तू हट्टाने हे काही कबूल करत नाहीस. मी आता काय करणार आहे, ते तुला सांगते. मी आता हे स्चेरझो वाजवणार आहे. तू इथे थांबून, काय होते ते बघ. मग तू आपल्याला जेवण मिळण्यास पात्र ठरशील.”

लुईसा उठली आणि चॉपिनच्या कामाचे दोन खंड काढले. “हे बघ. हे खरे तर आश्चर्यकारक आहे. आता ऐक --- किंवा खरे तर मांजर काय करते, त्याचे निरीक्षण कर.”

तिने पियानोवर ते पुस्तक ठेवले आणि बसली. तिचा नवरा उभाच राहिला. त्याचे हात खिशात होते आणि तोंडात सिगरेट होती. त्याच्या मनात

नसूनही, तो सोफ्यावर डुलकी काढणाऱ्या मांजराकडे बघत होता. जेव्हा लुईसाने वाजवायला सुरवात केली, तेव्हा पहिला परिणाम नेहमीप्रमाणे नाटकी होता. मांजराने काही दंश झाल्याप्रमाणे उडी मारली व मिनिटभर न हलता उभे राहिले. कान उंचावलेले, सर्व शरीर थरथरणारे होते. मग ते अस्वस्थ झाले व सोफ्यासमोर मागे पुढे चालू लागले. शेवटी त्याने जमिनीवर उडी मारली आणि नाक व शेपटी हवेत उंच करून, ते हळू, जादू झाल्यासारखे, खोलीतून निघून गेले.

लुईसा उडी मारून त्याच्या मागोमाग धावत ओरडली, “हे बघ. ते कसे करते आहे. त्यामुळे मी म्हणते, ते सिद्ध होते आहे.” ती मांजराला घेऊन परत आली व त्याला सोफ्यावर ठेवले. तिचा सर्व चेहरा उद्दीपित होऊन, चकाकत होता. मुठी वळून पांढऱ्या पडल्या होत्या. तिच्या डोक्यावरचा अंबाडा सुटून केस एका बाजूला गेले होते. “एडवर्ड, तू काय पाहिलेस? तुला काय वाटते?” ती हे बोलतांना खिन्न होऊन हसत होती.

“हे फार मनोरंजन करणारे होते, असे म्हणावे लागेल.”

“एडवर्ड, मनोरंजन करणारे? ही सर्वात नवलपूर्ण गोष्ट घडली आहे. अरे बापरे!” मांजराला उचलून छातीशी धरत ती म्हणाली. “आपल्याला फ्रांझ लीस्झ्ट घरात रहात असल्याचा अनुभव आला, हे अभूतपूर्व नाही का?”

“लुईसा, विचित्र वागू नकोस.”

“माझा काही इलाज नाही. खरेच याहून दुसरी कुठलीही प्रतिक्रिया देणे, मला शक्य नाही. मला वाटते तो नेहमी आपल्याबरोबर रहातो आहे.”

“काय म्हणालीस?”

“ओहो, एडवर्ड. मी खरेच हवेतून चालते आहे. आता मी काय करणार आहे, ते तुला माहिती आहे का? जगातील प्रत्येक संगीतकाराला मी त्याला भेटवणार आहे. त्याला माहिती असलेल्या लोकांबद्दल त्याला विचारणार आहे. बिथोविनबद्दल, चॉपिनबद्दल आणि शूमनबद्दल.”

तिचा नवरा म्हणाला, “पण त्याला बोलता येत नाही.”

“ठीक आहे. पण त्या सगळ्यांना त्याला काही झाले तरी भेटायचे आहे. त्याना स्पर्श करून बघायचे आहे. स्वतःचे संगीत त्याला ऐकवायचे आहे. आधुनिक संगीत त्याने पूर्वी कधी ऐकले नसेल.”

“तो काही इतका थोर नाही. आता जर बाक किंवा बिथोविन असेल, तर गोष्ट वेगळी आहे.”

“एडवर्ड, कृपया मध्ये काही बोलू नकोस. तेव्हा आता मी जगातील सगळ्या महत्वाच्या संगीतकारांच्या रचना वाजवणार आहे. ते मला केलेच पाहिजे. मी त्यांना सांगेन,  की इथे लीस्झ्ट आला आहे. आणि त्याला तू भेट. तुला माहिती आहे का, की ते जगाच्या कोपऱ्यातून धावत येतील.”

“करड्या मांजराला भेटायला?”

“प्रिया, ते तसेच आहे. तो तो आहे. तो कसा दिसतो ही गोष्ट अलाहिदा. ओहो, एडवर्ड, ही फारच विलक्षण गोष्ट असेल.”

“त्याना वाटेल, तू वेडी आहेस.”

“तू थांब आणि बघ.” ती मांजराला हातात धरून नाजूकपणे कुरवाळत होती. पण नवऱ्याकडे बघत होती. तो आता फ्रेंच खिडकीशी, बागेकडे बघत उभा होता. संध्याकाळ होत होती. बाग हळूहळू हिरव्या रंगाकडून काळ्या रंगाकडे झुकत होती. लांबवर त्याला आगीचा पांढरा धूर दिसत होता. तो न वळता, म्हणाला, “नाही. मला हे पटत नाही. या घरात असले काही नको. यामुळे आम्ही दोघेही मूर्ख ठरू.”

“एडवर्ड, तुला काय म्हणायचे आहे?”

“मी जे म्हणालो, तेच. अशा वेड्यासारख्या गोष्टीसाठी, मी तुला मुळीच प्रसिद्ध होऊ देणार नाही. तुला लबाड मांजर सापडले आहे. ठीक आहे, तुला ते आवडत असेल, तर ठेव. माझे काही म्हणणे नाही. पण पुढे जाऊन, तू काहीबाही करू नकोस. लुईसा, तुला समजले का?”

पुढे जाऊन म्हणजे?”

“मला तुझे हे असले वेड्यासारखे बोलणे, ऐकून घ्यायचे नाही. तू फारच वेड्यासारखे वागते आहेस.”

लुईसाने मांजराला हळू खाली सोफ्यावर ठेवले. ती उठली आणि तिने एक पाऊल पुढे टाकले. ती तिचा पाय आपटत ओरडली, “एडवर्ड, तुझा धिक्कार असो. आपल्या आयुष्यात प्रथमच काही वेगळे असे घडते आहे आणि तू मरणांतिक घाबरला आहेस. कारण काय तर तुला कुणी हसेल म्हणून! हे खरे आहे ना? तू हे नाकारू शकत नाहीस. शकतोस का?”

तिचा नवरा बोलला, "लुईसा, हे पुरे झाले. तू स्वतःला सावर. आणि हे ताबडतोब बंद कर." तो चालत गेला व टेबलावरील पाकिटातून, एक सिगरेट घेतली. ती लायटरने पेटवली. त्याची बायको त्याच्याकडे बघत उभी होती. तिच्या डोळ्यातून आता पाणी येऊ लागले. तिच्या गालावरील पावडरवरून पाण्याच्या नद्या वाहू लागल्या.

तो म्हणत होता, "लुईसा, अलीकडे तुझे हे चाळे फारच झाले, बर का. नाही. नाही. मध्ये बोलू नकोस. माझे ऐकून घे. तुझ्या आयुष्यातील हा विचित्र काळ असेल, असे समजून, मी तुला आणि तुझ्या 'अरे देवा' आणि 'अरे मूर्खा' 'ला फार मोकळीक दिली. तू दिखाऊ मूर्ख! तुला हे काही वेगळे होत असल्याचे कळत नाही का? हे --- हे --- काही चमत्कृतीपूर्ण आहे. हे तुला दिसत नाही का?"

त्या क्षणी तो खोलीत आला व तिच्या खांद्याला धरले. त्याच्या ओठात नुकतीच पेटवलेली सिगरेट होती. खूप घाम आल्याने त्याच्या कातडीवर पडलेले डाग तिला दिसले.

तो म्हणाला, "ऐक. मला भूक लागली आहे. मला जेवण हवे आहे. त्यामुळे तू स्वयंपाकघरात जा आणि दोघांसाठी काही चांगले जेवण आण."

लुईसा मागे झाली व दोन्ही हात तोंडावर ठेवले. ती ओरडली, "अरे देवा, मी त्याबद्दल सर्व काही विसरूनच गेले. त्यालाही भूक लागली असेल. ते मांजर आल्यापासून त्याला मी दुधाशिवाय खायला काही दिलेले नाही."

"कोण?

“अर्थात, ते मांजर. मला लगेच जाऊन काही विशेष बनवले पाहिजे. त्याचे आवडते खाद्य काय आहे, हे मला माहिती पाहिजे होते. एडवर्ड, त्याला सर्वात जास्त काय आवडेल?”

“ते मांजर गेले खड्ड्यात!”

खाली वाकून मांजराला बोटाने हळूवार स्पर्श करत, ती बोलली, “एडवर्ड, कृपा कर. मी माझ्या पद्धतीने काय ते करते. फक्त तू इथे थांब.”

“मी फार थांबू शकत नाही.”

लुईसा स्वयंपाकघरात गेली. ती काय विशेष बनवू शकते, असा विचार करत, क्षणभर उभी राहिली. अंड्याचे आम्लेट? की मस्त चीज? आम्लेटच करावे. ते विशेष राहील. अर्थात एडवर्डला ते फारसे आवडत नाही. पण मी दुसरे काय करणार? ती खूप चांगला स्वयंपाक बनवणारी नव्हती. तिचे आम्लेटसुद्धा प्रत्येक वेळी चांगले होत असेच, असे नाही. पण यावेळेस, विशेष काळजी घेऊन, ओव्हन ठराविक तापमानापर्यंत गरम  करून, तिने त्यात ते भाजले. त्याबरोबर काय खाता येईल, असे शोधतांना, तिला असे आठवले की लीस्झ्टने त्याच्या आयुष्यात कधी अ‍ॅव्होकॅडोची, पेअरची किंवा ग्रेपफ्रुटची चव पाहिली नव्हती. त्यामुळे तिने त्याची कोशिंबीर बनवायचे ठरवले. त्याचा प्रतिसाद बघणे, खरेच मोठे मजेशीर ठरले असते. जेव्हा सर्व तयार झाले, तेव्हा तिने ते एका ट्रेमध्ये घातले आणि हॉलमध्ये आणले. ती तिथे शिरतांना, तिने तिच्या नवऱ्याला बागेतून, फ्रेंच खिडकीतून आत येतांना पाहिले. तो ट्रे टेबलावर ठेऊन सोफ्याकडे वळतांना ती म्हणाली, “हे त्याच्यासाठी आहे. ते मांजर कुठे गेले?

तिच्या नवऱ्याने त्याच्या मागे बागेचे दार बंद केले आणि तो सिगरेट आणण्यासाठी खोलीमध्ये चालत गेला.

“एडवर्ड, ते मांजर कुठे गेले?”

‘कोण?

“तुला माहिती आहे कोण ते.”

तो पुढे वाकून बोलला, “हो. हो. ते भिकार मांजर का? हं. थांब, मी तुला सांगतो.”

सिगरेट पेटवण्यासाठी, त्याचे हात लायटरकडे गेले. त्याने वर पाहिले, तर लुईसाला त्याने त्याच्याकडे बघतांना पाहिले. ती त्याच्या खाकी पँटकडे आणि बुटांकडे बघत होती. लांब गवतातून चालून त्याचे दोन्ही ओले झाले होते.

तो म्हणाला, “मी बाहेर जाऊन आग कशी पेटली आहे, हे बघून आलो.”

तिचे डोळे हळूहळू वर फिरत, त्याच्या हातांवर स्थिर झाले.

त्याने चालू ठेवले, “आग अजून चांगली जळते आहे. मला वाटते, ती रात्रभर जळेल.”

पण ती ज्या तऱ्हेने त्याला न्याहाळत होती, त्यामुळे तो अस्वस्थ झाला.

तो बोलला, “हे तुझे काय चालले आहे? त्याने खाली पाहिल्यावर, त्याला पहील्यांदाच जाणवले की त्याच्या एका हाताच्या मागील बाजूला, नखापासून ते मनगटापर्यंत लांब स्पष्ट ओरखडा उमटला आहे.

“एडवर्ड”

“ओहो, कृपा करून शांत रहा. बागेतील ती काटेरी झुडुपे भयानक आहेत. त्यामुळे तो ओरखडा उमटला असेल. खाली बस. लुईसा, एक मिनिट थांब. लुईसा, खाली बस. काय झाले?”

“एडवर्ड!”

“ओहो, अग बाई, कृपया खाली बस. इतके बेचैन व्हायचे काही कारण नाही.  लुईसा, लुईसा, शांत हो.”

# William and Mary
# विलियम आणि मेरी



विलियम पर्ल मेला तेव्हा त्याने फारसे पैसे मागे ठेवले नव्हते. आणि त्याचे इच्छापत्र साधे होते. नातेवाईकांना लहान पुष्पगुच्छ सोडले, तर त्याने सगळी मालमत्ता व पैसाअडका बायकोच्या नावे केला होता. वकील आणि मिसेस पर्ल यांनी ते वकिलाच्या कार्यालयात वाचले. आणि जेव्हा काम झाले, तेव्हा ती विधवा जाण्यासाठी उठली. त्या वेळी वकिलाने त्याच्या टेबलावरील एक बंद

पाकिट तिला दिले. “तुमचा नवरा वारण्यापूर्वी काही दिवस त्याने ते मला पाठवले व त्याच्या मृत्यूनंतर ते तुम्हाला देण्यास सांगितले. वकील अशक्त व नाराज दिसत होता. त्या विधवेला मान देण्यासाठी, डोके एका बाजूला कललेले ठेवले होते व तो खाली बघत होता. असे दिसते आहे, की हे काही खासगी असावे. तुम्ही ते घरी घेऊन जा व खासगीपणे वाचा.”

मिसेस पर्लने ते घेतले व घराबाहेर थांबून ते चाचपून पाहिले. ते विलियमचे निरोपाचे पत्र होते. हो. ते चालीरीतीला धरून लिहिलेले कडक पत्र असणार. त्या माणसाने दुसरे काही व्यक्त करणे अशक्य होते. त्याने आयुष्यात कधी काही चाकोरी सोडून केले नव्हते.

माझ्या प्रिय मेरी, माझा विश्वास आहे, की तू मला हे जग सोडून देणार नाहीस. कारण तुला फार वाईट वाटेल. पण आपण दोघे असतांना तू ज्या नीतीनियमांना धरून वागत होतीस, तशीच पुढेही वागशील, सगळ्या बाबतीत प्रतिष्ठेने व काळजीने रहाशील, असे मी समजतो. पैशांची उधळपट्टी करू नकोस. इत्यादी इत्यादी ठरीव साच्याचे ते विलियमचे पत्र होते.

शेवटी तो मोडून पडला असेल आणि तिला काही सुंदर लिहिले असेल, तर! कदाचित तो प्रेमपत्रासारखा मृदु, कोवळा, सुंदर निरोप असता तर! तिने तिच्या आयुष्यातील तीस प्रेमळ व उबदार वर्षे दिल्याबद्दल, लाखो शर्टींना इस्त्री केल्याबद्दल आणि लाखो जेवणे बनवल्याबद्दल आभार मानणारे असते तर! त्यात न दिसणारे काही ती पुन्हा पुन्हा वाचत राहिली. एखादा दिवस तरी तिने ते तिच्या कपड्यांच्या कपाटात नक्षीदार पिनेजवळील पेटीत ठेवले असते. लोक

मरणपंथाला लागतात, तेव्हा ते काय करतात, कुणास ठाऊक, असा विचार करत मिसेस पर्लने ते पत्र काखेखाली ठेवले व घरात शिरली. कोट व टोपी न काढताच ती सोफ्यावर जाऊन बसली. मग पाकीट उघडले. त्यात दुमडलेले पंधरा सोळा आखीव कागद होते. त्यांना डावीकडील वरच्या कोपऱ्यात पिन लावलेली होती. प्रत्येक कागदावर पुढील बाजूला तिरपे असलेल्या, तिच्या परिचयाच्या अक्षरात काही लिहिलेले होते. पण तिने जेव्हा पाहिले की व्यायसायिक भाषेत बरेच काही लिहिले आहे पण पहिल्या पानाची सुरवात जशी असायला पाहिजे तशी नसल्याचे पाहिले, तेव्हा तिला संशय येऊ लागला. तिने लांबवर पाहिले. एक सिगरेट पेटवली. एक झुरका ओढून ती ॲश ट्रेमध्ये टाकून दिली. जर मला संशय येतो आहे, तसेच ते असेल तर कशाला वाचायचे, असे स्वतःशीच बोलून तिने ते वाचले नाही.

मृत व्यक्तीचे पत्र वाचायचे एखादा नाकारू शकतो का?

हो.

ठीक आहे ---

शेकोटीच्या विरुद्ध बाजूला असलेली विलियमची रिकामी खुर्ची तिने पाहिली. ती मोठी, तपकिरी, चामड्याची हातवाली खुर्ची होती. अनेक वर्षे त्यात तो बसल्यामुळे, त्याचा मधील भाग खोल आत गेलेला होता. खुर्चीच्या पाठीवर उंच ठिकाणी, जिथे त्याचे डोके टेके, तिथे लंबवर्तुळाकार काळा डाग पडला होता. तो त्या खुर्चीत वाचत बसत असे. त्याच्या समोरील खुर्चीत बसून ती बटणे लावत असे, मोजे दुरुस्त करत असे किंवा त्याच्या कोपरावर

फाटलेल्या जाकीटाला ठिगळ लावत असे. थोड्या थोड्या वेळाने त्याचे डोळे वाचनातून बाहेर पडून, तिच्यावर स्थिर होत असत. पण ते विचित्रपणे काही हरवल्यासारखे, आकडेमोड करत असत. तिला ते डोळे कधीच आवडत नसत. ते लहानसे, बर्फासारखे, निळे व एकमेकांजवळ होते. त्या दोन्हीमध्ये नापसंती दर्शवणाऱ्या दोन उभ्या रेषा होत्या. तिच्या पूर्ण आयुष्यभर ते डोळे तिला बघत होते. आता आठवडाभर ती एकटीच घरी असतांना सुद्धा ते रात्री दारातून, रिकाम्या खुर्चीतून व खिडकीतून तिला जणू निरखून बघत होते. ती हळूहळू तिच्या पर्सजवळ गेली व चष्मा बाहेर काढून, डोळ्यांना लावला. मग मागील खिडकीतून येणारा प्रकाश त्यावर पडेल, अशा रीतीने ते तिच्यासमोर उंच धरून, तिने ते वाचायला सुरवात केली.

माझ्या प्रिय मेरी, हे पत्र केवळ तुझ्यासाठी आहे. मी गेल्यावर तुला ते मिळेल. हे अक्षर बघून दचकू नकोस. लँडे माझे काय करणार आहे, हे सांगण्याचा, माझ्याकडून स्पष्टीकरणाचा प्रयत्न आहे. आणि त्याने हे करावे, हे मी का कबूल केले आहे, त्याच्या थिअरीज काय आहेत व त्याच्या आशा काय आहेत, हे मी तुला सांगू इच्छितो. तू माझी बायको असल्याने तुला हे सर्व जाणून घेण्याचा अधिकार आहे. गेल्या काही दिवसात, मी तुझ्याशी लँडेबद्दल बोलायचा कसून प्रयत्न केला. पण तू माझे काही ऐकून घ्यायला नकार दिलास. हे मी तुला आधीच सांगितले आहे, की हा मूर्खासारखा दृष्टीकोन आहे. आणि मला तो पूर्णपणे निःस्वार्थी देखील वाटत नाही. तो जास्त करून अज्ञानातून उगवतो. माझी खात्री झाली आहे, की जर तू सगळ्या गोष्टी जाणून घेतल्या असत्यास, तर तू तुझा दृष्टीकोन लगेच बदलला असतास. म्हणून मी आता

नसतांना व तुझे चित्त स्थिर असताना अशी आशा करतो, की तू या पानांमधून माझे म्हणणे काळजीपूर्वक ऐकून घेशील. मी तुला खात्री देतो, की जेव्हा तू माझी गोष्ट वाचशील, तेव्हा तुझा खोलवरचा राग निघून जाईल आणि तुला उत्साही वाटेल. मी असे समजतो, की तुला मी जे केले, त्याबद्दल अभिमान वाटेल. तू जसजशी वाचत जाशील, तसतसे तू मला माफ करायला हवेस. माझ्या थंड आविर्भावाने, पण माझे म्हणणे स्पष्टपणे तुझ्यापर्यंत पोचवायचा एवढा एकच मार्ग मला माहिती आहे, तर माझी वेळ जवळ आली आहे. हे नैसर्गिक आहे, की या जगातील प्रत्येक भावनिकतेच्या कडांवर मी उभा आहे. दिवसेंदिवस मी मनापासून पश्चात्ताप करतो आहे. विशेषतः संध्याकाळी. मी स्वतःचे जवळून निरीक्षण केल्याशिवाय, माझ्या भावना या पानांमधून ओसंडून वाहणार नाहीत. उदाहरणार्थ माझी इच्छा आहे, की तुझ्यासंबंधी काही लिहावे आणि तू एवढी वर्षे कशी माझी समाधानी बायको होतीस आणि मी मला वचन देतो आहे, की मला अजून वेळ मिळाला व शक्ती असली, तर मी पुढेही ते करेन. या माझ्या ऑक्सफर्डमध्ये मी गेली सतरा वर्षे काम करतांना या जागेच्या कीर्तीसंबंधी, शक्य असेल तर, काही स्पष्ट करत रहातो आहे व शिकवतो आहे. मी प्रेम करत असलेल्या सगळ्या गोष्टी व जागा आता या झोपायच्या खोलीत, माझ्याभोवती गर्दी करतात. त्या तेजस्वी आणि सुंदर आहेत. त्या नेहमीच तशा होत्या आणि आज, काही कारणाने, मला त्या नेहमीपेक्षा जास्त स्पष्ट दिसत आहेत. जिथे लोव्हेलास चालायचा, त्या वोर्सेस्टर कॉलेजच्या तळ्याभोवतालचा रस्ता, पेम्ब्रोकचे दार, मॅग्डॅलेन शहराच्या पश्चिमेकडील भागाचे दृष्य, ख्रिस्ताच्या चर्चच्या आजूबाजूला पडणाऱ्या गारा, जिथे मी

बेलीच्या आणि लहानशा, सुंदर वाल्डस्टेइनिनाच्या फुलाच्या डझनापेक्षा जास्त दुर्मिळ प्रजाती, येथील पसरलेल्या दगडांमधून शोधून काढल्या, ती सेंट जॉन चर्चची मोठी टेकडी. तू बघते आहेस, मी अजून सुरवातही केली नाही आणि मी या परिसराच्या कैदेत सापडतो आहे. तर आता मला सुरवात करू दे. प्रिया, आता दुःखाच्या व नापसंतीच्या भावनेशिवाय, सावकाश वाच. नाहीतर तुला समजायला अडथळा येईल. तू हे सावकाश वाचशील, असे वचन मला दे. तू सुरवात करण्यापूर्वी, मन शांत व धीर धरलेले ठेवशील. माझ्या आयुष्यात मध्येच अचानक उद्भवलेले आजारपण तुला माहिती आहे. त्यात मी वेळ घालवत नाही --- फक्त लगेच कबूल करतो, की आधी डॉक्टरकडे न जाणारा मी किती मूर्ख होतो. कॅन्सर अशा थोड्या  रोगांपैकी आहे, की आधुनिक औषधानेदेखील तो बरा होत नाही. जर तो फार पसरला नसेल, तर शल्यविशारद त्यावर शस्त्रक्रिया करू शकतो. पण माझ्या बाबतीत मला तो मला झाला असल्याचे, उशीरा समजले. आणि एवढेच नाही तर माझ्या स्वादुपिंडावर त्याने हल्ला केला होता. त्यामुळे शस्त्रक्रिया करणे व जगणे, दोन्ही अशक्य होते. त्यामुळे आता माझ्याकडे जगण्यासाठी फक्त सहा महिने उरले होते. प्रत्येक तासागणिक दुःख वाढत होते. आणि मग अचानक लँडे आला. सहा आठवड्यापूर्वी हे मंगळवारी सकाळी खूप लवकर झाले. तू भेटायला येण्याच्या खूप आधी झाले. मला माहिती होते, या झोपाळू, लाजऱ्या वाऱ्यात काही वेडेपणा आहे. तो दबक्या पाऊलांनी आला नाही. माझ्या इतर पाहुण्यांसारखे, काय बोलायचे, ते त्याला कळत नव्हते. तो हसत हसत व बळकटपणे लांब ढांगा टाकत माझ्या अंथरुणाशी येऊन, तिथे त्याच्या डोळयात तेजस्वी चमक

घेऊन, माझ्याकडे बघत उभा राहिला. तो म्हणाला, माझ्या मुला, विलियम, हे छान आहे. मला पाहिजे तसा तू आहेस!”

कदाचित मला तुला स्पष्टीकरण द्यावे लागेल, की जरी जॉन लँडे आपल्या घरी कधी आला नव्हता आणि तू त्याला अगदी क्वचित भेटली होतीस, तरी त्याची माझी मैत्री निदान गेले नऊ वर्षांची तरी होती. मी मुळात तत्वज्ञानाचा प्राध्यापक आहे. पण तुला माहिती आहे, त्याप्रमाणे अलिकडे मी मानसशास्त्रात रमलो आहे. त्यामुळे माझी व त्याची रुची एकत्र आली आहे. तो नसांसंबंधीचा, मोठा तज्ञ शल्यविशारद आहे. अलिकडे त्याने मला दयाळूपणे त्याचे काही शस्त्रक्रियेचे परिणाम अभ्यासायची परवानगी दिली, विशेषतः मेंदूच्या पुढच्या भागाशी संबंधित बदलणारे परिणाम. त्यामुळे तुला समजेल, की मंगळवारी तो अचानक जेव्हा माझ्या अंगावर ओरडत आला, तेव्हा आम्ही काही एकमेकांना अनोळखी नव्हतो. तो माझ्या अंथरुणाजवळील खुर्ची ओढत म्हणाला, “हे बघ, काही आठवड्यात तू मरणार आहेस. बरोबर? लँडेकडून आलेला तो प्रश्न मला फार टोचला नाही. एक प्रकारे मनाई असलेल्या विषयावर बोलणारा तो पाहुणा, मला ताजेतवाने करत होता.

“तू याच खोलीत मरणार आहेस. ते तुला बाहेर काढून तुझे दफन करतील."

मी म्हणालो, “पुरतील.”

“ते अजून वाईट आहे. आणि मग काय? तू स्वर्गात जाशील, असा तुझा विश्वास आहे का?

“जरी हा विचार दिलासा देणारा असला, तरी माझी खात्री नाही.”

“किंवा कदाचित नरकात?”

“तिथे मला पाठवायचे, काही कारण मला दिसत नाही.”

“माझ्या प्रिय विलियम, ते आपल्याला कधीच कळत नाही.”

मी विचारले, “पण हे सर्व काय चालले आहे?”

तो माझे नीट निरीक्षण करत म्हणाला, “व्यक्तिशः असा विश्वास ठेऊ नकोस, की मरणानंतर, तू तुझ्याबद्दल काही ऐकशील. फक्त --- “ इथे तो थांबला व हसून माझ्यावर वाकत, पुढे बोलला, “अर्थात फक्त तू मला माझ्या हातात सोपवण्याची हुशारी दाखवलीस तरच! तू माझी ही सूचना मानशील का?”

ज्या तऱ्हेने तो माझ्याकडे निरखून बघत होता, ज्या विचित्र पद्धतीने भुकेला असल्याचे दाखवत होता, त्यावरून मला मी विकायला दुकानात ठेवलेला महत्वाचा मासाचा तुकडा असल्याचे, त्याने तो विकत घेतल्याचे व तो त्यांनी गुंडाळून द्यायचे बाकी उरल्याचे मला वाटू लागले.

“विलियम, मी हे गंभीरपणे म्हणतो आहे. तू माझा हा बेत मान्य करशील का?”

“तू काय बोलतो आहेस, ते मला समजत नाही.”

“मग मी काय सांगतो, ते ऐक. ऐकतोस का?”

“तुला आवडत असेल, तर सांग. पण मला वाटते, हे ऐकून माझे नुकसान होणार आहे.”

“उलट, तुझ्या मरणानंतर तुझा फायदा होणार आहे.”

मी त्यासाठी तयार झालो. निश्चल पडून राहिलो. माझी खात्री आहे, तो माझ्याकडून उड्या मारायची अपेक्षा करत होता. काही कारणाने मी ते करायलाही तयार होतो. मी त्याच्या हळूवार स्मितहास्य असलेल्या चेहऱ्याकडे बघत, निश्चल पडून राहिलो.

“विलियम, हीच ती गोष्ट आहे, ज्यावर मी गेली काही वर्षे शांतपणे काम करतो आहे. येथील दवाखान्यातील एक दोघेजण, विशेषतः मॉरीसन मला मदत करतो आहे. आम्ही प्रयोगशाळेतील प्राण्यांवर खूपशा यशस्वी चाचण्या केल्या आहेत. मी आता हे प्रयोग मानवावर करावेत, अशा टप्प्यावर येऊन पोचलो आहे. हे मोठे आव्हान आहे. शल्यचिकीत्सेच्या बाबतीत, प्रथम हे जरा ताणलेले वाटेल. पण हे व्यवहार्य का नसावे, याला काही कारण दिसत नाही.”

लँडे पुढे झुकला व त्याचे दोन्ही हात माझ्या अंथरुणाच्या बाजूला ठेवले. त्याचा चेहरा जरा हडकुळा, पण नेहमीचा डॉक्टरचा दिसत नसून, देखणा दिसत होता. असा बऱ्याचजणांचा असतो. त्याच्या डोळयातून तो मंद विजेच्या प्रवाहासारखा चकाकीतपणे बाहेर पडत होता आणि जणू म्हणत होता, फक्त मीच तुला वाचवू शकतो. जॉन लँडेचे डोळे मोठे तेजस्वी दिसत असून, त्यात उत्सुकता नाचत होती. तो म्हणाला, “खूप मागे मी रशियाहून आणलेली, एक लहानशी वैद्यकीय फिल्म पाहिली होती. ती जरा भीतीदायक होती, पण रुचीपूर्ण होती. त्यात एका कुत्र्याचे डोके शरीरापासून पूर्णपणे वेगळे दाखवले होते. पण कृत्रिम हृदय जोडून रक्तप्रवाह व्यवस्थित चालू होता. आता ट्रेमधील कुत्र्याचे

डोके जिवंत होते. मेंदू काम करत होता. ते त्यांनी अनेक कसोट्यांद्वारे सिद्ध केले होते. उदाहरणार्थ, जेव्हा कुत्र्याच्या ओठांवर अन्न शिंपडले जाई, तेव्हा ते चाटण्यासाठी जीभ बाहेर येई आणि डोळे खोलीत हिंडणाऱ्या माणसाचा मागोवा घेत. यावरून असा निष्कर्ष निघतो, की डोके व मेंदू हा जिवंत रहाण्यासाठी, इतर शरीराला जोडला गेलेला पाहिजेच, असे काही नाही. अर्थात प्राणवायुयुक्त रक्तप्रवाह चालू पाहिजे. मग आता ही फिल्म बघितल्यावर, माझ्या विचारांप्रमाणे मेंदू कवटीमधून बाहेर काढायचा आणि एक वेगळा अवयव म्हणून बराच काळ जिवंत ठेवायचा. उदाहरणार्थ, तू मेल्यावर, असा प्रयोग करायचा.”

मी म्हणालो, “मला हे आवडले नाही.”

“मध्ये बोलू नकोस, विलियम, माझे संपू दे. मी या प्रयोगांद्वारे, असे म्हणू शकतो, की मेंदू हा स्वयंपूर्ण आहे. तो स्वतःचा रक्षणद्राव, विचारांची जादूमयी क्रिया व स्मरणशक्ती, हात नसले, कवटी नसली किंवा धड नसले तरी, स्वतः तयार करू शकतो. फक्त मी म्हटल्याप्रमाणे, प्राणवायुयुक्त रक्तप्रवाह योग्य प्रकारे, चालू पाहिजे. माझ्या प्रिय विलियम, क्षणभर तुझ्या मेंदूचा विचार कर. तो चांगला सुरक्षित आहे. आयुष्यभराचे अनुभव त्यात साठवलेले आहेत. त्यासाठी वर्षानुवर्षे लागली आहेत. काही नावीन्यपूर्ण कल्पना मांडण्याची ही सुरवात आहे. परंतु लवकरच, तुझ्या शरीराबरोबर तोदेखील मरणार आहे. कारण तुझ्या  स्वादुपिंडाला कर्करोग झाला आहे.”

“नाही. मी तुझा आभारी आहे, पण हे आता थांबव. त्यापासून पळ काढावा, अशी ही कल्पना आहे. आणि जरी तू ती यशस्वीपणे राबवलीस, ज्याबद्दल मला शंका आहे, तरी ते निरर्थक आहे. जर मी बोलू, बघू, ऐकू व अनुभूती घेऊ शकणार नसेन, तर माझा मेंदू जिवंत ठेवण्याचा काय उपयोग आहे? व्यक्तिशः मला हा प्रकार अघोरी वाटतो.”

लँडे म्हणाला, “मला वाटते, तू आमच्याशी संवाद साधू शकशील आणि आम्ही तुला काही प्रमाणात दृष्टीही देऊ शकू. पण आपण हे हळूहळू करू. त्याकडे मी नंतर वळतो. काही झाले तरी, तू लवकरच मरणार आहेस, हे नक्की आहे. माझ्या बेताप्रमाणे मी तुला मेल्याशिवाय हातही लावणार नाही. विलियम, चल, तयार हो. खराखुरा तत्वज्ञ त्याचे मृत शरीर शास्त्राच्या भल्यासाठी द्यायला कचरणार नाही.”

मी उत्तरलो, “हे काही मला तितके साधेसरळ दिसत नाही. मी जिवंत किंवा मेलेला असलो, तरी तुझे माझे लागेबांधे संपलेले असतील.”

तो थोडे हसत म्हणाला, “ठीक आहे. तुझे बरोबर असेल. पण तरी तुला याबद्दल अजून थोडे समजल्याशिवाय, तू मला इतक्या लवकर उडवून लावावेस, असे मला वाटत नाही.”

“मला काहीही ऐकायचे नाही.”

सिगरेटकेस उघडून तो म्हणाला, “सिगरेट घे.”

“तुला माहिती आहे, मी सिगरेट ओढत नाही.”

त्याने स्वतः एक घेतली व ती छोट्या चंदेरी लायटरने पेटवली. तो म्हणाला, “माझ्यासाठी उपकरणे बनवणाऱ्या लोकांकडून मला ही भेट मिळाली आहे. ही नवीन आहे, नाही का?”

मी तो लायटर तपासून परत दिला. तो म्हणाला, “मी पुढे सांगू का?”

“मी म्हणेन, नको.”

“स्वस्थ पडून रहा आणि ऐक. मला वाटते ते तुला नक्की आवडेल.”

माझ्या पलंगाशेजारी काही निळी द्राक्षे होती. ती ताटली मी माझ्या छातीवर ठेऊन, मी द्राक्षे खाऊ लागलो.

लँडे म्हणाला, “प्रत्यक्ष मरणाच्या क्षणी, मी तुझ्या शेजारी उभा असेन.

म्हणजे मला तातडीने तुझा मेंदू जिवंत ठेवण्यासाठी हालचाल करता येईल.”

“म्हणजे तो डोक्यात ठेऊन?”

“सुरवातीला हो. ते तसेच करावे लागेल.”

“आणि नंतर तो कुठे ठेवणार?

“तुला माहिती करून घ्यायचे असले, तर एखाद्या खोलगट भांड्यात.”

“तू याबद्दल खरोखर गंभीर आहेस का?”

“हो, खरेच गंभीर आहे.”

“ठीक आहे, पुढे?”

“मला वाटते, तुला माहिती आहे, की जेव्हा हृदय बंद पडते, तेव्हा मेंदूला ताज्या रक्ताचा व प्राणवायूचा पुरवठा होत नाही. त्यामुळे तो मरू लागतो. चार ते सहा मिनिटात, सर्व काही मरून जाते. तीन मिनिटानेही तुम्हाला काही नुकसान झालेले दिसते. त्यामुळे असे होऊ नये म्हणून, मला भरभर काम करावे लागेल. पण मशीनच्या सहाय्याने, हे सर्व सोपे होईल.”

“कुठले मशीन?”

“कृत्रिम हृदय. अलेक्स कॅरेल व लिंडबर्ग यांनी हे तयार केले आहे. ते प्राणवायुयुक्त रक्तप्रवाह योग्य तापमानाला व योग्य दाबाने चालू ठेवते. आणि इतरही बऱ्याच आवश्यक गोष्टींची काळजी घेते. ते फार गुंतागुंतीचे नाही.”

“तू मला सांग की तू मरणाच्या क्षणी काय करणार? तू पहिली कुठली गोष्ट करणार?”

“तुला मेंदूतील शुद्ध व अशुद्ध रक्तवाहिन्यांबद्दल कितपत माहिती आहे?”

“काही नाही.”

“मग ऐक. ते फार अवघड नाही. मुख्य दोन रक्तवाहिन्यांतून मेंदूला रक्तपुरवठा होतो. ऊर्ध्वमहारोहिणी व त्याच्या उपशाखा. समजले?”

“हो.”

“आणि अशुद्ध रक्त परत नेणाऱ्या नीलांची व्यवस्था तर त्याहून सोपी आहे. काही रोहिण्या मणक्यात जातात तर काही मेंदूत. आणि काही नीला मणक्यातून व मेंदूतून परत येतात. आपण त्यांना काही हात लावत नाही.”

मी म्हणालो, “ठीक आहे. अशी कल्पना करू की मी नुकताच मेलो आहे. आता तू काय करणार?”

“मी ताबडतोब तुझी मान उघडणार. त्या रक्तवाहिन्या शोधून काढणार व त्या कृत्रिम रक्तवाहिन्यांनी कृत्रिम हृदयाला जोडणार. आता मशीन चालू करणार. त्यात योग्य अशा रक्ताची निवड आधीच केलेली आहे. त्यामुळे तुझ्या मेंदूतील रक्तप्रवाह चालू राहील.”

“मी त्या रशियन कुत्र्यासारखा असेन.”

“तसे नसेल. कारण तू शुद्धीवर नसणार. तू मरशील तेव्हा मला संशय आहे, की तुझा मेंदू परत खूप काळ जिवंत रहाणार की नाही, याबद्दल मला शंका आहे --- म्हणजे तो जिवंत राहिलाच तर! तरीपण सजग किंवा मृत, तू रुचीपूर्ण अवस्थेत असणार, नाही का? तुझे शरीर थंडगार असेल आणि मेंदू जिवंत असेल.” लँडे थांबला. तो आनंदी भविष्याचा वेध घेत होता. तो त्या कल्पनेत इतका तल्लीन झाला होता व गोंधळून गेला होता, की मलाही तसेच वाटत नसेल, हा विचार त्याला शिवलाच नाही. “चला आता आपण आपापला वेळ घेऊ. माझ्यावर विश्वास ठेव. असे  प्रयोग होण्याची काळाची गरज आहे. पहिल्या प्रथम आपल्याला काय करावे लागेल, की तुला ऑपरेशनसाठी दवाखान्यात हलवावे लागेल.  सतत चालणारे कृत्रिम हृदय तुझ्या मेंदूला जोडावे लागेल. पुढील समस्या ---  “

मी म्हणालो, “ठीक आहे. आता बास. मला अजून काही ऐकायचे नाही.”

“ओहो, पण तुला ऐकावेच लागेल. तुझ्या बाबतीत काय काय होणार आहे, हे तुला नीटपणे सर्व काही माहिती पाहिजे. जेव्हा तुझा मेंदू सजग होईल, तेव्हा तुझ्या दृष्टीने, ते समाधानकारक ठरेल. तू कुठे आहेस व तिथे कसा आलास, हे तुला आठवेल. तुझ्या मनाच्या समाधानाकरता, तुला ते माहिती पाहिजे. तुला हे कबूल आहे का?”

मी अजूनही त्याच्याकडे बघत अंथरुणावर पडून होतो.

“तर पुढील काम असे असेल, की तुझा मेंदू काही इजा न होता, तुझ्या मृत शरीरापासून वेगळा काढणे. शरीर कुचकामाचे होणार. ते आधीच कुजायला सुरवात झाली असेल. कवटी आणि चेहराही कुचकामाचे ठरणार. ते ओझेच होणार. त्यामुळे मला ते आजूबाजूलाही नकोत. मला काय हवे आहे तर मेंदू! स्वच्छ सुंदर जिवंत मेंदू! त्यामुळे मी जेव्हा तुला टेबलावर घेईन, तेव्हा मी लहानशी करवत घेऊन, मी तुझ्या कवटीचे आवरण कापून काढेन. तू काही मिनिटांपूर्वीच मृत झालेला असशील. त्यामुळे तुला भूल द्यायची गरज पडणार नाही.”

मी बोललो, “नरकात गेली तुझी ती भूल!”

“मी तुला सांगतो विलियम, तू थंडगार पडलेला असणार. विलियम, विसरू नकोस, तू काही मिनिटांपूर्वीच मृत झालेला असशील.”

लँडेने त्याचे खांदे उडवले. तो म्हणाला, “त्यामुळे मला काहीच फरक पडत नाही. जर तुला हवे असेल तर मी तुला काही गुंगी येणारे द्रावण देऊन

स्वतःला आनंदी करेन व मग मी तुझ्या मानेच्या वरील डोक्याची कातडी सोलून काढेन.

मी म्हणालो, “आभारी आहे.”

त्याने चालू ठेवले, “तुला माहिती आहे का, कधीकधी काही वेगळेच होते. मागच्याच आठवड्यात एका मनुष्याला बेशुद्धावस्थेत आणले गेले. त्याला भूल दिल्याशिवाय मी त्याचा मेंदू शरीरापासून वेगळा केला आणि एक रक्ताची गाठ सोडवली. मी अजून कवटीवर काम करत होतो तेव्हा तो जागा होऊन बोलू लागला. तो बोलला, “मी कुठे आहे?”

“तू दवाखान्यात आहेस.”

“ठीक आहे. मी तशी कल्पना करतो.”

“मला सांग, मी जे करतो आहे, त्यामुळे तुला त्रास होतो आहे का?”

तो उत्तरला, “नाही. अजिबात नाही. तुम्ही काय करत आहात?”

“मी तुझ्या मेंदूतील रक्ताची गाठ घालवतो आहे.”

“घालवत आहात?”

“स्वस्थ पडून रहा. हलू नकोस. माझे होत आले आहे.”

तो मनुष्य बोलला, “ती हलकट गाठ माझे डोके दुखवते आहे.”

तो प्रसंग आठवून, थोडे थांबून लँडे हसला. ”तर असे संभाषण झाले.

दुसऱ्या दिवशी मात्र त्या माणसाला ते काही आठवत नव्हते. मेंदू म्हणजे मजेशीर गोष्ट आहे.”

मी म्हणालो, “मला स्थानिक भूल हवी आहे.”

“जशी तुझी इच्छा, विलियम आणि आता मी म्हटल्याप्रमाणे, लहानशी करवत घेऊन ,मेंदू कवटीतून बाहेर काढणार. त्यामुळे वरील अर्धा मेंदू मोकळा होईल. तुला माहिती असेल किंवा नसेल, पण मेंदूभोवती  तीन आवरणे असतात. सर्वात बाहेरील आवरणाला डयुरा म्हणतात. मधल्याला आर्चनॉईड म्हणतात आणि सर्वात आतले पिया असते. सर्वसामान्य माणसाची अशी कल्पना असते, की मेंदू हा उघडा असून एका द्रावणात तरंगत असतो. पण तसे नसते. तो नीटपणे तीन आवरणात गुंडाळलेला असतो. आणि एक प्रकारचा द्राव दोन आवरणांमध्ये वहात असतो. हा द्राव मेंदूतच तयार होतो. काही क्रियेने तो नीलांमध्ये मिसळतो. मी स्वतः ही छानशी नावे असलेली तिन्ही आवरणे नष्ट करणार. असे करण्याची पुष्कळ कारणे आहेत.

“आता पुढची पायरी जरा धोकादायक आहे. आता उरलेला अर्धा मेंदूही आवरणातून मोकळा करायचा आहे. मग रक्तवाहिन्या लोंबत ठेवाव्या लागतील. लगेच त्या कृत्रिम हृदयाला जोडल्या जातील. ही लांबलचक व नाजूक कृती आहे. रोन्गेंअरच्या सहाय्याने हे अवघड काम करणे शक्य होईल. मग मेंदू पूर्णपणे सुटा होईल. यात येणाऱ्या समस्या पूर्णपणे तांत्रिक आहेत. पण त्या सोडवता येतील. हे शल्यचिकीत्सेचे व धीर धरण्याचे कसब आहे. आणि हे विसरून चालणार नाही की माझ्याकडे भरपूर वेळ आहे. आता मी मेंदू जिवंत ठेवण्यात यशस्वी होतो आहे.

आता असे धरून चालू, की कृत्रिम हृदय ऑपरेशन टेबलाच्या शेजारी सतत पंप करत असल्याने, मेंदू जिवंत रहातो. आता असे धरून चालू, की मी तुझा मेंदू तुझ्या कवटीतून सुखरूपपणे बाहेर काढलेला आहे आणि तो रक्तवाहिनीमार्फत कृत्रिम हृदय मशीनला जोडला गेलेला आहे, तर आता पुढे काय?

“आता मेंदू एका विशेष प्रकारच्या खोलगट भांड्यात ठेवला जाईल आणि पाठीच्या कण्याला जोडलेला बाहेरील आवरणाचा, ड्युराचा भाग मी शिवून टाकेन. मग काही समस्या उरणार नाही. ते खोलगट भांडे मी रिंगर, या विशिष्ट द्रावणाने भरून टाकेन. हे न्युरो शस्त्रक्रियेतील विशिष्ट प्रकारचे द्रावण आहे. तर अशी ही सगळी क्रिया आहे.” लँडे म्हणाला. “तुझा मेंदू आता खोलगट भांड्यात जिवंत आहे. आणि तो खूप काळ, वर्षानुवर्षे तसाच राहिल्यास काही आश्चर्य नाही. अर्थात कृत्रिम हृदयाकडे सतत लक्ष द्यावे लागेल.

“पण तो काम करेल का?”

"माझ्या प्रिय विलियम, हे मला कसे कळेल? मी हेदेखील सांगू शकणार नाही, की त्याच्यात सजगता असेल, की नाही.”

“आणि असेल तर?”

“तेच तर नवलपूर्ण ठरेल.”

मी म्हणालो, “हो का? पण मला काही शंका आहेत.”

“अर्थात त्या तू विचार. पण तुझी विचारप्रक्रिया छानपैकी चालू असणार आणि स्मरणशक्तीही शाबूत असणार.”

मी म्हणालो, “जरी दिसत नसले, ऐकू येत नसले, वास येत नसला व बोलता येत नसले, तरीदेखील!”

तो ओरडला, “आहा, मला माहिती आहे, मी काहीतरी विसरलो आहे. ऐक. आणि मी तुला डोळ्याबद्दल काही सांगितले नाही. ऐक. मी तुझा बघायचा एक मज्जातंतू जिवंत ठेवणार आहे. तो डोळ्याचे काम करेल. खरे तर तो मज्जातंतू नाहीच आहे. तो मेंदूचाच एक लहानसा भाग आहे. त्यामुळे तुला दिसू शकण्याचा माझा उद्देश सफल होईल. मी आधीच डोळा ठेवण्यासाठी, तुझ्या डोळ्याच्या खोबणीऐवजी एक लहानशी प्लॅस्टीक डबी तयार केली आहे. ती रिंगर, या विशिष्ट द्रावणाच्या पृष्ठभागावर तरंगेल.”

मी म्हणालो, “छताकडे बघत.”

“मला वाटते, हो. मला वाटते कडेचे व आजूबाजूचे काही बघण्यासाठी तिथे विशिष्ट स्नायू नाही आहेत. पण तो तिथे आरामात शांतपणे पहुडलेला असेल व छताकडे बघत असेल.”

“छान. छान. माझा कान जिवंत ठेवण्याबद्दल काय?”

“यावेळेस मी तो प्रयत्न केलेला नाही.”

मी म्हणालो, “मला कानही हवा. हवा म्हणजे हवाच.”

“नाही.”

“मला बाकचे संगीत ऐकायचे आहे.”

लँडे सभ्यतापूर्वक म्हणाला, “ते किती कठीण आहे, ते तुला समजत नाही आहे. ती डोळ्यापेक्षा फार गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. यावेळी मी सर्व काही करू शकणार नाही. आणि जर डोळा काम करत असेल, तर कानाचे एवढे महत्व उरत नाही. आम्ही तुला वाचण्यासाठी निरोप देऊ शकू. काय शक्य आहे आणि काय नाही, हे तू माझ्यावर सोड.”

“मी अजून तुला हा प्रयोग माझ्यावर करायला परवानगी दिलेली नाही.”

“मला माहिती आहे, विलियम, मला माहिती आहे.”

‘माझे काही नक्की नाही. मी या कल्पनेचा विचार करतो आहे.”

“म्हणजे तू नुसताच मरून जाणार?”

“कदाचित हो. अजून मी ठरवले नाही. मी बोलू शकेन का?”

“अर्थात नाही.”

“मग मी तुझ्याशी संवाद कसा साधणार? मी भानावर आहे, हे तुला कसे कळणार?”

लँडे म्हणाला, “ते आम्हाला सहज कळेल.”

“खरे म्हणतोस?”

“हो. ते सोपे आहे.”

“पण मी तुमच्याशी संपर्क साधू शकणार नाही?”

“खरे तर तू तेही करू शकशील. लंडनमध्ये एक वरदायमर नावाचा मनुष्य आहे. तो विचारप्रक्रियेवर, रुचीपूर्ण काम करतो आहे आणि मी त्याच्याशी

संपर्क ठेऊन आहे. तुला माहिती आहे का, की विचार करणारा मेंदू वीजप्रवाह व रासायनिक संदेश सोडतो. आणि हे लहरींच्या रुपात प्रगटतात."

मी म्हणालो, "मला त्याबद्दल थोडेबहुत माहिती आहे."

"तर वरदायमरने एन्सेफॅलोग्राफसारखे एक उपकरण शोधून काढले आहे. ते खूप अचूक असून बारीकसारीक तपशीलदेखील नोंदवते. मेंदू काय विचार करतो आहे, हे त्यातून एका आलेखाद्वारे शब्दात मांडता येते. मी त्याला बोलावून तुझी त्याच्याशी भेट घडवून आणावी, अशी तुझी इच्छा आहे का?

मी म्हणालो, "नको."

लँडे आधीच असा विचार करत होता, की मी त्याला हा प्रयोग करायला परवानगी देणारच आहे. म्हणून त्याने त्याचा दृष्टीकोन प्रगट केला.

मी म्हणालो, "तू येथून जा. मला एकट्याला राहू दे. मला घाई करून तुझा हेतू साध्य होणार नाही आहे."

तो घाईने उठून बाहेर पडला.

मी म्हणालो, "एक प्रश्न आहे." तो दरवाज्याच्या कडीवर हात ठेऊन थांबला व म्हणाला, "विलियम, बोल."

"साधा प्रश्न आहे. तू प्रामाणिकपणे यावर विश्वास ठेवतोस का, की खोलगट भांड्यातील माझा मेंदू माझ्या मनात आता जसे विचार येतात, तसे प्रगट करू शकेल? मी तेव्हादेखील आतासारखा विचार करू शकेन? आणि माझी स्मरणशक्ती शाबूत राहील?"

तो उत्तरला, “का नाही रहाणार? तो तोच मेंदू आहे. तो जिवंत आहे. तो खराब झालेला नाही. खरे तर त्याला जराही धक्का लागलेला नाही. फक्त तुझे विचार तुझ्या जाणीवांशी निगडीत असणार नाहीत. तू एका वेगळ्या, एकाकी, असामान्य जगात रहात असशील. तुला कसला त्रास होणार नाही. वेदनाही होणार नाहीत. भूक लागणार नाही. तहान लागणार नाही. फक्त तुझ्या स्मृती आणि विचार शाबूत असतील. आणि कदाचित तू वाचू शकशील. मला तर हे सर्व ठीक वाटते आहे.

“हो का?”

हो विलियम, विशेषतः तत्वज्ञानाच्या डॉक्टरकरता. हा अनुभव खूप मोलाचा असेल. मेंदूचा वेगळेपणा आणि शांतता, असे मनुष्याने यापूर्वी कधी साध्य केले नाही, असे काही जगाला तू मिळवून देऊ शकशील. कदाचित पुढेही कोणाला, असले काही जमणार नाही. तुझ्यामुळे जीवनातील क्रांतिकारक अशी मोठ्या प्रश्नांची उत्तरे, विचार आणि कल्पना पुढे येतील. अशी कल्पना कर की विचारांची किती एकाग्रता यामुळे साधू शकेल.”

मी म्हणालो, “आणि कदाचित निराशाही!”

“काहीही बोलू नकोस. निराशा नक्कीच नसेल. मुळात काही इच्छा केल्याशिवाय निराशा येत नाही. तुला काही करायची इच्छाच नसेल. शारीरिक इच्छा.”

“मला जगातील माझ्या आधीचे आयुष्य आठवत असेल आणि त्यात परत जावे अशी मला इच्छा होत असेल.”

“हा काय खुळचटपणा आहे! तुझा आरामशीर मेंदू सोडून पुन्हा या खातेऱ्यात कशाला?”

मी म्हणालो, “अजून एका प्रश्नाचे उत्तर दे. किती काळ तू हा मेंदू असा जिवंत ठेऊ शकशील?”

“मेंदू? कोणाला माहित? आदर्श अटींवर, शक्यतो वर्षानुवर्षे. तो नष्ट करणाऱ्या गोष्टी बहुधा नसतील. कृत्रिम हृदयाचे आभार. रक्तदाब कायम आहे, तसाच राहील. खऱ्या आयुष्यात असे होणे अवघड आहे. तापमानही तेच असेल. रक्तघटक तेच असतील. काही अशुद्धता नसेल. विषाणू, जिवाणू नसतील. अर्थात असा विचार करणे मूर्खपणाचे आहे, पण मला वाटते, अशा तऱ्हेने मेंदू दोनतीनशे वर्षे जगेल. बरय. मी उद्या येतो.” अशा तऱ्हेने माझे मनस्वास्थ्य हरवून, तो घाईने बाहेर पडला. तो गेल्यावर माझी पहिली प्रतिक्रिया काय होती, तर या सर्वापासून सुटका मिळवण्याची इच्छा. हा सर्व प्रकार फार चांगला वाटत नव्हता. मूलतः त्यापासून पळ काढावा, असे काही त्यात होते. मी बाकी सर्व शरीर सोडून फक्त एका खोलगट भांड्यापुरते उरावे, ही काही नकोशी कल्पना होती. शिवाय यामुळे मला अगतिक देखील वाटत होते. एकदा या प्रयोगाला परवानगी दिल्यावर माघार घेणे, बचाव करणे किंवा काही स्पष्टीकरण देणे शक्य नाही. त्याना जमेल तेवढा वेळ ते माझा मेंदू जिवंत ठेवणार. आणि समजा मला ते सहन झाले नाही तर? ते फार वेदनादायक ठरले तर? मी आक्रमक झालो तर? पळायला मला पायही नसतील. किंचाळायला आवाजही नसेल. मला फक्त पुढील दोनशे वर्षे हसायला तोंडही नसेल. या

वळणावर मला एक नवीन विचार सुचला. तो असा होताः एक पाय कापलेल्या माणसाला पाय तिथे अजूनही असल्याचा जसा भास होतो आणि तो नर्सला वेड्यासारखे सांगतो की माझ्या पायाच्या बोटांना खाज सुटली आहे आणि असेच काहीबाही. मी अलीकडे असेच काहीसे ऐकले. अशाच तऱ्हेने एकटा पडलेला माझ्या मेंदूला कशावरून माझ्या शरीराचे असे भास होणार नाहीत? त्यावेळी माझी सगळी जुनी दुखणी उफाळून येतील. तेव्हा मी वेदनाशामक गोळीदेखील घेऊ शकणार नाही. एका क्षणी मी कदाचित अशी कल्पना करत असेन, माझ्या पायात भयंकर दुखत आहे किंवा खूप अपचन झाले आहे. काही मिनिटांनी मला असेही वाटू शकते, की माझे बिचारे मूत्राशय इतके भरले आहे, की आता ते रिकामे केले गेले नाही, तर ते फुटेल. अरे देवा, असे काही व्हायला नको रे बाबा. मी बराच वेळ तिथे पडल्या पडल्या असा विचार करत होतो. मग अचानक दुपारी माझी मनस्थिती बदलू लागली. मला तो प्रकार इतका भयानक वाटेना. लँडेच्या प्रस्तावावर विचार करावा, जास्त बुद्धी वापरून विचार करावा, असे मला वाटू लागले. काही आठवड्यात माझा मेंदू मरून जाणार नाही व नाहीसा होणार नाही, हा विचार थोडा दिलासादायक नव्हता का? मी माझ्या मेंदूबद्दल अभिमानी असायला हवे होते. तो एक भावनामय, चकचकीत व अती प्रगत मेंदू असणार नव्हता का? त्यात प्रज्ञावानासारखी माहिती भरलेली नसेल का? तो अजूनही कल्पनारम्य व मूलगामी स्वरूपाच्या थिअरीज मांडू शकणार नाही का? मेंदूच्या बाबतीत बोलायचे झाले, तर त्याचे उत्तमच चाललेले असणार.

तर लँडेला व प्रिय मेरी तुलाही, फेकून द्यायचे असलेले माझे म्हातारे शरीर खरोखर जपून ठेवायच्या लायकीचे नाहीच आहे, असा विचार माझ्या मनात येतो आहे. मी पाठीवर झोपून द्राक्ष खात होतो. त्यातील तीन बिया काढून, मी ताटलीच्या कडेला लावल्या. मी शांतपणे म्हणालो, “मी ते करून घेणार. देवा रे, माझा विचार ठरला.” जेव्हा लँडे उद्या येईल, तेव्हा मी त्याला हे सांगेन. मी हे झटपट ठरवल्यावर मला फार बरे वाटू लागले. मी भरपूर जेवण हादडले. आणि नंतर नेहमीप्रमाणे, तू मला भेटायला आलीस. मी इतका चांगला दिसत होतो. तेजस्वी आणि उत्साही दिसत होतो. “काही झाले का? काही चांगली बातमी मिळाली का?” असे तू म्हणालीस.

मी म्हणालो, हो, तसे झाले आहे. तुला आठवत असेल, तर मी तुला आरामशीरपणे बसायला सांगितले आणि जितक्या हळूवारपणे हे सगळे सांगता येईल, तितके सांगितले. पण अरेरे, तुला त्यातले काही समजले नाही. मी तुला त्यातील महत्वाच्या बाबी सांगू लागलो, तेव्हा तुला खूप राग आला. तू म्हणालीस की हे चीड/उबग आणणारे व भयानक अविचारी आहे. मी पुढे सांगू लागलो, तेव्हा तू खोली सोडून निघून गेलीस. ठीक आहे. मेरी, मी तुझ्याबरोबर या विषयावर बोलायचा खूप वेळा प्रयत्न केला. पण तू ऐकायला सतत नकार दिलास. म्हणून मी ही चिठ्ठी लिहिली आहे. मी आशा करतो, की तू हे वाचशील. मला हे लिहायला बराच वेळ लागला. दोन आठवडे होऊन गेले. आता मला पूर्वीपेक्षा, अशक्त वाटते आहे. आता अजून काही सांगण्याची शक्ती मला उरली नसावी. मी काही निरोप घेत नाही आहे. कारण जर लँडेचा प्रयोग यशस्वी

झाला, तर छोटीशी संधी आहे. तू मला भेटायला आलीस, तर मी तुला नंतर भेटतो. मी मेल्यांनंतर, आठवड्याच्या आत तुला ही चिट्ठी वाचायला देऊ नये. कारण लँडे जे करणार आहे, ते तुला स्वतःला माहिती नसेल, की याचे परिणाम काय होतील. जर नसतील किंवा तू मुद्दाम ते जाणून घेतले नाहीस, तर तुझे मन आता बदल आणि लँडेचा प्रयोग कसा झाला आहे, हे फोन करून, त्याला विचार. एवढे तरी निदान कर. सातव्या दिवशी तुझ्याकडून त्याला फोन येईल, असे मी त्याला सांगितले आहे.

तुझा विश्वासू नवरा, विलियम

मी गेल्यावर छान रहा. नेहमी लक्षात ठेव की बायकोपेक्षा विधवेचे जिणे कठीण असते. दारू पिऊ नकोस. पैसे उधळू नकोस. सिगरेट ओढू नकोस. गोड केक खाऊ नकोस. लिपस्टिक लाऊ नकोस. दूरदर्शन संच आणू नकोस. माझा पलंग व आरामखुर्ची उन्हाळयात नीट जपून ठेव. आणि मी असे सुचवतो, की आता मला फोनचा उपयोग नसल्याने, तो बंद करून टाक. मिसेस पर्लने त्या बाडाचे शेवटचे पान वाचून, ते बाड सोफ्यावर तिच्या शेजारी ठेवले. तिचे ओठ घट्ट बंद झाले होते. आणि नाकाच्या कडेला सर्वत्र पांढुरके झाले होते. खरे तर एवढे वर्षांनी ती विधवा, खरे तर थोडी शांतता शोधत होती. हा सर्व प्रकार विचार करायला भीतीदायक व पशुतुल्य होता. ती शहारली. तिने तिच्या बॅगेतून दुसरी सिगरेट काढली व ती पेटवली. धुराने छाती भरून घेत व धुम्रवलये खोलीभर सोडत, ती विलीयमच्या कामाच्या टेबलावरील तिचा छानसा कोरा करकरीत, मोठा व चकचकीत दूरदर्शन संच पाय गुडघ्यात दुमडून विरोध

दर्शवत, बघत होती. त्याने हा दूरदर्शन संच पाहिला असता, तर तो काय म्हणाला असता, याचे तिला आश्चर्य वाटले. त्याने मागच्या वेळी तिला सिगरेट ओढतांना पकडल्याचे तिला आठवले. ते सुमारे एक वर्षापूर्वी असेल. तेव्हा ती स्वयंपाकघरात उघड्या खिडकीशेजारी बसली होती. तो कामावरून यायच्या आत तिने घाईघाईने एक सिगरेट संपवली होती. तिने मोठ्याने रेडिओ लावला होता. त्यावर नाचायचे गाणे लागले होते. तिने स्वतःसाठी कॉफीचा दुसरा कप भरला. धिप्पाड, रुंद हसू हसणारा, भयानक रागाचा ठिपका मध्यभागी दिसणाऱ्या डोळ्यांनी तिच्याकडे निरखून बघणारा, तो दारात उभा होता. एक महिन्याने, त्याने घराचे भाडे भरल्यावर, तिला काहीही पैसे दिले नाहीत. पण त्याला हे माहिती नव्हते, की सिंकच्या खालील कपाटात, सहा पौंड खर्च करून, तिने साबणांचा खोका आणून ठेवला होता. एकदा रात्री जेवतांना ती त्याला म्हणाली, "हे काय? तुला मला फुफ्फुसांचा कर्करोग होऊन द्यायचा नाही आहे का?"

तो उत्तरला, "नाही. असे काही नाही."

"मग मी सिगरेट का ओढू नको?"

"कारण मी त्याला मनाई करतो, म्हणून."

त्याने मुलेही होऊ दिली नव्हती. त्यामुळे त्यांना मुले नव्हती. पण आता मेल्यावर, तो तिला मनाई करणारा विलियम कुठे रहाणार होता? तिने लँडेला फोन करायची अपेक्षा तो करत होता. तिने त्याला फोन करणे अपेक्षित होते का? खरे तर नाही. तिने सिगरेट संपवली. नंतर लगेच दुसरी पेटवली. तिने फोनकडे

पाहिले. तो कामाच्या टेबलावर दूरदर्शनशेजारी ठेवलेला होता. विलीयमने तिला पत्र वाचल्यावर, लँडेला लगेच फोन करायला सांगितला होता. ती तो करायला, कल्पनिक कर्तव्य करायला, कां कू करत होती. तिला धीर होत नव्हता. शेवटी ती थरथरत का होईना, पण फोनजवळ गेली. पुस्तकात एक नंबर पाहिला. फोन फिरवला व थांबली.

"मला मिस्टर लँडे यांच्याशी बोलायचे आहे."

"कोण बोलते आहे?"

"मिसेस पर्ल. मिसेस विलियम पर्ल."

"एक मिनिट."

क्षणार्धात लँडे फोनवर आला, "मिसेस पर्ल?"

"हो, मी मिसेस पर्ल."

थोडी शांतता पसरली.

"मिसेस पर्ल, शेवटी तुम्ही मला फोन केलात, म्हणून मला आनंद झाला. मला वाटते, तुम्ही एकदम ठीक आहात." तो आवाज भावनारहित, शांत व नम्र होता. "तुम्ही दवाखान्यात येता का, म्हणजे आपल्याला थोडे बोलता येईल. मला वाटते, हे सर्व कसे काय करायचे, याची तुम्हाला उत्सुकता असेल." ती काही बोलली नाही.

"सर्व काही सुरळीत झाले. मला आशा होती, त्यापेक्षा खूपच चांगले. फक्त तो जिवंत नाही."

“मिसेस पर्ल, ही जाणीवपूर्वकता आहे. दुसऱ्या दिवशी त्याला सजगता आली आहे. हे रुचीपूर्ण नाही का?”

ती तो बोलत रहाण्यासाठी थांबली. ”डोळा बघू शकतो आहे. त्याची आम्हाला खात्री आहे. कारण एन्सेफॅलोग्राफच्या आलेखावरून, आम्हाला ते लगेच कळले. त्या मेंदूला आता आम्ही  रोज वर्तमानपत्र वाचायला देतो आहोत.”

मिसेस पर्लने टोकेरीपणे विचारले, “कुठले वर्तमानपत्र?”

“डेली मिरर, त्यात शीर्षके ठळक व मोठी असतात.”

“त्याला मिरर आवडत नाही. त्याला टाईम्स द्या.”

तिथे शांतता पसरली. मग डॉक्टर म्हणाले, “छान, मिसेस पर्ल. आम्ही टाईम्स देऊ. ते आनंदी ठेवण्यासाठी, आम्ही नैसर्गिकपणे सर्व काही करू.”

“तो, तो आहे. ते नाही.”

डॉक्टर म्हणाले, “तो. मी तुमची माफी मागतो. त्याला आनंदी ठेवण्यासाठी. म्हणूनच आम्ही तुम्हाला लवकरात लवकर, इथे बोलावले आहे. मला वाटते, त्याच्यासाठी, तुम्हाला बघणे चांगले ठरेल. त्याच्याकडे बघून हसा आणि त्याला उडते चुंबन द्या. तो आनंदी होईल. त्याला बघून तुम्ही किती आनंदित झाला आहात, ते तुम्ही त्याला दाखवू शकता. पुन्हा पुन्हा त्याच्याबरोबर रहा.” मग शांतता पसरली.

शेवटी मिसेस पर्ल गंभीर व फार दमलेल्या आवाजात, म्हणाली, “मला वाटते, मी पुन्हा पुन्हा येऊन बघावे, की तो कसा आहे.”

“छान. मला वाटलेच की तुम्ही हे कराल. सरळ माझ्या दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयात या. अच्छा.”

अर्ध्या तासाने, मिसेस पर्ल तिथे आली.

लँडे चालता चालता म्हणाला, “तो कसा दिसतो, हे बघून तुम्ही आश्चर्यचकित होऊ नका.”

“नाही, मी नाही होणार.”

“पहिल्यांदा तुम्हाला धक्का बसेल. मला तुमची काळजी वाटते, कारण तो पहिल्यासारखा अजिबातच दिसत नाही.”

“डॉक्टर, मी त्याच्या दिसण्यासाठी, त्याच्याशी लग्न केले नाही.”

डॉक्टरने त्याच्या मोठ्या डोळयांनी, चमकून तिच्याकडे पाहिले. काय विचित्र बाई आहे! एके काळी ती छान दिसत असणार. पण आता ते रूप सरले होते. चेहऱ्याची रया गेली होती. गाल गुबगुबीत होऊन ओघळले होते. आनंदी नसलेल्या वैवाहिक जीवनाने, ती तशी झाली होती. ते न बोलता, चालत राहिले.

लँडे म्हणाला, “आत गेल्यावर तुम्ही सावकाशीने त्याला बघा. जोपर्यंत तुम्ही तुमचा चेहरा त्याच्या डोळयासमोर ठेवत नाही, तोपर्यंत, त्याला तुम्ही आल्याचे त्याला कळणार नाही. डोळा नेहमीच उघडा असतो. पण त्याला तो हलवता येत नाही. त्यामुळे दृष्टीक्षेत्र मर्यादित असते. हल्ली आम्ही तो छतावर स्थिर केला आहे. आणि अर्थात त्याला काही ऐकू येत नाही. आपण पाहिजे तितक्या जोरजोरात बोलू शकतो.”

लँडेने एक दार उघडले. आणि तिला एका लहानशा चौकोनी खोलीत ढकलले. तिच्या दंडावर हात ठेवत, तो म्हणाला, “मी अजून इतक्या जवळ गेलो नाही. तुम्हाला याची सवय होईपर्यंत, इथे माझ्याबरोबर क्षणभर उभे रहा.”

तिथे खोलीच्या मध्यभागी, वॉशबेसीनच्या आकाराचे एनॅमलचे मोठे पांढरे खोलगट भांडे उंच पांढऱ्या टेबलावर ठेवलेले होते. आणि प्लॅस्टीकच्या अर्धा डझन अरुंद नळया त्यातून बाहेर आलेल्या होत्या. त्या हृदय मशीनला जोडल्या होत्या. त्यातून रक्त जातायेताना दिसत होते. त्या मशीनमधून ठेक्यात आवाज येत होता

लँडे म्हणाला, “तो इथे आहे.” ते प्रकरण तिला दिसण्यासाठी फार उंच होते. “थोड्या जवळ या, पण फार नको.” त्याने तिला दोन पाऊले पुढे नेले. आता मान उंचावून, मिसेस पर्लला ते दिसू लागले. ते द्रावण स्थिर व स्वच्छ होते. त्यामध्ये लहानसा अंड्याच्या आकाराचा डोळा तरंगत होता. लँडे म्हणाला, “हा डोळा दिसला का?”

“हो.”

“अजून तरी तो चांगल्या अवस्थेत आहे, असे आपण म्हणू शकतो. तो त्याचा उजवा डोळा आहे आणि प्लॅस्टीकच्या भांड्यात त्याच्या चष्म्यात होते, तसे भिंग आहे. आता त्याला पूर्वीसारखेच दिसते आहे.

मिसेस पर्ल म्हणाली छतात बघण्यासारखे काही नाही.”

“त्याची काही काळजी करू नका. आम्ही त्याचे मन रिझवण्यासाठी सर्व कार्यक्रम आखत आहोत. पण आम्ही त्याची इतकी घाई करणार नाही.”

“त्याला एखादे चांगले पुस्तक द्या.”

“देऊ. देऊ. मिसेस पर्ल, तुम्ही ठीक आहात ना?”

“हो.”

“मग आपण अजून थोडे जवळ जाऊ. जाऊ या का? मग तुम्हाला सर्व काही दिसेल.”

टेबलापासून काही यार्ड अंतरावर जाईपर्यंत त्याने तिला पुढे केले.

लँडे म्हणाला, “तो विलियम आहे.”

तिच्या कल्पनेपेक्षा तो डोळा फारच मोठा आणि गडद रंगाचा होता. त्या पृष्ठभागावरील उंचवट्याचा व रेषांच्या खुणांचा भाग बघून तिला टिकण्यासाठी खारवलेल्या आक्रोडाची आठवण आली. तिला त्याच्या खालपासून, मोठ्या दोन रोहिण्या व दोन नीला दिसत होत्या. त्या  प्लॅस्टीकच्या नळयांनी हृदय मशीनला जोडलेल्या होत्या. रक्त पुढे सरकतांना त्यांना बारीकसा धक्का बसत होता.

लँडे म्हणाला, “तुम्हाला थोडे पुढे वाकावे लागेल. तुमचा सुंदर चेहरा बरोबर डोळ्यासमोर धरा. त्याला तुम्ही दिसाल. तुम्ही त्याच्याकडे बघून हसा व उडते चुंबन फेका. जर तुमच्या जागी मी असतो, तर मी काही छान गोष्टी बोललो असतो. त्याला खरे तर त्या ऐकू येणार नाहीत. पण त्याला साधारण कल्पना येईल.”

मिसेस पर्ल म्हणाल्या, “त्याला उडती चुंबने आवडत नाहीत. तुमची हरकत नसेल, तर मी माझ्या पद्धतीने काय ते करते. ती टेबलाच्या कडेपर्यंत

चढून गेली. पुढे वाकली. आता तिचा चेहरा बरोबर त्या भांड्याच्या वर विलीयमच्या डोळ्यासमोर येईपर्यंत ती वाकली.

"हॅलो, प्रिय, मी मेरी आहे."

नेहमी तेजस्वी असणारा तो डोळा तिच्याकडे निरखून बघत रहीला.

तिने विचारले, "प्रिय, तू कसा आहेस?"

प्लॅस्टीकचा तो डोळा सर्व बाजूंनी उघडा असतो. त्यापासून मेंदूला जोडणारी वायर म्हणजे करड्या रंगाचा गुंता होता. "विलियम, तुला कसे वाटते आहे? तिच्या नवऱ्याच्या डोळ्यात विचित्र भावना उमटलेली दिसली. ती बघायला त्याला चेहरा नव्हता. फक्त डोळ्यात बघणेच शक्य होते. तो डोळा हळूहळू मोठा होत गेला. आणि तिला तो जणू चेहऱ्यासारखाच दिसू लागला. ती त्याकडे निरखून बघत बसली. त्याच्या पांढऱ्या रंगावर छोट्या लाल रक्तवाहिन्यांचे जाळे पसरलेले होते. निळ्या बुबुळावर, तीन चार सुंदर, गडद, चमकदार रेषा दिसत होत्या. बुबुळाचा मधला गोल भाग काळा आणि मोठा होता. "प्रिय, मला तुझे पत्र मिळाले आणि तू कसा आहेस, हे बघायला मी आले. डॉ लँडे म्हणतो, तू नवलपूर्ण रीतीने चांगला आहेस. कदाचित मी सावकाश बोलले, तर तुला समजेल. माझ्या ओठांच्या हालचालीवरून मी काय म्हणते आहे, हे समजून घे."

तो डोळा तिला निरखत होता, यात काही संशय नव्हता.

"तुझी काळजी घेण्यासाठी शक्य असलेले सर्व काही ते करत आहेत. हे असामान्य मशीन सतत रक्त पंप करते आहे. माझी खात्री आहे, की हे आमच्या

सगळयांच्या जुन्या म्हाताऱ्या हृदयांपेक्षा बरे आहे. आमचे हृदय कधीही मोडून पडू शकते. पण तुझे नेहमी चालू राहील. ती त्यात काय विशेष वेगळे आहे, हे बघण्यासाठी जवळून डोळयाचा अभ्यास करत होती. ''प्रिय, तुझे सर्व फार छान चाललेले दिसते आहे.'' जिवंत असताना दिसायचा त्यापेक्षाही आता त्याचा डोळा चांगला दिसत होता. त्यात पूर्वी न दिसणारा हळूवारपणा, शांतपण व दयाळु झाक होती. बुबुळाच्या मध्य भागी असलेल्या बिंदुमुळे ते होते का? विलीयमच्या बुबुळाचा मध्यभाग नेहमीच छोटासा व काळा होता. त्यातून नेहमी चकाकीत प्रकाशाची तिरीप बाहेर पडे. ती सरळ तुमच्या मेंदूत घुसे. तुमच्यातून आरपार बघे व तुम्ही काय विचार करत आहात, हे देखील जाणे. पण आता ती बघत होती तो मऊसर, हळुवार, खूपसा गाईसारखा होता. तिने वर न बघता विचारले, ‘‘तुमची खात्री आहे का, की तो भानावर आहे?

लँडे म्हणाला, ‘‘हो. हो. पूर्णपणे.''

‘‘आणि तो मला बघू शकतो आहे?''

‘‘अगदी व्यवस्थित.''

‘‘हे असामान्य नाही का? मला वाटते, तो आश्चर्यचकित झाला असेल.''

‘अजिबात नाही. त्याला तो कुठे आहे व तिथे का आहे, हे सगळे माहिती आहे. तो ते विसरला असण्याची शक्यता नाही.''

‘‘म्हणजे तो खोलगट भांड्यात असल्याचे त्याला माहिती आहे?''

“अर्थात. जर त्याला बोलता येत असते, तर तो आता या क्षणी अगदी नेहमीसारखे संभाषण करू शकला असता. मला दिसते आहे त्याप्रमाणे, मानसिक दृष्ट्या हा विलियम आणि तुम्हाला माहिती असलेला घरगुती विलियम यांच्यात काही फरक नाही.”

मिसेस पर्ल म्हणाली, “माझे चांगले नशीब!” हा थक्क करणारा

अनुभव पचवत व त्या डोळ्याकडे रोखून बघत, ती स्वतःशी बोलली, ‘तो आता आहे, तसा त्याचा स्वीकार करणे अवघड आहे. पण माझा विश्वास आहे, की अशा प्रकारच्या विलियमबरोबरदेखील मी खूप आरामशीरपणे राहू शकते. मोठ्याने ती बोलली, “तो शांत आहे, नाही का?”

“नैसर्गिकपणे, तो शांत आहे.”

तिने विचार केला, “टीका नाही, वाद नाहीत. सतत धाकदपटशा नाही. नियमांचे पालन नाही, सिगरेट ओढायला बंदी नाही, संध्याकाळी पुस्तक वाचतांना त्यावरून माझ्याकडे नापसंतीदर्शक कटाक्ष नाही, शर्ट धुणे नाही वा इस्त्री करणे नाही, त्याच्यासाठी जेवण बनवणे नाही. फक्त  हृदयाच्या मशीनचा आवाज ऐकणे, पण तो तसा शांत करणाराच आहे.  दूरदर्शनशी स्पर्धा करणारा नाही.”

ती म्हणाली, “डॉक्टर, मला एकाएकी त्याच्याबद्दल खूप प्रेम वाटू लागले आहे. हे जरा विचित्रच वाटते, नाही का?”

“मी समजू शकतो.”

तो तिथे पडलेला, इतका बिचारा व शांत दिसतो.”

“हो, मला पण ते जाणवते.”

“तो एखाद्या बाळासारखा आहे.”

लँडे तिच्यामागे उभा राहून निरीक्षण करत होता. त्या खोलगट भांड्यातील त्याच्याकडे बघत, ती म्हणाली, “आता आजपासून मेरी तुझी काळजी घेणार आहे. जगातील कसलीही चिंता तुला करायचे काही कारण नाही.”

“डॉक्टर, मी याला घरी केव्हा घेऊन जाऊ शकते?”

“काय म्हणालात?”

“मी म्हणाले, की मी याला घरी केव्हा घेऊन जाऊ शकते?”

लँडे म्हणाला, “तुम्ही विनोद करत आहात.”

तिने डोके वळवून त्याच्याकडे पाहिले व विचारले, “मी विनोद का करेन?” तिचा चेहरा चमकत होता. दोन डोळे हिऱ्यासारखे तेजस्वी होते.

“त्याला इथून हलवता येणार नाही.”

“का नाही?”

“मिसेस पर्ल, हा प्रयोग आहे.”

“पण डॉ लँडे, तो माझा नवरा आहे.”

लँडेच्या चेहऱ्यावर मजेशीर, लहानसे हसू उमटले. तो म्हणाला,

“ठीक आहे --- “

ती न रागावता, फक्त त्याला वस्तुस्थिती सांगत, म्हणाली, “तो माझा नवरा आहे, हे तुम्हाला माहिती आहे.”

लँडे म्हणाला, “हा थोडा युक्तीचा मुद्दा आहे. मिसेस पर्ल, आता तुम्ही विधवा आहात. मला वाटते, तुम्ही हे सत्य स्वीकारले पाहिजे.”

ती अचानक टेबलापासून दूर जाऊन, खिडकीशी उभी राहिली. तिच्या बॅगेतून सिगरेट काढत ती बोलली, “मला तो परत पाहिजे.”

तिने सिगरेट ओठात ठेऊन पेटवली, तेव्हा लँडे तिच्याकडे बघत होता.

त्याने विचार केला की त्याचे चुकत नसेल, तर या बाईमध्ये काही विचित्र होते. तिचा नवरा असा खोलगट भांड्यात असलेला तिला आवडत होता. जर ही त्याची बायको असती, तर त्याच्या काय भावना असत्या, याचा तो विचार करू लागला. त्याला ते आवडले नाही.

तो म्हणाला, “आपण माझ्या खोलीत परत जायचे का?”

खिडकीशेजारी उभी राहून, सिगरेट ओढतांना ती शांत, मोकळी वाटत होती. “हो, चला.”

जातांना ती खोलगट भांड्याशी थोडी थांबून वाकली व बोलली, “प्रिय, मेरी तुला सोडून चालली आहे. तू कसलीही काळजी करू नकोस., कळले का? मी तुला लवकरात लवकर घरी घेऊन जाणार आहे. तिथे मी तुझी व्यवस्थित काळजी घेऊ शकेन. आणि प्रिय ऐक --- “

ती एक झुरका घ्यायच्या बेतात असतांना, थांबली. त्या क्षणी डोळा फडफडला. ती त्यावेळेस सरळ डोळयात बघत होती. तिने त्या डोळयात

छोटासा प्रकाशित ठिपका पाहिला. रागाने बुबुळ मिनिटभर आक्रसले. प्रथम ती हलली नाही. ती त्यावर वाकून, सिगरेट तोंडात ठेऊन, उभी होती. मग अगदी सावकाश मुद्दाम तिने सिगरेट तिच्या ओठांमध्ये ठेवली. एक खोल झुरका घेतला. तीन चार सेकंद धूर फुफ्फुसात जाऊ दिला. आणि एकदम तो तिच्या नाकपुड्यांमधून बाहेर आला. दोन धुराच्या रेषा खोलगट भांडयाशी उमटल्या. त्यामुळे त्या डोळयावर एक निळा दाट ढग निर्माण केला.

लँडे दाराबाहेर तिच्याकडे पाठ करून थांबलेला होता. "चला, मिसेस पर्ल."

ती मवाळपणे म्हणाली, "विलियम, इतका चिडून पाहू नकोस. असे बघणे, बरे नाही."

ती काय करते आहे, हे बघण्यासाठी, लँडेने डोके वळवले.

ती कुजबुजली, "आता हे बास. तू माझा पाळीव नवरा असल्याने, यापुढे मेरी म्हणेल तसेच तुला करावे लागेल. समजले का?"

तिच्याकडे जात, लँडे बोलला, "मिसेस पर्ल."

ती म्हणाली, "परत खट्याळपणा करू नकोस. माझ्या प्रिय, करशील का?"

सिगरेटचा अजून एक झुरका घेत, ती म्हणाली, "खट्याळ मुलांना हल्ली कडक शिक्षा केली जाते, तुला हे माहिती असलेले बरे."

आता लँडे तिच्या शेजारी उभा होता. तिचा हात धरून तो तिला सभ्यपणे पण जोरात ओढू लागला. "प्रिय, अच्छा. मी लगेच परत येईन."

“मिसेस पर्ल, बास झाले.”

लँडेकडे मोठ्या तेजस्वी डोळ्यांनी बघत, ती ओरडली, “तो किती गोड आहे, नाही का? तो म्हणजे स्वर्गच आहे. त्याला घरी नेण्यासाठी मी अधीर झाले आहे.”

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे छत्तीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*





































ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल










वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल








## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.
## डॉ. वृषाली जोशी यांचे हे अडतिसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके),

डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३९), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(९), श्याम कुलकर्णी(८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(३), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।